जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
✦ अमरावती, गुरुवार १७ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०




## भारतीय युद्धनौकेला पाक जहाजाची धडक

**कोच्ची :** अरबी समुद्रात भारतीय नौदलाच्या युद्धनौकेला पाकिस्तानी नौदलाच्या जहाजाची धडक झाल्याची घटना समोर आली आहे. १५ सप्टेंबरच्या संध्याकाळी ही घटना घडली. या घटनेनंतर भारताने पाकिस्तानच्या उच्चायोगातील प्रभारी राजनयिकाला परराष्ट्र मंत्रालयात बोलावून तीव्र निषेध नोंदवला.भारतीय परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार, भारतीय नौदलाचे युद्धनौके नियमित निगराणी मोहिमेवर असताना पाकिस्तानी नौदलाचे



जहाज वेगाने त्याच्या जवळ आले त्यानंतर दोन्ही जहाजांची धडक झाली. ही घटना आंतरराष्ट्रीय सागरी हद्दीत घडली. या घटनेत कोणतेही मोठे नुकसान झाले नसल्याचे भारताने स्पष्ट केले आहे. सदर घटनेची गंभीर दखल घेत भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने १६ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीतील पाकिस्तान उच्चायोगाच्या प्रभारी अधिका-याला बोलावले.पाकिस्तानी नौदलाच्या या वर्तनाचा भारताकडून निषेध नोंदवण्यात आला. तसेच संबंधित अधिका-याला हा संदेश पाकिस्तानच्या संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचवण्यास सांगण्यात आले. भारताने या घटनेचा संबंध एप्रिल १९९१ मध्ये भारत आणि पाकिस्तानदरम्यान झालेल्या लष्करी कवायती, युद्धाभ्यास आणि सैन्याच्या हालचालींबाबतच्या आगाउ सूचनेच्या कराराच्या कलम १० शी जोडला आहे. या करारातील तरतुदींचे पालन करून भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होउ नये, यासाठी सर्व लष्करी तुकड्यांनी आवश्यक खबरदारी घ्यावी, असे भारताकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, इस्लामाबादमधील भारताच्या प्रभारी राजनयिकालाही पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाकडे या घटनेबाबत असाच निषेध नोंदवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## जरांगे पाटील मुंबईत आंदोलन करण्यावर ठाम, सरकारचे शिष्टमंडळ तातडीने घेणार भेट



**मुंबई/प्रतिनिधी :** मनोज जरांगे पाटील १७ सप्टेंबर रोजी बीडमधील पाटोद्यातून निघणार आहेत आणि १८ सप्टेंबर रोजी मुंबईच्या वेशीवर पोहोचणार आहेत. त्यांनी बुधवारी रात्री याबद्दलची घोषणा केली. ऐन गणेशोत्सवात मराठा आंदोलक येण्यावर ठाम असल्याने आता सरकारकडून हालचाली वाढल्या आहेत. सरकारचे शिष्टमंडळ मनोज जरांगे पाटील यांची पाटोद्याच भेट घेणार असल्याची माहिती समोर आली. अंतरवाली सराटीतून निघाल्यानंतर मनोज जरांगे यांची प्रकृती बिघडली होती. त्यांच्यावर १६ सप्टेंबर रोजी दिवसभर उपचार करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी त्यांनी पत्रकार परिषद घेउन मुंबईत आंदोलन करण्याचे जाहीर केले. ठरलेल्या दौ-यात आता बदल करण्यात आले असून, कुठेही न थांबता मुंबईच्या वेशीवर पोहोचणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. दरम्यान, मनोज जरांगे यांनी मुंबईला जाण्याबद्दलचा निर्धार बोलून दाखवल्यानंतर राज्य सरकारकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. उद्योगमंत्री उदय सामंत हे परदेशात असून, त्यांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे मनोज जरांगे यांच्याशी संपर्क केल्याची माहिती आहे.

राज्य सरकारकडून मनोज जरांगे यांना मागण्यासंदर्भातील कार्यवाहीचा मसुदा दिला जाणार आहे. कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार प्रसाद लाड यांच्यासह शिवसेनेचे मंत्री असे शिष्टमंडळ मनोज जरांगे यांची भेट घेणार असल्याचे समजते. मनोज जरांगे यांची पाटोद्यातच शिष्टमंडळ भेट घेणार आहे.


## हजारो बौद्ध बांधवांचा 'एल्गार'
### दीक्षाभूमी मुक्तीसाठी आक्रोश मोर्चा




**चंद्रपूर :** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १६ ऑक्टोबर १९५६ रोजी चंद्रपुरात सुमारे तीन लाख शोषित, पीडित समाजबांधवांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. या ऐतिहासिक घटनेमुळे चंद्रपूरचे नाव बौद्ध संस्कृतीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले. याच दीक्षाभूमीच्या मुक्तीसह विविध मागण्यांसाठी संत सैनिक दल, भारतीय बौद्ध महासभा आणि जिल्ह्यातील विविध सामाजिक-धार्मिक संघटनांच्या सहकार्याने बुधवारी हजारो बौद्ध बांधवांनी आक्रोश मोर्चा काढला. डा. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यापासून निघालेला मोर्चा मुख्य मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला.दीक्षाभूमी येथील डा. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल सोसायटीच्या व्यवस्थापन समितीत एकाच कुटुंबातील रक्तसंबंधित सदस्यांचा समावेश नसावा. बौद्ध आंबेडकरी समाजाचे प्रतिनिधित्व करणारे तसेच जिल्ह्यातील सर्व बौद्ध विहार मंडळांच्या अध्यक्षांचा समितीत समावेश करावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. १५ व १६ ऑक्टोबर रोजी बौद्ध अनुयायांच्या वतीने आयोजित करण्यात येणा-या कार्यक्रमांना शासनाने परवानगी द्यावी. दीक्षाभूमीचा वापर व्यावसायिक आणि राजकीय कार्यक्रमांसाठी करू नये. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमावेळी परिसरात तसेच संरक्षण भिंतीलगत स्टाल लावण्यास मनाई करावी, जेणेकरून उपासक-उपासिकांना पुरेशी जागा उपलब्ध होईल, अशी मागणीही करण्यात आली.

## 11 रूपये किमतीची वस्तू हॉस्पिटलमध्ये 325 ला विकली जाते
# तुकाराम मुंढेंनी हॉस्पिटलमधील लुटीचा एक्स-रे काढला!





**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन (FDA) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी रुग्णालयांमधील वैद्यकीय साहित्याच्या किमतींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांनी खरेदी किंमत आणि एमआरपी (MRP) यांमधील मोठ्या तफावतीकडे लक्ष वेधले.

मुंढे यांच्या म्हणण्यानुसार, एका खासगी रुग्णालयाने आयव्ही इन्फ्युजन सेट (IV infusion set) ११.०५ ला खरेदी केला, तर त्याची एमआरपी ३२५ होती. हा फरक अंदाजे २,८४१% इतका आहे. त्याचप्रमाणे, ६.७५ किमतीची सिरिंज ५७.२० ला विकली गेली आणि २९.४१ किमतीचा कॅथेटर ३१० ला विकला गेला. त्यांनी रुग्णांसाठी किमतींमध्ये पारदर्शकतेची गरज असल्याचे अधोरेखित केले.

**रुग्णांकडे किमती तपासण्यासाठी मर्यादित पर्याय-** मुंढे यांच्या मते, अशा परिस्थितीत रुग्णांना रुग्णालयाच्या बिलावर नमूद केलेली किंमत स्वीकारण्यास भाग पडते. समस्या केवळ किमतीची नाही, तर रुग्णांसाठी अचूक माहिती आणि पारदर्शकतेचा अभाव ही देखील आहे. त्यांनी सांगितले की, अनेक वैद्यकीय उत्पादनांची एमआरपी (MRP) रुग्णालयाच्या खरेदी किमतीपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त असू शकते. महाराष्ट्र एफडीएच्या (FDA) सर्वेक्षणाच्या आधारे, औषधनिर्माण विभाग आणि एनपीपीएने (NPPA) या विसंगतीबाबत पुनरावलोकनाची शिफारस केली आहे.

**एनपीपीएकडून किमतींची चौकशी-** अहवालानुसार, एनपीपीए वैद्यकीय उत्पादन उत्पादक आणि मध्यस्थांकडून जोडल्या जाणा-या नफ्याच्या मार्जिनची चौकशी करत आहे. यासाठी, कंपन्यांची कागदपत्रे आणि किंमत सूची यांची महाराष्ट्र एफडीएच्या सर्वेक्षण डेटाशी तुलना केली जात आहे. पंजाब, राजस्थान आणि तामिळनाडू येथूनही अशाच प्रकारच्या तक्रारी नोंदवण्यात आल्या आहेत.

**रुग्णालयांकडून खर्चाचा मुद्दा उपस्थित-** रुग्णालयांचे म्हणणे आहे की, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आवश्यक असले तरी, पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि रुग्ण सुरक्षेवरील त्यांच्या खर्चाचाही विचार केला पाहिजे. रुग्णालयांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम राहणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून ते आवश्यक गुंतवणूक करणे सुरू ठेवू शकतील.

**औषधांप्रमाणे वैद्यकीय उपकरणांवर किंमत नियंत्रण नाही**

औषध (किंमत नियंत्रण) आदेश, २०१३ नुसार, अनेक अत्यावश्यक औषधांवर किंमत मर्यादा लादण्यात आल्या असल्या तरी, त्या बहुतेक वैद्यकीय उपकरणे आणि उपभोग्य वस्तूंना लागू होत नाहीत.

### 6.75 किमतीच्या सिरिंजची एमआरपी 57.20 रूपये


असूचीबद्ध उत्पादनांची कमाल किरकोळ किंमत (MRP) १२ महिन्यांत जास्तीत जास्त १० टक्क्यांनी वाढवता येते, परंतु याचा अर्थ असा नाही की प्रत्येक वैद्यकीय उपकरणावर एक निश्चित किंमत मर्यादा आहे.

**काही वैद्यकीय उत्पादनांसाठी आधीच निश्चित केलेल्या किमती**

सरकारने यापूर्वी कोरोनरी स्टेंट आणि नी इम्प्लांट्ससारख्या काही वैद्यकीय उत्पादनांच्या किमती नियंत्रित केल्या आहेत. कोविड-१९ महामारीच्या काळात, ऑक्सिजन कान्सन्ट्रेटरसह काही अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणांवरील व्यापारी नफ्याचे प्रमाण (ट्रेड मार्जिन) देखील नियंत्रित करण्यात आले होते. आता अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणे आणि उपभोग्य वस्तूंसाठी व्यापारी नफ्याचे प्रमाण नियंत्रित करणे, किमतींवर देखरेख वाढवणे किंवा किंमत मर्यादा लादणे यांसारख्या पर्यायांचा विचार केला जात आहे.

## ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी :** दरवर्षी, भारतीय चित्रपटसृष्टीतील अविस्मरणीय आणि उत्कृष्ट योगदानाबद्दल एका कलाकाराला दादासाहेब फाळके पुरस्कारानं सन्मानित केलं जाते. हा पुरस्कार भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मान मानला जातो. ज्येष्ठ कन्नड चित्रपट अभिनेते अनंत नाग यांना २०२४ सालच्या या पुरस्कारानं सन्मानित केलं जाणार आहे. भारत सरकारनं या पुरस्कारासाठी ७८ वर्षीय अभिनेत्याच्या नावाची घोषणा केली आहे. भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाअंतर्गत मुख्य नोडल एजन्सी असलेल्या प्रेस इन्फार्मेशन ब्युरोने (PIB) आपल्या सोशल मीडियावर अनंत नाग यांचा एक फोटो शेअर केला आणि लिहिलं की, 'दादासाहेब फाळके पुरस्कार २०२४ श्री. अनंत नाग यांना प्रदान केला जाईल."भारत सरकार, दादासाहेब फाळके पुरस्कार निवड समितीच्या शिफारशीनुसार, हे जाहीर करताना आनंद होत आहे की, अनंत नाग यांना भारतीय चित्रपटसृष्टीतील त्यांच्या देदीप्यमान प्रवासासाठी आणि योगदानासाठी प्रतिष्ठित दादासाहेब फाळके पुरस्कार २०२४ ने सन्मानित केलं जाईल. त्यांनी अनेक पिढ्यांना प्रेरणा दिली आहे. हा पुरस्कार २२ सप्टेंबर २०२६ रोजी गुजरातच्या केवडिया येथे ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात प्रदान केला जाईल.'



**पंतप्रधान मोदींची पोस्ट-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनंत नाग यांचं अभिनंदन केलं आहे. पंतप्रधान मोदींनी ट्विटरवर लिहिलं, 'अनंत नाग यांना दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन. त्यांचं उत्कृष्ट काम आणि सहजसुंदर अभिनयानं अनेक दशकांपासून भारतीय चित्रपटसृष्टीवर, विशेषतः कन्नड चित्रपटसृष्टीवर, एक खोल ठसा उमटवला आहे. त्यांनी आपल्या पात्रांमध्ये जिवंतपणा आणला आहे. ते खरोखरच या पुरस्कारासाठी पात्र आहेत.' दरम्यान, अनंत नाग हे एक ज्येष्ठ अभिनेते आणि राजकारणी आहेत. ते कन्नड चित्रपटसृष्टीतील त्यांच्या उत्कृष्ट योगदानासाठी ओळखले जातात. त्यांचा जन्म ४ सप्टेंबर १९४८ रोजी झाला. अनंत यांनी आपल्या कारकिर्दीत ३०० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केलं आहे. कन्नड व्यतिरिक्त, त्यांनी हिंदी, तेलुगू, तमिळ, मराठी आणि मल्याळम चित्रपटसृष्टीतही काम केलं आहे. २०२५ मध्ये भारताचा तिसरा सर्वोच्च नागरी सन्मान, पद्मभूषण पुरस्कारानं सन्मानित झालेले अनंत नाग यांचं खरं नाव अनंत नागरकट्टे आहे. अनंत यांना दूरदर्शनवरील 'मालगुडी डेज' या मालिकेद्वारे घराघरात लोकप्रियता मिळाली.

## नक्षलवादी हल्ल्यातील १० दोषींना फाशीची शिक्षा

**जगदलपूर/रायपूर :** २०१३ मध्ये झीरम खो-यात काँग्रेस नेत्यांसह २९ लोकांच्या हत्येप्रकरणी जगदलपूर एनआयए न्यायालयाने १० दोषींना फाशीची शिक्षा सुनावली आहे. २५ मे २०१३ रोजी काँग्रेसच्या परिवर्तन यात्रेच्या ताफ्यावर नक्षलवादी हल्ला झाला होता. यात काँग्रेसचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष नंदकुमार पटेल, महेंद्र कर्मा आणि माजी केंद्रीय मंत्री विद्याचरण शुक्ल यांच्यासह २९ लोकांचा मृत्यू झाला होता.सुमारे १३ वर्षे चाललेल्या सुनावणीत १०१ साक्षीदारांचे जबाब आणि कागदपत्रे नोंदवण्यात आली. ही शिक्षा उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरच लागू होईल. तोपर्यंत सर्व दोषी जगदलपूरच्या केंद्रीय कारागृहात राहतील. ३० दिवसांच्या आत उच्च न्यायालयात अपील करू शकतात. अभियोजन पक्षाने फाशीची मागणी केली होती, तर बचाव पक्षाने शिक्षेत कपात करण्याची मागणी केली होती. १३ वर्षांपूर्वी बस्तरमध्ये काँग्रेस आपली परिवर्तन यात्रा काढत होती. २५ मे २०१३ च्या संध्याकाळी ही यात्रा सुकमाच्या दिशेने परत येत होती.जेव्हा ताफा दरभा क्षेत्रातील झीरम घाटातून जात होता, तेव्हा माओवाद्यांनी दबा धरून हल्ला केला. हल्ल्याची सुरुवात आयईडी स्फोटाने




झाली. त्यानंतर रस्त्यावर झाडे पाडून मार्ग बंद करण्यात आला आणि जंगलातून ताफ्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. थोड्याच वेळात संपूर्ण परिसर गोळ्यांच्या आवाजाने दणाणून गेला. नक्षलवाद्यांनी नेते आणि सुरक्षा कर्मचा-यांना वेगळे केले.माओवाद्यांचे मुख्य लक्ष्य महेंद्र कर्मा होते. नंदकुमार पटेल, त्यांचे पुत्र दिनेश पटेल आणि इतर अनेक लोकांचीही हत्या करण्यात आली. एकाच हल्ल्यात काँग्रेसची त्यावेळची राज्याची सर्वोच्च नेतृत्व फळी जवळजवळ संपली होती.प्राण गमावलेल्या काँग्रेस नेत्यांची नावे-नंदकुमार पटेल (तत्कालीन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष), महेंद्र कर्मा (माजी विरोधी पक्षनेते), विद्याचरण शुक्ल (माजी केंद्रीय मंत्री), दिनेश पटेल, उदय मुदलियार, भागीरथी पालिया, राजकुमार, गोपीचंद माधवानी, अल्लानूर, योगेंद्र शर्मा, राजेश चंद्राकर, मनोज जोशी, अभिषेक गोलचा, गणपत नाग, सदा सिंह, चंद्रहास ध्रुव, दीपक उपाध्याय, तरुण देशमुख, प्रहलाद, चंदर राम मांझी, पैतृक खलखो, पवन कोंद्रा, सियाराम सिंह, पोलीस कर्मचारी- प्रधान आरक्षक प्रफुल्ल शुक्ला, अशोक कुमार, राहुल प्रताप सिंह आणि इमॅन्युअल केरकेट्टा.

**हल्ला संपल्यानंतर शस्त्रेही लुटून नेली-** नक्षलवाद्यांनी ताफ्यातील गाड्या आणि ठार झालेल्या सुरक्षा कर्मचा-यांची शस्त्रेही ताब्यात घेतली होती. २५ सप्टेंबर २०१४ रोजी एनआयएच्या आरोपपत्रानुसार, हल्ल्यानंतर एक ९ एमएम पिस्तूलसह २ मॅगझिन आणि २० काडतुसे, दोन एके-४७ रायफल्स, १४ मॅगझिन आणि ४५५ काडतुसे आणि १० हँड ग्रेनेड, वाकी टाकी आणि इतर उपकरणे लुटली होती.

## अमेरिकेच्या टॅरिफ विधेयकामुळे भारतात महागाई वाढणार

**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था :** रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी करणा-या देशांवर तब्बल १०० टक्के आयात शुल्क लादण्याचे अमर्याद अधिकार अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना देणा-या एका महत्त्वाच्या विधेयकाला अमेरिकेच्या हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हसने मतदान केले आहे. याचा थेट परिणाम भारत आणि चीनवर होणार असून या देशांवर १०० टक्के आयात शुल्क लागण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास भारतामध्ये महागाईचा आगडोंब उसळू शकतो. लिंडसे ओ ग्रॅहम सँक्शनिंग रशिया अँड इराण अॅक्ट २०२६ असे नाव असलेले हे विधेयक मंगळवारी सायंकाळी अमेरिकन संसदेत २१४ विरुद्ध २११ अशा अत्यंत अल्प मताधिक्याने मंजूर झाले. दोन डेमोक्रॅटिक खासदारांनी रिपब्लिकन पक्षाच्या बाजूने मतदान केल्यामुळे हे विधेयक पुढे सरकू शकले. हे विधेयक बुधवारी अंतिम मतदानासाठी मांडले जाण्याची शक्यता आहे.



दरम्यान, हे विधेयक राज्यसभेत ७ ऑगस्ट रोजी ८६ विरुद्ध ११ अशा दणदणीत बहुमताने आधीच मंजूर झाले आहे. मात्र, प्रतिनिधीगृहात ट्रम्प यांच्या वाढत्या अधिकारांवरून लोकप्रतिनिधींमध्ये प्रचंड वाद निर्माण झाला आहे. ट्रम्प यांना टॅरिफ लादण्याचे अमर्याद आणि अनियंत्रित अधिकार दिल्यास ते मित्रदेशांवर अन्याय करू शकतात, अशी भीती सीनियर डेमोक्रॅट्सनी व्यक्त केली आहे.

यामुळे अमेरिकेतील महागाई वाढेल आणि युक्रेनला मिळणा-या दीर्घकालीन पाठिंब्याला तडा जाईल, असा दावा त्यांनी केला. ट्रम्प यांनी भूतकाळात कॅनडा आणि मेक्सिकोसारख्या जवळच्या मित्रराष्ट्रांवर ज्या प्रकारे टॅरिफचा वापर केला होता, त्याचा संदर्भ देत खासदारांनी ट्रम्प यांच्या हातात ही नवीन सत्ता सोपवण्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. हे विधेयक रशियाकडून तेल आणि नैसर्गिक वायू खरेदी करणा-या जगातील पहिल्या ५ मोठ्या आयातदार देशांवर १०० टक्क्यांपर्यंत टॅरिफ लादण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना देते. भारत आणि चीन हे रशियन तेलाचे मोठे खरेदीदार असल्याने त्यांच्यावर थेट टांगती तलवार निर्माण झाली आहे.




## सोन्याच्या हॉलमार्किंग शुल्कात तब्बल 67 टक्के वाढ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** ऐन सणासुदीमध्ये ग्राहकांच्या खिशाला कात्री लागणार आहे. भारतीय मानक ब्यूरो अर्थात बीआयएसने सोन्याच्या दागिन्यांवरील हालमार्किंग शुक्लामध्ये तब्बल ६७ टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. बीआयएसने हालमार्किंग शुल्कात ३० रुपयांची वाढ केली असून आता प्रति दागिना ७५ रुपये शुल्क मोजावे लागणार आहे. तर दुसरीकडे चांदीच्या दागिन्यांवरील शुक्ल ३५ रुपयांवर कायम ठेवण्यात आले आहे. हे नवीन तर तात्काळ लागू करण्यात आले आहेत.

बीआयएसने बीआयएस (हालमार्किंग) दुरुस्ती नियम, २०२६ अन्वये १४ सप्टेंबर २०२६ रोजी यासंदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. नव्या नियमांनुसार सोन्याचे दागिने खरेदी करणा-याला प्रत्येक दागिनेमागे ७५ रुपये हालमार्किंग शुक्ल द्यावे लागेल. तर चांदीचे हालमार्किंग शुक्ल ३५ रुपये एवढे कायम ठेवण्यात आले आहे. सीजेसीचे अध्यक्ष राजेश रोकडे आणि उपाध्यक्ष अविनाश गुप्ता यांनी या दरवाढीबद्दल चिंता व्यक्त केली. देशभरात बनावट आणि बेकायदेशीर हालमार्किंग केंद्रांवर कारवाई सुरू असताना, अधिकृतपणे व्यवसाय करणा-या सराफांवरच अतिरिक्तआर्थिक भार टाकला जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सोन्याचे दर आधीच जास्त असताना, हालमार्किंग



शुल्कवाढीमुळे व्यापा-यांचा खर्च आणखी वाढेल. हा खर्च दागिन्यांच्या किमतीत समाविष्ट होण्याची शक्यता असल्याने ग्राहकांवर अप्रत्यक्ष परिणाम होउ शकतो.

**हालमार्किंग म्हणजे काय?**

हालमार्किंग ही सोन्याच्या शुद्धतेची सरकारी खात्री असते. बीआयएस प्रमाणित दागिन्यांवर तीन प्रमुख चिन्हे असतात. यात बीआयएसचा लोगो, सोन्याची कॅरेटनुसार शुद्धता आणि ६ अंकी अक्षरी-संख्यात्मक एचयूआयडी युनिक आयडी क्रमांक.

**सुवर्णकार संघटनेचा तीव्र विरोध**

बीआयएसच्या या निर्णयावर ऑल इंडिया जेम अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिलने तीव्र नाराजी व्यक्त केली असून सरकारने या निर्णयाचा तातडीने पुनर्विचार करावा आणि जुनेच दर लागू ठेवावेत, अशी मागणी केली आहे. हालमार्किंगमुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो, त्यामुळे आम्ही नेहमीच या उपक्रमाला पाठिंबा दिला आहे. परंतु, अनिवार्य असलेल्या या नियमात थेट ६७ टक्क्यांची भरमसाठ वाढ करणे अयोग्य आहे. सध्या हालमार्किंगचे प्रमाण प्रचंड वाढले असताना, प्रति दागिना दर ४५ रुपयांवरून ७५ रुपये का करण्यात आला, याचे स्पष्टीकरण उद्योग क्षेत्राला मिळायला हवे. शुल्क वाढवण्याऐवजी प्रशासनाने बनावट हालमार्किंग आणि बेकायदेशीर कारभारावर आधी कारवाई करायला हवी, अशी मागणी जीजेसीचे अध्यक्ष राजेश रोकडे यांनी केली.

# ओझोन दिनानिमित्त प्राणिशास्त्र विभागात समूहचर्चेचे आयोजन



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** पर्यावरण संरक्षण, ओझोन थराचे महत्त्व आणि त्याच्या संवर्धनाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने जागतिक ओझोन दिनानिमित्त राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालय, चांदूर रेल्वे येथील प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने बी.एससी. भाग-२ व बी.एससी. भाग-३ च्या विद्यार्थ्यांसाठी आज समूहचर्चेचे आयोजन करण्यात आले. ओझोन थर हा पृथ्वीवरील सजीवसृष्टीच्या संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचा नैसर्गिक संरक्षक थर आहे. सूर्यापासून येणाऱ्या हानिकारक अतिनील किरणांपैकी मोठ्या प्रमाणात किरणे शोषून घेण्याचे कार्य ओझोन थर करतो. त्यामुळे मानव, प्राणी, वनस्पती तसेच संपूर्ण परिसंस्थेच्या संरक्षणामध्ये ओझोन थराची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना ओझोन थराचे वैज्ञानिक महत्त्व समजावे आणि पर्यावरण संवर्धनाबाबत त्यांच्यामध्ये जबाबदारीची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने समूहचर्चेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन व मार्गदर्शन डॉ. जी. बी. संतापे यांनी केले. कार्यक्रमास प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. एम. पी. चिखले यांची प्रमुख उपस्थिती होती.

समूहचर्चेदरम्यान विद्यार्थ्यांनी ओझोन थराची निर्मिती व रचना, ओझोनचे पर्यावरणीय महत्त्व, ओझोन क्षयाची कारणे, अतिनील किरणांचे सजीवांवर होणारे परिणाम, हरितगृह वायू आणि पर्यावरणीय बदल, क्लोरोफ्लोरोकार्बन्स (CFCs) सारख्या रसायनांचा ओझोन थरावर होणारा परिणाम तसेच ओझोन संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना या विविध मुद्द्यांवर आपले विचार मांडले.

विद्यार्थ्यांनी ओझोन थराच्या ऱ्हासामुळे मानवामध्ये त्वचेचे विकार, डोळ्यांशी संबंधित समस्या आणि रोगप्रतिकारक क्षमतेवर होणारे संभाव्य परिणाम याबाबत चर्चा केली. त्याचबरोबर अतिनील किरणांचा वनस्पती, पिके, जलचर सजीव आणि विविध परिसंस्थांवर होणारा परिणाम यावरही विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून चर्चा केली.

यावेळी डॉ. एम. पी. चिखले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पर्यावरणातील प्रत्येक घटकाचा सजीवांच्या जीवनाशी घनिष्ठ संबंध आहे. ओझोन थराचे संरक्षण करण्यासाठी केवळ आंतरराष्ट्रीय स्तरावरील करार व धोरणे पुरेशी नसून प्रत्येक व्यक्तीने पर्यावरणपूरक सवयी अंगीकारणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी पर्यावरणविषयक वैज्ञानिक माहिती समाजापर्यंत पोहोचवून जनजागृतीमध्ये योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. जी. बी. संतापे यांनी समूहचर्चेचे महत्त्व स्पष्ट करताना विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकातील माहिती न घेता पर्यावरणीय समस्यांकडे वैज्ञानिक आणि चिकित्सक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक असल्याचे सांगितले. समूहचर्चेमुळे विद्यार्थ्यांच्या संवादकौशल्य, आत्मविश्वास, तर्कशक्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विषय मांडणीच्या क्षमतेचा विकास होतो, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी ओझोन संरक्षणासाठी पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर, हानिकारक रसायनांचा नियंत्रित वापर, ऊर्जा बचत, वृक्षसंवर्धन, पर्यावरणीय जनजागृती आणि शाश्वत जीवनशैली यांसारख्या उपाययोजनांवरही चर्चा केली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राणिशास्त्र विभागातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# जुगार अड्ड्यांवर गुन्हे शाखेचा छापा; आठ जण ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील अवैध जुगारावर कारवाई करत गुन्हे शाखा युनिट क्रमांक १ ने बुधवारी १६ सप्टेंबर रोजी गाडगेनगर आणि बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन स्वतंत्र धाडी टाकल्या. या कारवायांमध्ये आठ जणांना ताब्यात घेण्यात आले असून, ५८ हजार ८२० रुपयांची रोकड व सहा मोबाइल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.गुन्हे शाखा युनिट क्रमांक १ चे अधिकारी व कर्मचारी गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत जुगारविरोधी कारवाईसाठी गस्त घालत असताना त्यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे जुगाराच्या ठिकाणी छापा टाकण्यात आला. या कारवाईत मोहन यादवराव पेंदाम (वय ४५, विलासनगर), संतोष लालजी गुप्ता (वय ३६, न्यू हनुमाननगर), बिपीन लोकनाथ चव्हाण (वय ४०, बॉम्बे फैल), सुभाष रामचंद्र राहुळकर (वय ६७, न्यू हनुमाननगर), रमेश समशेर बिंद (वय ४३, जय सियारामनगर), अंकुश परसराम अहेरवार (वय ३१, मसानगंज) आणि संतोष रामअजोर चव्हाण (वय ४४, शोभानगर) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून १२ हजार ५०० रुपये रोकड आणि ४५ हजार रुपये किमतीचे सहा मोबाइल, असा एकूण ५७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दरम्यान, दुपारी बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतही गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे जुगारविरोधी कारवाई केली. या कारवाईत विनायक मारोतराव ईखार (वय ६३, रा. पार्डी, अमरावती) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून १ हजार ३२० रुपये रोकड जप्त करण्यात आली. दोन्ही कारवायांमध्ये एकूण ५८ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. संबंधितांविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला, पोलिस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलिस उपायुक्त प्रांजली सोनावणे आणि सहायक पोलिस आयुक्त निलेश ब्राह्मणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिनेश दहातोंडे, पोलिस निरीक्षक अतुल वर, सहायक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे, सहायक पोलिस निरीक्षक दशरथ आडे, सहायक पोलिस उपनिरीक्षक फिरोज खान यांच्यासह गुन्हे शाखा व सायबर पोलिस ठाण्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

## १ व १० वरिल उर्वरित

### सरकारी नोकरीचे आमिष दाखवून

या आश्वासनावर विश्वास ठेवून फिर्यादीने वेगवेगळ्या वेळी आरोपींना रक्कम दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. पैसे घेतल्यानंतर आरोपींनी नियुक्ती आदेश दिल्याचे भासविल्याचा आरोप आहे. त्यानंतर फिर्यादीला वर्धा येथील सामान्य रुग्णालयात नेण्यात आले. शासकीय कामकाज पूर्ण होण्यासाठी आणखी सुमारे ४५ दिवस लागतील, असे सांगण्यात आल्याचेही फिर्यादीने पोलिसांना दिलेल्या जबानीत म्हटले आहे. मात्र, नोकरीच्या आश्वासनानुसार प्रक्रिया पूर्ण न झाल्याने फिर्यादीने पोलिसांत तक्रार दाखल केली. त्याच्या जबानी व अहवालाच्या आधारे राजापेठ पोलिसांनी पाच आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

### चिखलदरा येथे दोन अस्वलांच्या

हुसेन यांनी जखमी जयराम यांना स्वतःच्या वाहनातून तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले आहे. कंत्राटदार इम्रान हुसेन यांनी दाखवलेल्या प्रसंगावधान आणि माणुसकीचे सर्वत्र कौतुक होत आहे.दरम्यान, चिखलदरा आणि लगतच्या परिसरात वन्यजीवांचा वावर सातत्याने वाढत असल्याने नागरिक, मजूर तसेच पर्यटकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. भरदिवसा घडलेल्या या घटनेने वन विभागाच्या गस्त यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. नागरी वस्तीजवळ वन्यप्राण्यांचा शिरकाव रोखण्यासाठी वन विभागाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी तीव्र मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

### चांदुर रेल्वे-नांदगाव खंडेश्वर

उपलब्ध झाली. ही बस सकाळी ७ वाजता चांदुर रेल्वे येथून नांदगाव खंडेश्वर येथे सकाळी आठ वाजता पोचणार. प्रथम दिनी आज नांदगाव खंडेश्वर येथे बस पोचल्यानंतर नांदगाव खंडेश्वर येथील बस स्थानकावर नागरिक व प्रवाशांनी बस चालक व वाहकाचा सत्कार केला व शेगावला जाण्याकरिता सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले. ही बस पुन्हा शेगाव वरून परतीच्या प्रवासाला १.३० वाजता याच मार्गाने निघून चांदूर रेल्वे येथे सायंकाळी ७ वाजता पोचणार. नांदगाव बस स्थानकावर चालक व वाहकाचा सत्कार करतेवेळी भाजपाचे रावसाहेब रोठे ,घनश्याम सारडा, हरिश्चंद्र खंडाळकर, मुन्ना जोशी ,राजेश पाठक ,डॉ संजय जेवडे ,रंजीत खंडाळकर, अक्षय पारस्कर, संजय पोफळे ,योगेश चवाळे ,अरुण लाहबर, उमेश चौकडे, अनिल शिरभाते ,सुरज जोशी, आरती तरेकर, रेवती परसनकर इत्यादी भाजपाचे कार्यकर्ते व पदाधिकारी व नागरिकांची उपस्थिती होती.

### दोन कुख्यात गुन्हेगारांवर एमपीडीएची

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक करून अमरावती कारागृहात स्थानबद्ध केले आहे. माहिती नुसार, दोन्ही आरोपींविरुद्ध संपत्ती विरुद्धचे गंभीर गुन्हे दाखल असून अवैध शस्त्रांच्या माध्यमातून लोकांमध्ये दहशत निर्माण करणे अशा प्रकारच्या गुन्हेगारी कृत्यांमध्ये त्यांचा सहभाग आहे. या पार्श्वभूमी वर परतवाडा पोलीसांनी त्यांच्या विरुद्ध एमपीडीए अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव तयार केला होता.हा प्रस्ताव पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या माध्यमातून जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांच्यासमोर सादर करण्यात आला. प्रस्तावाची तपासणी केल्यानंतर ९ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी दोन्ही आरोपींना एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचा आदेश जारी केला. आदेश निघताच दोन्ही आरोपी फरार झाले होते. फरार आरोपींच्या शोधासाठी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला कामाला लावण्यात आले होते. गुप्त माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखाने परतवाडा पोलीसच्या मदतीने दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. त्यानंतर स्थानबद्धतेच्या आदेशाची पूर्तता करून त्यांना अमरावती कारागृहात रवाना करण्यात आले. पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि सहायक पोलीस अधीक्षक इशानी आनंद यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पीआय अशोक लांडे, परतवाडा ठाणेदार अजय आखरे, पीएसआय विलास रोकडे, पोहेकॉ अमोल देशमुख व इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

### पोस्टात नोकरीचे आमिष; २१.१०

याच्यावर विश्वास ठेवला. त्यानंतर नोकरीच्या प्रक्रियेसाठी वेगवेगळ्या टप्प्यांवर पैसे देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. या व्यवहारातून फिर्यादीसह अन्य दोन व्यक्तींकडून एकूण २१ लाख १० हजार रुपये घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. पैसे घेतल्यानंतर नोकरीसंदर्भातील बनावट नियुक्ती आदेश देण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. मात्र, आदेश मिळूनही प्रत्यक्ष नोकरीची प्रक्रिया पुढे सरकली नाही. त्यामुळे फिर्यादीने या संपूर्ण व्यवहाराबाबत पोलिसांकडे धाव घेतली. धारणी पोलिसांनी तक्रारीच्या आधारे संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला असून, पैसे कोणत्या पद्धतीने घेण्यात आले, बनावट नियुक्ती आदेश कोणी तयार केला आणि या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे.

### जमीन स्वस्त दरात भाड्याने

प्रकल्पातून कंपोस्ट खत निर्मितीची समस्या दूर होणे, कचऱ्यापासून बायोगॅस उत्पादन आणि रोजगार निर्मितीची संभावनाही आहे. सुमारे १०० कोटी रुपये खर्च करून या प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार असल्याचे महापालिकेच्या प्रस्तावात म्हटले आहे.

विरोधकांनी या जमिनीची किंमत केवळ ३७ हजार रुपये डिपॉझिट आणि वर्षाला ९.४० लाख रुपयांचे नाममात्र भाडे आकारून महापालिकेने खासगी कंपनीला देण्याच्या निर्णयावर तीव्र आक्षेप घेतला. विरोधी सदस्यांनी प्रश्न केला की, ज्या प्रकल्पाची एकूण किंमत २०० कोटी रुपये आहे आणि ज्यामध्ये मनपाची कोट्यवधी रुपयांची जमीन उपलब्ध करून दिली जात आहे, त्या जमिनीच्या बदल्यात मनपाला केवळ ९.४० लाख रुपये मिळणार आहेत. यातून मनपाचे आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप करण्यात आला.यावेळी विरोधकांनी ओल्या कचऱ्याची उपलब्धता, शेणाची व्यवस्था, पर्यावरण संरक्षण आणि रोजगाराच्या दृष्टीने या प्रकल्पाच्या व्यवहार्यतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तसेच यापूर्वीच्या जुन्या आणि अंधारात असलेल्या अशाच प्रकल्पांचा अनुभव पाहता या प्रकल्पाची शाश्वती काय, असा सवालही उपस्थित करण्यात आला. सभागृह नेते चेतन गावंडे यांनी या प्रकल्पाचे समर्थन करताना सांगितले की, सातारा जिल्ह्यातील अहेरी तहसीलच्या खंडाळा येथे याच धर्तीवर सीबीजी प्रकल्प यशस्वीरित्या चालवला जात आहे. महापौर, उपमहापौर आणि महापालिकेच्या इतर पदाधिकाऱ्यांनी स्वतः तिथे जाऊन प्रकल्पाच्या कार्यप्रणालीचा आणि संभाव्यतेचा आढावा घेतला आहे.स्वच्छ भारत अभियानांतर्गत अशा प्रकल्पांना केंद्र आणि राज्य सरकारकडून प्रोत्साहन दिले जात आहे आणि राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये या दिशेने काम सुरू असल्याचे गावंडे यांनी सांगितले.

**ओला कचरा मुबलक उपलब्ध असल्याचा आयुक्तांचा दावा-** महापालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी सभागृहात प्रकल्पाची तांत्रिक माहिती देत विरोधकांच्या शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न केला.आयुक्त म्हणाले की, प्रकल्पाच्या संचालना साठी आवश्यक तेवढा ओला कचरा महापालिका क्षेत्रात सहज उपलब्ध आहे. जर प्लॅन-A नुसार कंपनीला पुरेसा ओला कचरा उपलब्ध झाला नाही, तर त्यासाठी प्लॅन-B सुद्धा तयार ठेवण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे जरी तो स्वयंचलित असला तरी रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होणार आहेत. त्यांच्या मते या प्रकल्पामुळे रोजगारात ३० ते ४० टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील ६ जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारच्या प्रकल्पांची घोषणा झाली असून त्यात अमरावतीचाही समावेश आहे.

**त्रुटी दूर करण्याचे आश्वासन-** चर्चेच्या शेवटी आमसभेचे सभापती श्रीचंद तेजवानी यांनी सांगितले की, सत्ता पक्ष आणि विरोधी पक्ष अशा दोन्ही बाजूच्या सदस्यांनी अतिशय महत्वाच्या सूचना केल्या आहेत. या सर्व सूचनांचा विचार करून प्रकल्पातील असलेल्या त्रुटी आणि शंकांचे निरसन केले जाईल आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल.त्यानंतर सभागृहाने एकमताने सीबीजी प्रकल्पाच्या प्रस्तावाला मंजुरी प्रदान केली.

### भरती परीक्षा पद्धतीत सुधारणा

आहे. विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक, लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून टास्क फोर्स समोर आपले विचार मांडण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापित विशेष कक्षात प्रत्यक्ष तसेच ईमेलद्वारे सूचना, शिफारशी, हरकती व अभिप्राय यापूर्वीच मागविण्यात आले होते. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त होणाऱ्या सर्व सूचनांचे संकलन करून उच्चस्तरीय टास्क फोर्सकडे सादर करण्यात येतील. राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी निगडित असलेल्या या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत अमरावती विभागातील सर्व घटकांनी उत्स्फूर्त व सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

### शेतात काम करतांना महिलेला

रुग्णसेवक मयूर गोंडोळे यांच्यासह संतोष कलाने आणि सलीम खान यांनी प्रवासादरम्यान त्यांची काळजी घेतली. अचलपूर ते अमरावतीचा प्रवास अवघ्या ४० मिनिटांत पूर्ण करून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. सर्पदंशाच्या प्रसंगी प्रत्येक क्षण महत्त्वाचा असतो. अशा वेळी घाबरून न जाता रुग्णाला शक्य तितक्या लवकर वैद्यकीय केंद्रात पोहोचविणे गरजेचे असते. या घटनेतही वेळ न दवडता केलेल्या मदतीमुळे डॉक्टरांना उपचार सुरू करता आले. उपचारानंतर शांती धोके यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याची माहिती आहे.ग्रामीण भागात आपत्कालीन प्रसंगी रुग्णालयापर्यंत पोहोचण्याचे आव्हान अनेकदा मोठे असते. मात्र, संकटाच्या क्षणी माणुसकीने पुढे येत केलेली मदत एखाद्या कुटुंबासाठी मोठा आधार ठरू शकते. शांती धोके यांच्या प्रसंगीही शुभम खेरडे मित्र परिवाराने दाखविलेली तत्परता आणि रुग्णसेवकांनी केलेली धावपळ कौतुकास्पद ठरली.

### पावसातील दीर्घ खंडामुळे खरीप

घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळावी, यासाठी आमदार राजेश वानखडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांनी सोयाबीन, कापूस, तूर, मूग यासह विविध पिकांची पेरणी केली. मात्र पेरणीनंतर पावसामध्ये दीर्घ खंड पडल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला असून अनेक गावांमध्ये पिकांची वाढ खुंटली आहे. काही भागांमध्ये पिके सुकून गेल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली असून कोरडा दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे. या अस्मानी संकटाने शेतकरी हवालदिल झालेले आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार राजेश वानखडे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे कृषी व महसूल विभागाच्या संयुक्त पथकांमार्फत तातडीने गावनिहाय व शेतनिहाय पीक पंचनामे करण्याची मागणी केली. प्रत्यक्ष शेतपातळीवर पाहणी करून नुकसानीचे अचूक मूल्यांकन करावे आणि पंचनाम्याच्या आधारे पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या प्रचलित निकषांनुसार तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या गावांचा स्वतंत्र अहवाल तयार करून कोरडा दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आवश्यक सवलती व मदत देण्यात यावी, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीकविमा योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही गतिमान करावी आणि पुढील हंगामासाठी बियाणे, खते व इतर कृषी निविष्ठा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मदत करावी, अशी मागणीही आमदार राजेश वानखडे यांनी केली.

पिकांचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असून पेरणीचा खर्च, कर्जाची परतफेड आणि आगामी हंगामाचा खर्च यांचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे पीक कर्ज व इतर कृषी कर्जाबाबत आवश्यक सवलती व उपाययोजना करण्यासाठी संबंधित विभागांना निर्देश देण्यात यावेत, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन निश्चित सकारात्मक निर्णय घेईल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसंगी दिली. शासन शेतकऱ्यांच्या या अडचणीच्या काळात पाठीशी निश्चितच भक्कमपणे उभे राहील असा सार्थ विश्वास आमदार राजेश वानखडे यांनी व्यक्त केला.

### 'सेवा संकल्प अभियान' अमरावती

होत्या. समितीचे सदस्य विभागातील जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर (अमरावती), वर्षा मिना (अकोला), प्रविण देवरे (बुलडाणा), विकास मिना (यवतमाळ), योगेश कुंभेजकर (वाशिम), जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी (अमरावती), नयन नावंदर (अकोला), गुलाबराव खरात (बुलडाणा), विशाल खत्री (यवतमाळ), अर्पित चव्हाण (वाशिम), महानगरपालिकांचे आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले (अमरावती), सुनिल लहाने (अकोला) या बैठकीस दुरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. तसेच समितीचे सदस्य सचिव माहिती उपसंचालक अनिल आलुरकर, महसुलचे अप्पर आयुक्त अनिल खंडागळे, विकास योजनेच्या अप्पर आयुक्त शालिनी कडू, नगरपालिका प्रशासनाचे सह आयुक्त नितिन कापडनिस, विकास योजना सहायक आयुक्त राजु फडके, उपायुक्त प्रविण मानकर आदि उपस्थित होते. सेवा संकल्प अभियानाअंतर्गत विविध विभागांनी विविध उपक्रम राबविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करुन विभागीय आयुक्त नयना गुंडे म्हणाल्या की, या अभियानात महसुल, ग्रामविकास, शिक्षण, नगरविकास, पाणीपुरवठा, आरोग्य, वन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता, माहिती व जनसंपर्क, महिला व बालविकास, सामाजिक न्याय, उच्च व तंत्रशिक्षण, उद्योग, आदिवासी विकास, दिव्यांग कल्याण इत्यादी विभागांनी आपापल्या योजनांची उपक्रमांची अंमलबजावणी करुन लाभार्थ्यांना अभियान कालावधीत प्राधान्याने लाभ द्यायचा आहे. शासनाने ठरवून दिलेल्या उपक्रमांचे यशस्वी पध्दतीने आयोजन करुन 'सेवा परमोधर्म' या उक्तीप्रमाणे सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहोचविण्याच्या उद्देशाने अविरत प्रयत्न केला पाहिजे. या अभियान अंतर्गत सेवा सेतू अभियान, इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन, सेवा माझे योगदान, विकसित भारत संकल्प यात्रा, सेवाज्योत यात्रा, चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा, अंगणवाडी उत्सव, आर्शीवादाचा दिवा, बदलाची गोष्ट, आभार आणि संकल्पाची रांगोळी, नमो सेवागाथा, जल, जन आणि सेवा संकल्प यात्रा, जनसेवक महाकुंभ यासारखे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जिल्हाधिकारी व जिल्हा स्तरीय अधिकाऱ्यांनी आपापल्या विभागाचे सुक्ष्म नियोजन करावे. आणि इतर घटकांप्रमाणेच कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करावे. गोरगरीब जनतेला, लाभार्थ्यांना विविध लोकोपयोगी सेवांचा लाभ देवून उपकृत करावे. प्रलंबित फेरफार नोंदीचा निपटारा करणे, जिवंत सातबारा मोहिम, बळीराजा शेत व पाणंद रस्ते उपलब्ध करणे, शिधापत्रिकांचे वितरण, विविध प्रमाणपत्रांचे वितरण, जन्म मृत्यू नोंदणी, दिव्यांग प्रमाणपत्रे, शिकाऊ वाहक चालक परवाना, सातबारा व ८ अ च्या नोंदी अद्ययावत करणे इत्यादी कार्यक्रम राबविण्याचे यावेळी सुचित केले.

पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत कार्यक्रम आयोजित करुन रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत सुचित करुन आयुक्त म्हणाल्या की, सिंधी समाजाच्या लाभार्थ्यांना पट्टे वाटप करणे, पारधी बेड्यावर जाऊन त्यांच्या समस्या सोडविणे, तलाठी कार्यालयासाठी जागा शोधणे, स्मशानभूमीसाठी गाव पातळीवर जागा उपलब्ध करुन देणे, वनहक्क दावे निकाली काढणे अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून सेवा संकल्प अभियान राबविण्याबाबत विभागीय आयुक्त यांनी या बैठकीत मार्गदर्शन केले. या बैठकीनंतर महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दुरदृष्य प्रणालीद्वारे बैठक घेऊन सेवा संकल्प अभियानाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी विविध विभागाचे प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

### तीन गुन्ह्यांतील आरोपी

परिसरात सापळा रचला. पवार तेथे आढळून आल्यानंतर त्याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, चौकशीदरम्यान पवार याचा माहुली जहागीर पोलिस ठाण्यातील अपराध क्रमांक ४६/२०२५च्या दरोड्याच्या प्रकरणाशी संबंध असल्याचे समोर आले. या गुन्ह्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(५), ३०९(६) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल आहे. आता या तीनही प्रकरणांमध्ये पवारची नेमकी भूमिका, त्याचे साथीदार आणि गुन्ह्यांशी संबंधित अन्य बाबींचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक तथा ठाणेदार किरण औटे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केली.


## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क :**
**९४२२८५७१६९**
**९४२२१२०४०६**


## जाहीर नोटीस

**सौ.शिला भरत ढवळे, रा.नवसारी, अमरावती, ता.जि.अमरावती** यांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन नोदणी पोट तुकडी नांदगाव खंडेश्वर, ग्रामीण कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद अमरावती हददीतील मौजा फुल आमला,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथील भुमापन क्र.७९/५ क्षेत्रफळ १ हे २२ आर व पोटखराब ० हे १० आर, आकार रुपये ३.६५ पैसे, भो.वर्ग.१ यांची चतुःर्सिमा ः-

पुर्वेस - दत्त देवस्थानचे पडीत शेत व मदन ढवळे यांचे शेत,
पश्चिमेस - चांडक यांचे शेत
उत्तरेस - नाईक यांचे शेत
दक्षिणेस - उमक यांचे शेत

वर नमुद मिळकतीची इसारचिठ्ठी तुम्ही माझे पक्षकार संगीता सुनिल टाकरखेडे आणि बाळासाहेब अंबादास देशमुख यांना दिनांक ३०/०९/२०२५ रोजी दोन साक्षीदार नामे प्रमोद ठाकरे आणि ज्ञानेश्वर सवई यांच्या समक्ष रुपये १६,५०,०००/-(सोळा लाख पन्नास हजार रुपये फक्त) रुपयामध्ये करुन दिली होती आणि खरेदी ही ३१/०५/२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी करण्याचे ठरविले होते. तसेच सदर ईसारचिठ्ठी करतेवेळी ४,५०,०००/-(चार लाख पन्नास हजार रुपये फक्त) माझे पक्षकार यांनी तुम्हाला नगदी स्वरुपात दिले होते. सदर ईसारचिठी झाल्यानंतर मे २०२६ पर्यत माझे पक्षकार यांनी तुम्हाला वारंवार खरेदीखत नोंदविण्याकरिता कळविले. तसेच नोटीसेस सुध्दा पाठविल्या. परंतु तुम्ही इसारचिठी करतेवेळी दिलेल्या पत्यावर राहत नाही आणि माझे पक्षकार यांना तुमचा पत्ता माहित नाही. त्यामुळे माझे पक्षकार सदरच्या जाहीर नोटीसद्वारे तुम्हाला कळवित आहे की, ७ दिवसाचे आंत नांदगाव खंडेश्वर येथील दुय्यम निबंधक कार्यालयात येवून माझे पक्षकार यांना ईसारचिठ्ठी प्रमाणे खरेदीखत नोंदवुन दयावे. अन्यथा माझे पक्षकार यांना तुमचे विरुध्द दिवाणी तथा फौजदारी कायदेशिर कार्यवाही करावी लागेल.

**दिनांक - /०९/२०२६**

**ॲड.बी.बी.कावरे**
रा.सेंट्रल बॅकेजवळ, तिवसा,
ता.तिवसा, जि.अमरावती
**मो.९०११०२४२३५**

**क्र.२९**
**विक्रीचा जाहीरनामा (ऑर्डर २१, नियम ६६)**
**अमरावती येथील वि.७ वे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांचे न्यायालयात**
**ठिकाण - अमरावती, दिनांक २६.१०.२०२६**
**दिवाणी दावा क्र.Spl.D सन ६०/२०२५**
**अर्ज क्र. सन २०**

**(नमुना क्र.२९, परिशिष्ट ई, अनुसूची-१)**

**प्रविण नथ्थुजी देशमुख**
द्वारा- शशिकांत खंडार, प्लॉट नं.७४, गगलानी नगर, वडाळी नाका, अमरावती — **वादी**

**निलेश भगवंतराव भस्मे,**
मु.पो.शिराळा, ता.जि.अमरावती — **प्रतिवादी**

याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, समासात नमुद केलेल्या दाव्यामधील हुकूमनामा धारकाची मागणी पूर्ण करण्याकरीता, या न्यायालयाने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, ऑर्डर २१, नियम ६४ अन्वये त्याबाबतच्या अनुसूचीत नमुद केलेल्या जप्त मालमत्तेची विक्री करण्याचा आदेश दिला असून, दाव्याचा खर्च व विक्रीच्या दिनांकापर्यंतचे व्याज यासह ती मागणी ३५,००,०००/- इतक्या रुपयांची आहे.

ई.सन २०१९ Spl.CS चा दावा क्र.७६ या दाव्यात प्रविण देशमुख हा वादी असून निलेश भस्मे हा प्रतिवादी होता. या दाव्याचा न्यायनिर्णय अमरावती येथील ७ वे दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) न्यायाधीशांनी दिला आहे.

**ही विक्री जाहीर लिलावाद्वारे करण्यात येईल आणि ती मालमत्ता अनुसूचित निर्दिष्ट केल्याप्रमाणे** लाटस **विक्रीसाठी मांडण्यात येईल. उपरोक्त दाव्यातील न्यायनिर्णित ऋणकोची जी मालमत्ता पुढील अनुसूचीमध्ये नमुद करण्यात आली आहे, त्या मालमत्तेची विक्री केली जाईल आणि उक्त मालमत्तेशी संलग्न असलेली दायित्वे व तत्संबंधी मागण्या ज्या मर्यादेपर्यंत निश्चित करण्यात आल्या आहेत त्या मर्यादेपर्यंत त्या गोष्टी अनुसूचित प्रत्येक** लाटास **निर्देशित केल्या जाईल.**

ही विक्री पुढे ढकलण्यासंबंधी कोणताही आदेश झाला नसल्यास, ती विक्री अमरावती येथे दिनांक २७.१०.२०२६ रोजी १०.३० वाजता होणाऱ्या मासिक विक्रीच्या वेळी दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती यांच्यामार्फत केली जाईल. तथा कोणत्याही लाटाबाबतची बोली मंजूर होण्यापुर्वी जर उपरोक्त ऋणांची आणि विक्रीच्या खर्चाची रक्कम देऊ करण्यास भरण्यात आली, तर ती विक्री बंद करण्यात येईल.

विक्रीच्या वेळी आम जनतेपैकी कोणालाही, व्यक्तिशः किंवा रितसर अधिकृत केलेल्या एजंटामार्फत बोली बोलण्याची मुभा राहील. तथापि, उपरोक्त दाव्यातील न्यायनिर्णित धनकोंनी किंवा त्यांच्या वतीने बोललेली बोली स्विकारली जाणार नाही. तसेच न्यायालयाने यापुर्वी स्पष्टपणे परवानगी दिलेली असल्याखेरीज, त्या धनकोंना केलेली कोणतीही विधीग्राह्य (व्हॅलिड) ठरणार नाही. विक्रीच्या आणखी काही शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.

**विक्रीच्या शर्ती-**

१. खालील अनुसूचित नमुद केलेला तपशील हा न्यायालयाला असलेल्या अद्ययावत माहितीनुसार नमुद केलेला आहे. परंतु या जाहीरनाम्यात काही चूक असल्यास, चुकीचे विधान असल्यास किंवा एखादी गोष्ट गाळली गेली असल्यास त्याबाबत न्यायालय जबाबदार राहणार नाही.

२. दरवेळी बोली किती रकमेने वाढवावयाची हे विक्रीचे कामकाज पाहणारा अधिकारी ठरवील. बोलीच्या रकमेबाबत किंवा बोलीदाराबाबत वाद निर्माण झाला तर तो लाट ताबडतोब पुन्हा लिलावासाठी मांडला जाईल.

३. सर्वाधिक बोली बोलणाऱ्या बोलीदारास त्या लाटाचा खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल. मात्र, तो बोलीदार बोली बोलण्यास कायदेशीरपणे पात्र असला पाहिजे, आणि तसेच, सर्वाधिक बोलीमध्ये देऊ केलेली किंमत अत्यंत अपुरी असल्याचे स्पष्ट दिसून आल्याने ती बोली नाकारणे इष्ट ठरेल असे न्यायालयास किंवा विक्रीचे कामकाज पाहणाऱ्या अधिकाऱ्यास वाटल्यास, न्यायालय किंवा असा अधिकारी स्वविवेकानुसार ती बोली स्विकारण्यास नकार देऊ शकेल.

४. विक्रीचे कामकाज पाहणारा अधिकारी स्वविवेकानुसार आणि कारणे नमुद करुन विक्री तहकूब करु शकेल. परंतु तो अधिकार नेहमी ऑर्डर २१, नियम ६९ च्या उपबंधाच्या अधीन राहील.

५. जंगम मालमत्तेच्या बाबतीत पत्येक लाटाची किंमत विक्रीच्या वेळी द्यावी लागेल किंवा विक्रीचे कामकाज पाहणारा अधिकारी सांगेल त्याप्रमाणे विक्रीनंतर लवकरच भरावी लागेल, आणि अशी किंमत भरण्यास कसूर झाल्यास ती मालमत्ता पुन्हा ताबडतोब लिलाव करुन विकली जाइन.

६. स्थावर मालमत्तेच्या बाबतीत, ज्या व्यक्तीस खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल, त्या व्यक्तिने, अशी घोषणा झाल्यानंतर ताबडतोब आपल्या खरेदी किंमतीच्या २५ टक्के एवढी रक्कम, विक्रीचे कामकाज पाहणाऱ्या अधिकाऱ्याकडे अनामत म्हणून भरली पाहिजे. अशारितीने रक्कम भरण्यात कसूर झाल्यास ती मालमत्ता पुन्हा ताबडतोब लिलाव करुन विकली जाईल.

७. मालमत्तेची विक्री झाल्यापासून (विक्रीचा दिवस वगळता) पंधराव्या दिवशी न्यायालयाचे कामकाज बंद होण्यापुर्वी खरेदीदार खरेदी किंमतीची संपूर्ण रक्कम भरील किंवा पंधरावा दिवस हा रविवार अथवा सुटीचा दिवस असल्यास पंधराव्या दिवसानंतरच्या पहिल्या कामाच्या दिवशी अशी रक्कम भरण्यात येईल.

८. खरेदी किंमतीच्या उर्वरित रक्कम नेमून दिलेल्या मुदतीच्या आत भरण्यात कसूर झाल्यास, विक्रीची नवीन अधिसूचना काढून त्या मालमत्तेची पुन्हा विक्री करण्यात येईल. अशा प्रसंगी अनामत रकमेमधून विक्रीचा खर्च भागविल्यानंतर जी रक्कम शिल्लक राहील ती रक्कम, न्यायालयाला उचित वाटल्यास, सरकारजमा केली जाईल आणि कसूर करणाऱ्या खरेदीदाराचे त्या मालमत्तेसंबंधीचे किंवा ती मालमत्ता मागाहून जितक्या रकमेस विकली जाईल त्या रकमेच्या कोणत्याही भागासंबंधीचे सर्व मागणीहक्क नाहीसे होतील.

आज दिनांक / /२० रोजी माझ्या सहीनिशी आणि न्यायालयाची मोहोर लावून हा जाहीरनामा काढला आहे.

**न्यायाधिश**

धनकोतर्फे वकील श्री.शेंडे बी.एम., नि.क्र.३४ व ६८ वरील आदेशानुसार ऑर्डर २१ नियम ६६ अन्वये विक्रीचा जाहीरनामा प्रकरणात जोडलेल्या स्थावर मालाच्या यादीनुसार मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे--

**मालमत्तेचे वर्णन** ः-

मौजे-शिराळा भाग ३ प्र. ता.जि.अमरावती शेत सर्व्हे नं.६६५, क्षेत्रफळ १ हे.२५ आर. पैकी ३१.२५ आर, भोगवटदार-१, ज्याची चतुःसिमा पुढीलप्रमाणे--

**पुर्वेस** - गट क्र.६६८/१ श्री.ज्ञानेश्वर नामदेवराव पेढेकर यांचे शेत, **पश्चिमेस** - गट क्र.६४८/१ श्री.पंकज केशवराव वानखडे, रेणुका शाम धोटे, शाम ज्ञानेश्वरराव धोटे यांचे शेत, **उत्तरेस** - गट क्र.६६६ श्री.आदर्श अरविंद गंधे, नंदकुमार लक्ष्मणराव गंधे यांचे शेत व गट क्र.६६७, रस्त्याखालील क्षेत्र श्री.विनोद लक्ष्मणराव गोहत्रे व श्री.संजय लव्हाळे यांचे शेत, **दक्षिणेस** - गट क्र.६६४/१ श्री.निलेश भगवंतराव भस्मे, श्री.पवन भगवंतराव भस्मे, मंगेश भगवंतराव भस्मे, भगवंतराव दशरथजी भस्मे यांचे शेत व गट क्र.६६४/२ श्री.संतोष मोतीलालजी साहू यांचे शेत व गट क्र.६७० श्री.मनोज केशवराव वानखडे यांचे शेत.

शिक्का

**सहायक अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय, (व.स्तर), अमरावती**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# जिल्ह्यात अवैध व्यवसायात दररोज लाखोंची उलाढाल

## वरली लावणारे, पत्ते खेळणारे होतात कंगाल

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशीम जिल्ह्यात शहरी व ग्रामीण भागात खुलेआम सुरू असलेल्या अवैध व्यवसायामध्ये दररोज लाखोंची उलाढाल होत असल्याची चर्चा आहे. तर दुसरीकडे या अवैध धंद्याशी निगडित असलेल्या वरली मटका एक्का, बादशाह आणि पत्त्याच्या क्लब मध्ये दररोज अनेक लोक कंगाल होत असल्याचे भीषण वास्तव आहे.



जिल्ह्यातील सर्व अवैध व्यवसाय तातडीने बंद करण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षकांनी पुढाकार घेण्याची मागणी विविध स्तरातून होत आहे.

वाशिम जिल्ह्यात दोन महिन्यापूर्वी अवैध व्यवसाय लपून-छपून सुरू होते मात्र आता जिल्ह्यात सर्वत्र खुलेआम अवैध धंदे सुरू झाल्याने या अवैध व्यवसायाचा सर्वसामान्य जनतेला त्रास सहन करण्याची वेळ आली आहे. प्रामुख्याने वाशिम शहर, मंगरूळपीर शहर, रिसोड शहर, कारंजा शहर आणि मानोरा शहर या ठिकाणी प्रमुख रस्त्यावर व चौका चौकामध्ये अवैध धंद्याचे बस्तान बसले आहे. अशीच परिस्थिती ग्रामीण भागातील मोठ्या गावामध्ये असल्याचे विदारक दृश्य आहे वरली मटक्याचे माहेरघर असलेल्या मंगरूळपीर शहरात दररोज 'कथित मटका किंग' जवळ लाखो रुपयांचा वरली चा उतारा सुरू असतो हे सूर्यप्रकाशाएवढेच सत्य आहे. तर ज्या ठिकाणी क्लब सुरू आहेत त्या क्लब मध्ये सुद्धा दररोज लाखोंची उलाढाल होत असल्याची चर्चा आहे एक्का, बादशाह तितली भवरा या व्यवसायामध्ये सुद्धा लक्षणीय वाढ होत असल्याचे जनतेत चर्चा आहे. या अवैध व्यवसायामुळे झटपट श्रीमंत होण्याची स्वप्न पाहणारे शेकडो नागरिक दररोज कंगाल होत असल्याचे जनतेत चर्चा आहे जिल्ह्यात सुरू असलेले खुलेआम अवैध व्यवसाय त्वरित बंद करण्याची मागणी जनतेकडून होत आहे.

# माहेश्वरी भवनात एसटी स्मार्ट कार्ड शिबिर संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक सेवेत सक्रिय असणाऱ्या माहेश्वरी समाज ज्येष्ठ प्रकोष्ठ व माहेश्वरी समाज ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने माहेश्वरी समाजातील महिला-पुरुषांसाठी एसटी स्मार्ट कार्ड शिबिर संपन्न झाले.माहेश्वरी भवन येथे आयोजित या शिबिरात सर्वप्रथम प्रकोष्ठचे सहसचिव राजेंद्र चितलांगे यांनी प्रकोष्ठ अध्यक्ष सुरेश माहेश्वरी, उपाध्यक्ष प्रवीण मोहता, माहेश्वरी समाज ट्रस्टचे अध्यक्ष विजय तोषनीवाल, प्रधानमंत्री विजय राठी, प्रकोष्ठचे माजी अध्यक्ष प्रा. गोपीकिशन कासट,सल्लागार भगवानदास तोषनीवाल, रमनभाई लाहोटी, श्री मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष शरद चांडक, विदर्भ प्रादेशिक सभेचे अध्यक्ष प्रा. डॉ. रमन हेडा तसेच एसटी स्मार्ट कार्ड मार्गदर्शक नरेंद्र आडोले यांना मंचावर आमंत्रित केले.ईश्वर स्तुतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी स्मार्ट कार्डचे मार्गदर्शक नरेंद्र आडोले यांचे स्वागत सुरेश माहेश्वरी व विजय तोषनीवाल यांनी केले.

# शेतक-यांना ५० हजार, शेतमजुरांना २५ हजारांची तातडीची मदत द्या : रोहित पवार

■ कारंज्यात शेतकरी आक्रोश मोर्चा

■ सरकार शेतकरीविरोधी असल्याचा आरोप

■ प्रतिनिधी | कारंजा ■

राज्यातील शेतकरी व शेतमजूर गंभीर आर्थिक संकटात सापडले असताना शासनाने केवळ आश्वासनांचा खेळ न करता प्रत्यक्ष आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी कारंज्यात केली. शेतकऱ्यांना तातडीने ५० हजार रुपये, तर शेतमजुरांना २५ हजार रुपयांची मदत देण्याची मागणी त्यांनी केली.

कारंज्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवा नेते जायकर पाटणी यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी व शेतमजुरांचा आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाला आमदार रोहित पवार यांनी संबोधित केले. शासनाकडे विविध योजनांसाठी तसेच राजकीय व्यवस्थापनासाठी पैसा उपलब्ध असतो; मात्र संकटात सापडलेल्या शेतकरी व शेतमजुरांसाठी पैसा उपलब्ध होत नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

कर्जमाफीच्या शासन निर्णयात मोठ्या प्रमाणात अटी-शर्ती असल्याने प्रत्यक्षात शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याऐवजी कर्जमुक्तीलाच प्राधान्य मिळत असल्याची टीका पवार यांनी केली. २००८, २००९, २०१० आणि २०१३ या कालावधीत झालेल्या कर्जमाफीचा संदर्भ देत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.



यंदा अतिवृष्टी किंवा पावसातील अनियमिततेचा धोका निर्माण होऊ शकतो, याची पूर्वकल्पना असतानाही शासनाने आवश्यक नियोजन केले नाही, असा आरोपही त्यांनी केला. शेतकऱ्यांना पीकविमा, कर्जमाफी आणि आर्थिक मदतीचा तातडीने निर्णय मिळावा, अशी मागणी त्यांनी केली.

बोगस बियाणे, खत-बियाण्यांचे वाढते दर, वाढता उत्पादन खर्च आणि शेतमालाला मिळणारा कमी भाव यामुळे शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला असल्याचे पवार यांनी नमूद केले. विशेषतः सोयाबीन व कापसाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने परिस्थिती अधिक गंभीर झाल्याचे त्यांनी सांगितले.

मोर्चादरम्यान शेतकरी व शेतमजुरांच्या विविध मागण्यांचे निवेदन शासनाकडे देण्यात आले. तसेच सरकारने शेतकरी व शेतमजुरांच्या मागण्यांकडे गांभीर्याने पाहून तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.ष्मोर्चाला माजी आमदार अनंतराव पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य ज्योतीताई गणेशपुरे, शेतकरी नेते दामूअण्णा इंगोले, सुनील देशमुख यांच्यासह महाविकास आघाडीतील विविध घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अँड ज्ञायक पाटणी यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात शेतकरी व शेतमजुरांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत शासनाच्या शेतकरी धोरणाविरोधात आक्रोश व्यक्त केला.

## २३ सप्टेंबर रोजी मुंगीलालच्या गरबा महोत्सवाचे भूमिपूजन

**अकोला :** श्री गुजराती सेवा समितीच्या वतीने मुंगीलाल बाजोरिया विद्यालयाच्या प्रांगणात गत अनेक वर्षापासून सेवारत गरबा महोत्सवाचे भूमिपूजन बुधवार दिनांक २३ सप्टेंबर रोजी स १० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आले आहे. रविवार दिनांक ११ ऑक्टोंबर ते सोमवार दिनांक १९ ऑक्टोबर पर्यंत नित्य सायं ७ वाजता पासून प्रारंभ होणाऱ्या मुंगीलालच्या गरबा महोत्सवाच्या संदर्भात बुधवारी राधाकिसन प्लॉट येथील अंबामाता मंदिरात समितीची नियोजन बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली. समितीचे अध्यक्ष वालजीभाई पटेल यांच्या अध्यक्षतेत संपन्न या बैठकीत समितीचे हरीश लाखानी,अ भा गुजराती समाजाचे महाराष्ट्र गोवा उपाध्यक्ष हेमेन्द्र राजगुरू,मनोज भीमजीयानी,आशिष वखारीया, दिनूभाई सोनी,सौ शितलबेन रुपारेल आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# कोरडा दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, सरसगट कर्जमाफी करण्यात यावी,पिक विमा ताबडतोब देण्यात यावा आदी मागण्यासाठी मानोरा येथे बुधवारी दि. १६ सप्टेंबर रोजी तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा काढण्यात आला. पंचायत समिती जवळून हा मोर्चा शहरातील दिग्रस चौक ते मुख्य मार्गाने निघाला.तहसील कार्यालयावर मोर्चाचे सभेत रुपांतर झाले.

या सभेच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार अनंतकुमार पाटील होते. तर अन्न औषध प्रशासन विभागाचे प्रमुख तुकाराम मुंढे आणि युवकांचे प्रश्न मांडणारे युवा नेते अभिजित दिपके यांच्या उल्लेखनीय कार्या बद्दल त्यांचा प्रतिमेला सभेत दुग्धभिषेक करण्यात आला. प्रस्तावित भाषण उद्धव ठाकरे शिवसेनेचे तालुका अध्यक्ष रवी पवार यांनी केले. बाळासाहेब डेरे,मारोती पारधी,डॉ. विठ्ठलराव घाडगे,बाबूसिंग नाईक,फकीर बाबा रमेश महाराज,



बाजार समितीचे सभापती डॉ संजय रोठे,संचालक अकोला वाशिम को बँक अरविंद पाटील इंगोले, युवा नेते ॲड. ज्ञायक पाटणी,गजानन पवार, जिल्हा अध्यक्ष काँग्रेस कमिटी राजू चौधरी, माजी वीज मंडळ सदस्य अनिल राठोड,माजी आमदार अनंतकुमार पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. पावसाने खंड दिल्याने खरीप हंगाम धोक्यात आला असून शेतकरी यांचे मोठे नुकसान झाले आहे.कोरडा दुष्काळ जाहीर करून आर्थिक मदत मिळाली पाहिजे. २ ऑक्टोबर पर्यंत मानोरा,कारंजा तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर झाला नाही तर तहसील कार्यालयावर महात्मा गांधी यांच्या जयंती च्या दिवशी आमरण उपोषण सुरू करणार. असे मत सभेचे अध्यक्ष माजी आमदार अनंतकुमार पाटील यांनी मोर्चाला संबोधित करताना व्यक्त केले.

या वेळी काही शेतकऱ्यांनी शेतातील सोयाबीन पिकाची तहसील कार्यालया समोर होळी करून सरकार विरोधी घोषणा देऊन आपल्या भावना शासन दरबारी मांडल्या या वेळी तालुका काँग्रेस चे अध्यक्ष रामनाथ राठोड, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष काशीराम राठोड,काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष इफ्तेखार पटेल,प्रकाश राठोड,माजी नगराध्यक्ष बरखा बेग,महिला काँग्रेसच्या नंदाताई तायडे, डॉ. अशोक करसडे,बाजार समितीचे संचालक

सुनील जामदार, मधुसूदन राठोड, ठाकुरसिंग चव्हाण,संजय पवार,गोपाल शर्मा,बाळू राठोड,बाजार समितीचे उपसभापती भुजंगराव राठोड,हुसेन भाई,दिलीप ठाकरे आदी शेकडो शेतकरी उपस्थित होते.

## जिल्ह्यात आजपासून 'सेवा संकल्प अभियान'

**अकोला :** केंद्र शासनाच्या निर्देशानुसार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत विविध उपक्रमांतून नागरिकांना सेवांचा लाभ मिळवून द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले.

सेवा संकल्प अभियानाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या.

# रिसोड बसस्थानकातुन दुचाकी चोरी

■ प्रतिनिधी | रिसोड ■

पाहुण्याला बस स्टँड वर बस मध्ये बसवून सोडण्यासाठी गेलेल्या एका व्यक्तीची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना दिनांक १३ सप्टेंबर रोजी संध्याकाळी सहा वाजताच्या दरम्यान रिसोड बस स्टॅन्ड येथे घडली. या घटनांनंतर बस स्टँड परिसरातिल होत असलेल्या चोऱ्यांवर आळा बसवीण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात असून या ठिकाणी कायमस्वरूपी पोलीस कर्मचारी ठेवण्यात यावा अशी मागणी जोर धरत आहे. याप्रकरणी दिनांक १४ सप्टेंबर रोजी रिसोड शहरातील पठाणपुरा भागातील असलम खान मन्नान खान यांनी रिसोड पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की ते दिनांक १३ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ५:३० वा हिरो होंडा स्प्लेंडर प्लस दुचाकी क्रमांक एम एच ३८ के ६०७२ ने आपल्या पाहुण्याला सोडण्यासाठी बस स्टैंड वर गेले या वेळी त्यांनी आपली दुचाकी बस स्टॅन्ड चे नवीन बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी उभी केली. बसला थोडा वेळ असल्याकारणाने ते बस स्टैंड



वर बसची वाट पाहत होते या दरम्यान त्यांची बस संध्याकाळी ६:४५ वा वाजता आली या दरम्यान त्यांनी आपले पाहुण्याला बसवून रवाना केले व दुचाकी असलेल्या ठिकाणी आले असता त्यांना आपली दुचाकी दिसून आली नाही. त्यांनी शोध घेतला व ११२ वर कॉल करून त्यांनी पोलिसांना सुद्धा याबाबतची माहिती दिली. पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली दुचाकी बाबत शोध घेतला मात्र ती कुठेही आढळून आली नाही. रिसोड पोलिसांनी आज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## हनुमानअंश चित्रपटाचे मोफत प्रदर्शन; ४०० प्रेक्षकांनी घेतला आनंद



■ प्रतिनिधी | अकोला ■

ऋषिपंचमीनिमित्त श्री राम दरबार सुंदरकांड मंडळाच्या वतीने नागरिक व युवकांसाठी हनुमानअंश चित्रपटाचे दुसरे मोफत प्रदर्शन मंगळवार, १५ सप्टेंबर रोजी वसंत टॉकीज येथे आयोजित करण्यात आले. नागरिकांमध्ये आध्यात्मिक भाव जागृत करण्यासोबतच मनोरंजन आणि सामाजिक सहभागाला प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता.

या प्रदर्शनाला सुमारे ४०० नागरिक व युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत चित्रपटाचा आनंद घेतला. प्रेक्षकांची मोठी उपस्थिती असल्याने कार्यक्रम हाऊसफुल्ल झाला. यावेळी उपस्थितांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. आयोजकांनी सांगितले की, समाजातील विविध घटकांतील नागरिकांना एकत्र आणणे तसेच सनातन धर्माबद्दल जागरूकता आणि सहभाग वाढविणे, हा या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे. भविष्यातही अशाच प्रकारचे सामाजिक व सामुदायिक कार्यक्रम मोठ्या स्तरावर आयोजित करण्याचा संकल्प मंडळाच्या वतीने व्यक्त करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सदस्यांचे योगदान लाभले. यावेळी राजेश दिनोदिया, ऋषिकेश श्रीवास्तव, यश सावल, मनन शाह, गोविंद शर्मा, प्रेम तले, अंश शाह, मिहिर मलकान, अश्विन मिटकरी, जय मलकान, आदर्श ठाकूर, देवदत्त दिनोदिया, अभिषेक श्रीवास्तव, सुनारीवाल, महेश दिनोदिया यांच्यासह अनेक सहकारी व मित्रमंडळी उपस्थित होती.

# गणेशोत्सवातून सामाजिक दायित्वाचा संदेश

## श्री बजरंग गणेश उत्सव मंडळाच्या १०१ व्या वर्षानिमित्त सर्वधर्मीय आरोग्य तपासणी शिबिर

■ प्रतिनिधी | कारंजा ■

भक्ती, श्रद्धा आणि उत्सवाला सामाजिक सेवेची जोड देत श्री बजरंग गणेश उत्सव मंडळ, बजरंग पेठ, कारंजा यांच्या वतीने मंडळाच्या १०१ व्या वर्षानिमित्त सर्वधर्मीय आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन गणेश मंडपात करण्यात आले. या उपक्रमाला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या आरोग्य शिबिराचे उद्घाटन आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे सर्वधर्म मित्र मंडळाचे अध्यक्ष तथा उपजिल्हा रुग्णालय, कारंजा येथील रुग्ण कल्याण समिती सदस्य श्याम रामदास सवाई तसेच आमदार सईताई डहाके यांनी नामनिर्देशित केलेले रुग्ण कल्याण समिती सदस्य संतोष धोंगडे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक गणेश यंदे व संजय गुप्ता, तसेच नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र, कारंजा येथील डॉ. समीक्षा वानखडे, डॉ. हेमा मुंदडा, आरोग्य सेवक सचिन मुंडे, आरोग्य सेवक अविनाश वानखडे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ आशा गुडदे, आशा स्वयंसेविका स्वाती इंगळे, सुषमा धकाकते, योजना सिंदरकर, आरोग्य सेवक प्रणव वडनेरकर आणि आयुष्मान भारत अभियानाचे किशोर खडसे उपस्थित होते.

गणेशोत्सवाच्या काळात भाविकांसह परिसरातील नागरिकांच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन या शिबिरात विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. नागरिकांना आवश्यक आरोग्यविषयक मार्गदर्शन देतानाच पुढील उपचारासाठी योग्य सल्ला देण्यात आला. गरजेनुसार रुग्णांना औषधांचाही पुरवठा करण्यात आला. तसेच आयुष्मान भारत कार्ड काढण्यासाठी नागरिकांना मार्गदर्शन व सहकार्य करण्यात आले.

**'गणेशोत्सव सामाजिक दायित्वाचा उत्सव बनला पाहिजे'**

यावेळी बोलताना श्याम रामदास सवाई यांनी गणेशोत्सवातून सामाजिक सेवेचा संदेश देण्याची गरज व्यक्त केली. 'गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक दायित्वाचा उत्सव बनला पाहिजे. आरोग्याच्या समस्या लक्षात घेऊन गणेश मंडळाने आरोग्य शिबिराच्या माध्यमातून रुग्णसेवेची सुरुवात करणे ही प्रेरणादायी बाब आहे.


## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार भारतीय स्टेट बँक यांच्या कडून श्री दादाराव श्यामराव थोरात व सुनिता दादाराव थोरात हे त्यांच्या मालकीचे मौजे भिलखेडा, ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथील शेत सर्व्हे / गट नंबर ४१/२ मधील प्लॉट नंबर १८ याचे एकंदर क्षेत्रफळ १४५.३२ चौरस मीटर जागेवर कर्ज घेत आहे. परंतु सदर प्लॉटचा मूळ खरेदीखताचे दस्ता कारंजा दुय्यम निबंधक कार्यालया मध्ये नोंदविला असून त्याच दस्त क्र. २०५५/२०२१ अन्वये दिनांक १९/०३/२०२१ हा आहे, या मूळ खरेदीखताच्या दस्ता मधील पेन क्र. ६ व १२ हा दिनांक ०१/०६/२०२६ रोजी त्याच्या राहते घरून म्हणजेच यादगार नगर कारंजा (लाड), ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथून गहाळ झाले असुन, त्या स्वरूपाची तक्रार त्यांनी पोलीस स्टेशन कारंजा (शहर) ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथे दिनांक ११/०८/२०२६ रोजी दिली असून त्याचा साना क्र. २९/२६ असा आहे.

तरी सदरहू वरील क्रमांकाचे मुळ खरेदीखताबाबत कोणाला कोणत्याही प्रकार दावा अथवा इतर अधिकार असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसाचे आंत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा जर विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाच्या मुळ खरेदीखता मधील पेज क्र. ६ व १२ कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर ८ दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी. करीता ही जाहीर नोटीस.

शिक्का

सही
**ॲड. व्ही. व्ही. ठाकरे**
शॉप नं. एल १०, वर्धमान प्लाझा, स्टेट बँक समोर, कारंजा (लाड), जि. वाशीम
मो. नं. ९७६६८८०७६४, ९१४६०४८३१४


# सोयाबीन सुकले, शेतक-यांचे स्वप्नही भंगले!

## रिसोड तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची आर्त हाक

### शेतकऱ्यांची मागणी 'हेक्टरी १ लाखांची मदत द्या!'

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड तालुक्यात पावसाने मागील दीड महिन्यापासून दडी मारल्याने खरीप हंगामातील पिकांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. अनेक भागांत सोयाबीनसह इतर पिके पाण्याअभावी करपून गेली. असल्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातून यंदाचा हंगाम अक्षरशः निघुन गेला आहे. शेतकऱ्याने शेतात लावलेला खर्च सुद्धा निघालेला नाही, त्यामुळे रिसोड तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना किमान १ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी, अशी जोरदार मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

यंदाच्या खरीप हंगामात सुरुवातीला पावसाने चांगली हजेरी लावल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरणी केली. मात्र त्यानंतर पावसाने दीर्घ विश्रांती



घेतल्याने पिकांना निर्णायक अवस्थेत पाण्याचा ताण बसला. शेतातील सोयाबीनची पाने पिवळी पडून झाडे सुकून गेली आहेत. काही ठिकाणी तर संपूर्ण पिकचं उध्वस्त झाला आहे. त्यामुळे ८० टक्के उत्पादनात घट होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. यातून शेतकऱ्याचा खर्च सुद्धा निघणार नाही.

तसेच बियाणे, खत, मशागत, मजुरी आणि औषधांवर मोठा खर्च करूनही हातात काहीच उरणार नाही, अशी चिंता शेतकरी व्यक्त करीत आहेत. आधीच वाढलेला उत्पादन खर्च, बाजारातील अनिश्चित दर आणि आता पावसाच्या दडीमुळे शेतकरी आर्थिक संकटाच्या कचाट्यात सापडला आहे.

**पंचनामे करून तातडीने मदत द्या**

पावसाअभावी बाधित झालेल्या गावांमध्ये प्रशासनाने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून पिकांचे पंचनामे करावेत. केवळ कागदोपत्री पाहणी न करता प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करावे, अशी मागणी होत आहे. शेतकऱ्यांना आर्थिक मदतीसोबतच पीकविमा नुकसानभरपाई, कर्जाच्या परतफेडीबाबत सवलत आणि आगामी हंगामासाठी आवश्यक मदत उपलब्ध करून देण्याचीही मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे. 'आता मदत मिळाली नाही तर पुढचा हंगाम कसा करायचा?' हा प्रश्न तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. त्यामुळे शासनाने या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन रिसोड तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा आणि हेक्टरी १ लाख रुपयांची मदत मंजूर करावी, अशी आर्त हाक शेतकरी देत आहेत.

**हरिभाऊ नारायण बाजड** (शेतकरी)

**शेतकऱ्याची आर्त हाक**

'पेरणीपासून आतापर्यंत मोठा खर्च केला. पिके चांगली येतील, कर्ज फेडता येईल आणि घरखर्च भागेल, अशी अपेक्षा होती. मात्र पाऊस नसल्याने सोयाबीन पूर्णपणे सुकत आहे. आता हातात उत्पादन येण्याची शक्यता कमी झाली आहे. शासनाने परिस्थितीची तातडीने पाहणी करून रिसोड तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना हेक्टरी किमान १ लाख रुपयांची मदत द्यावी.'

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २९१ ■ गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## जिल्ह्यात सेवा संकल्प अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करा- जिल्हाधिकारी वान्मथी सी

### १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान सेवा संकल्प अभियान

**वर्धा जनमाध्यम :** सर्वसामान्य नागरिकांपर्यंत शासकीय योजना व सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाची सर्व विभागांनी समन्वयाने व प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. तालुकास्तरावर शिबिरांचे आयोजन करून नागरिकांच्या प्रलंबित कामांचा निपटारा करावा तसेच जास्तीत जास्त नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा, अशा सूचना जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी दिल्या.

जिल्ह्यात सेवा संकल्प अभियानाच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, अपर जिल्हाधिकारी संजय तेली, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपजिल्हाधिकारी प्रताप वाघमारे, श्रीपती मोरे, अनिल गावित, जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.ज्ञानदा फणसे, मनिषा कुरसंगे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्निल बेले, सहाय्यक आयुक्त अंकेश केदार, जिल्हा नियोजन अधिकारी ज्ञानेश्वर खडतकर यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

अभियानाच्या कालावधीत सर्व तालुक्यांच्या ठिकाणी सेवा शिबिरांचे आयोजन करण्यात यावे. या शिबिरांमध्ये नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती देतानाच प्रलंबित दाखले व प्रमाणपत्रांचे वितरण करावे. नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांचे शक्य तितक्या जलदगतीने निराकरण करण्यावर भर द्यावा, असे जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी सांगितले.



अभियान केवळ शासकीय सेवा व योजनांपुरते मर्यादित न ठेवता स्वच्छता, सामाजिक बांधिलकी, डिजिटल साक्षरता, सायबर सुरक्षा आणि रस्ते सुरक्षा यांसारख्या विषयांवरही विविध उपक्रम राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. जिल्ह्यात स्वच्छता मोहीम राबवून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करावी. तसेच अनाथालये व वृद्धाश्रमांना भेट देऊन तेथील नागरिकांशी संवाद साधावा, त्यांच्या गरजा जाणून घ्याव्यात, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

नागरिकांमध्ये प्लास्टिकचा वापर कमी करण्याबाबत जनजागृती करण्यात यावी. ज्येष्ठ नागरिकांसाठी डिजिटल साक्षरता उपक्रम आयोजित करून त्यांना आवश्यक डिजिटल व्यवहारांची माहिती द्यावी. त्याचप्रमाणे वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना सायबर फसवणुकीपासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक खबरदारीची माहिती तसेच रस्ते सुरक्षा अभियानालाही विशेष प्राधान्य देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

गावभेटी, सेवा शिबिरे, विभागनिहाय उपक्रम आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत. स्थानिक उत्पादने, स्थानिक उद्योजक आणि कारागिरांना प्रोत्साहन देण्यासाठी व्होकल फॉर लोकल उपक्रम प्रभावीपणे राबवावा. प्रत्येक विभागाने अभियानांतर्गत राबविलेल्या उपक्रमांची माहिती, लाभार्थ्यांचा तपशील आणि योजनांच्या लाभाची आकडेवारी नियमितपणे संकलित करावी. कामाच्या प्रगतीचा डेटा अद्ययावत ठेवावा, अशा स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांनी महिनाभर लोककल्याणकारी उपक्रम राबवावे. या काळात जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत विविध योजना कशा पोहोचतील याबाबत नियोजन करण्याच्या सूचना केल्या. बैठकीला दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, गटशिक्षणाधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## काँग्रेसला रामराम, राजेंद्र शर्मा यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**वर्धा जनमाध्यम :** काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक वाटचालीत अनेक वर्षे सक्रिय राहिलेले ज्येष्ठ नेते राजेंद्र शर्मा यांनी काँग्रेसला रामराम करीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. त्यांच्या या निर्णयामुळे वर्ध्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.



राजेंद्र शर्मा यांनी महाविद्यालयीन जीवनापासून काँग्रेस पक्षाच्या विविध संघटनात्मक जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. वर्धा शहर काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष तसेच वर्धा जिल्हा सेवादलाचे माजी अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. पुलोदपासून त्यांच्या राजकीय प्रवासाला सुरुवात झाली होती. दीर्घकाळ काँग्रेसशी नाळ जोडलेल्या शर्मा यांनी आता नव्या राजकीय वाटचालीचा निर्णय घेतल्याने त्यांच्या समर्थकांमध्येही उत्सुकता निर्माण झाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत शर्मा यांनी पक्षप्रवेश केला. यावेळी प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे. माजी गृहमंत्री अनिल देशमुख. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील तसेच माजी मंत्री फौजिया खान यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी शर्मा यांचे स्वागत करून पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी शहर काँग्रेस कमिटीचे सचिव प्रमोद पोतदार आणि अब्दुल रशीद सगीर यांनीही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. शर्मा यांच्या प्रवेशाचे विविध स्तरातून स्वागत होत असून त्यांच्या नव्या राजकीय पर्वाकडे वर्ध्याचे लक्ष लागले आहे.

## सावली वाघ येथे २७ वर्षीय निलेशचा गोठ्यात गळफास; कुटुंबावर दुःखाचा डोंगर

**गाढेगाव जनमाध्यम:** हिंगणघाट तालुक्यातील सावली वाघ गावातून एक अत्यंत हृदयद्रावक घटना समोर आली आहे. येथील अवघ्या २७ वर्षांच्या निलेश देवराव डुकरे या तरुणाने राहत्या घराजवळील गोठ्यात गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. ऐन उमेदीच्या वयात निलेशने उचललेल्या या टोकाच्या पावसामुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून कुटुंबावर आभाळ कोसळले आहे.

निलेशचा मृतदेह गोठ्यात लटकलेल्या अवस्थेत आढळून आल्याने गावात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलिस पाटील विशाल ढेगळे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पोलिसांना पाचारण केले.

माहिती मिळताच हिंगणघाट पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेहाचा पंचनामा केला आणि मृतदेह उत्तरिय तपासणीसाठी (पोस्टमार्टन) शासकीय रुग्णालयात रवाना केला. याप्रकरणी पोलिसांनी सध्या आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, तरुणाने हे टोकाचे पाऊल का उचलले, याचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

## नायरा पेट्रोल पंपाजवळ दुचाकी घसरली, तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

### अपघात नेमका घसरल्याने की अज्ञात वाहनाच्या धडकेने

#### सेलू पोलिसांचा तपास सुरू

**सेलू जनमाध्यम :** शहरातील विकास चौक परिसरातील नायरा पेट्रोल पंपासमोर मंगळवारी १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ७.१५ वाजताच्या सुमारास दुचाकीचा अपघात झाला. या अपघातात रितेश गजानन कुडमते यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार रितेश कुडमते हे खडकी येथून पत्नीला आणण्यासाठी हिरो कंपनीच्या युनिकॉर्न दुचाकी क्रमांक एमएच ३२ एवाय ९२२३ ने सेलूकडे येत होते. त्यांची पत्नी सेलू पोलिस ठाण्यासमोर सुरू असलेल्या महासेलमध्ये कार्यरत असल्याची माहिती आहे.



दरम्यान विकास चौकातील नायरा पेट्रोल पंपासमोर त्यांच्या दुचाकीचा अपघात झाला. प्रत्यक्षदर्शींना मोठ्या आवाजाने धडक झाल्यासारखा आवाज ऐकू आला. त्यामुळे दुचाकी घसरून अपघात झाला की अज्ञात वाहनाने धडक दिली याबाबत संभ्रम आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून सेलू पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

अपघातात रितेश यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमी अवस्थेतील रितेश यांना उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय सेलू येथे दाखल करण्यात आले. मात्र कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्यांना मृत घोषित केले.

रितेश कुडमते यांच्या मृत्यूची वार्ता समजताच कुडमते कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. परिसरात शोककळा पसरली आहे. अपघाताच्या घटनेचा पुढील तपास ठाणेदार पंकज वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सेलू पोलिस करीत आहेत.

## व्यापारी संकुल मंजूर पण आर्वीचा व्यापार वाढणार कसा

### आठ वर्षांपासून रस्ता रखडला, एमआयडीसीचा पत्ता नाही, रेल्वेची प्रतीक्षा कायम, आर्वीकरांचा आमदारांना थेट प्रश्न

**आर्वी जनमाध्यम :** आर्वी नगरपरिषदेला व्यापारी संकुल उभारण्यासाठी ६२४०.३० चौ.मी. शासकीय जमीन विनामूल्य देण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे संकुलाच्या उभारणीचा मार्ग मोकळा झाला असला तरी आर्वीच्या बाजारपेठेला खऱ्या अर्थाने चालना मिळणार कधी असा प्रश्न आता आर्वीकरांकडून उपस्थित होत आहे.

आमदार सुमित वानखेडे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निकटवर्तीयांपैकी असल्याचे राजकीय वर्तुळात सांगितले जाते. त्यामुळे त्यांच्या मतदारसंघातील रस्ते रोजगार उद्योग आणि दळणवळणाच्या प्रश्नांवर आता अधिक प्रभावी पाठपुराव्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

गेल्या आठ वर्षांपासून आर्वी तळेगाव मार्गाचा प्रश्न प्रलंबित असल्याचा दावा स्थानिक व्यापारी आणि नागरिक करीत आहेत. या मार्गाच्या प्रश्नामुळे मालवाहतूक शेतमालाची ने आण आणि ग्राहकांची ये जा यावर परिणाम होत असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

दुसरीकडे आर्वीत एमआयडीसी किंवा मोठ्या उद्योगांची उभारणी झालेली नसल्याने रोजगाराच्या संधी मर्यादित आहेत.

तरुण रोजगारासाठी बाहेर जात असताना स्थानिक बाजारपेठेत पैसा आणि ग्राहकांची उलाढाल वाढणार कशी असा सवाल व्यापारी उपस्थित करीत आहेत.

रेल्वे जोडणीसह ग्रामीण भागातील रस्त्यांचा प्रश्नही कायम असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. गावखेड्यांमधून आर्वीच्या बाजारपेठेत येणाऱ्या ग्राहकांची संख्या वाढवण्यासाठी मजबूत दळणवळण आवश्यक आहे.

व्यापारी संकुल ही स्वागतार्ह बाब आहे. मात्र त्यासोबत रस्ते उद्योग रोजगार आणि ग्रामीण संपर्काचा विकास झाला तरच या संकुलाचा खऱ्या अर्थाने उपयोग होईल अशी भूमिका व्यापारी आणि नागरिकांकडून मांडली जात आहे.

त्यामुळे आमदार सुमित वानखेडे आता या प्रश्नांसाठी कोणती ठोस पावले उचलतात याकडे आर्वीकरांचे लक्ष लागले आहे.

## कत्तलीसाठी गोवंश कोंबून नेले; अपघातात ९ जनावरांचा मृत्यू

### वाहन उलटले; ९ जनावरांचा मृत्यू, ३.४० लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** कत्तलीसाठी गोवंशाची निर्दयीपणे वाहतूक करणारे मालवाहू वाहन चिस्तूरजवळ उलटल्याने नऊ गोवंशांचा मृत्यू झाला. चार जनावरे जखमी झाली असून वाहनचालकही जखमी झाल्याची माहिती आहे. नागपूर अमरावती महामार्गावरील आष्टी शहीदजवळ चिस्तूर येथे मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली.



एमएच १४ ईएम ४३१७ क्रमांकाच्या वाहनातून गोवंशाची वाहतूक केली जात होती. अमरावती जिल्ह्यातील सुफियानगर येथील मोहम्मद इस्त्राईल नूर मोहम्मद वय ३५ हा वाहन चालवत होता. मुस्तकीम शाह शफाकत शाह वय ३० हा क्लिनर होता. चिस्तूरजवळ रामदेव ढाब्याजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन उलटले आणि चालक वाहनाखाली दबला.

ढाबा चालक लुबांराम दरगुडा यांनी तळेगाव पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जेसीबीच्या मदतीने वाहन सरळ करून चालकाला बाहेर काढण्यात आले. वाहनाची तपासणी केली असता तब्बल १३ गोवंश क्रूरपणे बांधून ठेवल्याचे समोर आले.

पशुधन विकास अधिकाऱ्यांनी तपासणी केली असता नऊ गोवंश मृत तर चार जखमी असल्याचे स्पष्ट झाले. जखमी जनावरांना उपचारासाठी पाठविण्यात आले. पोलिसांनी चार गोवंश आणि वाहनासह तीन लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून गुन्हा दाखल केला आहे. तळेगाव पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## झोपेत सर्पदंश, चिमुकला भावेश कायमचा हरपला

**आष्टी शहीद जनमाध्यम:** झोपेतच सर्पदंश झाल्याने आठ वर्षीय भावेश नितीन कौरती याचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. धाडी येथे घडलेल्या या हृदयद्रावक घटनेने कौरती कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.



भावेश रात्री वडिलांसोबत घरात झोपला होता. मध्यरात्रीच्या सुमारास त्याला सर्पदंश झाला. त्याने वडिलांना याची माहिती दिल्यानंतर कुटुंबीयांनी अंथरुणाची पाहणी केली असता साप आढळून आला. घाबरलेल्या कुटुंबीयांनी शेजाऱ्यांच्या मदतीने भावेशला तातडीने साहूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तेथे डॉक्टर प्रणय भोंड यांनी प्राथमिक उपचार केले. मात्र प्रकृती गंभीर झाल्याने भावेशला पुढील उपचारासाठी अमरावती येथील इर्विन शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. उपचार सुरू असतानाच त्याने अखेरचा श्वास घेतला. भावेशच्या पश्चात आई वडील आणि अडीच वर्षांचा लहान भाऊ असा परिवार आहे. चिमुकल्याच्या अकाली निधनाने कुटुंबीयांचा आक्रोश मन हेलावून टाकणारा ठरला. स्थानिक स्मशानभूमीत भावेशवर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. पावसाळ्यानंतर सर्पदंशाचा धोका वाढत असल्याने नागरिकांनी घराचा परिसर स्वच्छ ठेवून सर्पदंश झाल्यास तातडीने रुग्णालयात उपचार घ्यावेत.

## वेतनश्रेणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा काळ्या फितीने एल्गार

### वर्धा आणि सेलू न्यायालयातील कर्मचाऱ्यांचा शासनाविरोधात निषेध, १७ महिन्यांच्या पाठपुराव्यानंतरही मागणी प्रलंबित

**वर्धा जनमाध्यम :** उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रातील दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांनाही समान वेतनश्रेणी लागू करावी या प्रमुख मागणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी शासनाविरोधात आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात बुधवारी १६ सप्टेंबर रोजी वर्धा जिल्हा न्यायालय तसेच सेलू येथील दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तरातील कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून निषेध नोंदविला.



कार्यालयीन वेळेपूर्वी कर्मचारी एकत्र आले. काळ्या फिती लावून त्यांनी प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. समान कामासाठी समान वेतनश्रेणी मिळावी ही कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. न्यायव्यवस्थेच्या दैनंदिन कामकाजात महत्त्वाची जबाबदारी पार पाडूनही वेतनश्रेणीचा प्रश्न प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने गेल्या १७ महिन्यांपासून या मागणीसाठी कायदेशीर आणि प्रशासकीय पाठपुरावा सुरू असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले. पहिल्या टप्प्यात काळ्या फितीने निषेध करण्यात आला असून १६ आणि १७ ऑक्टोबर रोजी आंदोलनाचा दुसरा टप्पा होणार आहे. काळ्या फितीमागे शांततामय आंदोलनाचा निर्धार असला तरी मागणी पूर्ण होईपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला.

## भरती परीक्षा पद्धतीतील सुधारणांवर थेट संवाद

### उच्चस्तरीय समितीसमोर पूर्व विदर्भातील परीक्षार्थींनी मांडल्या अडचणी आणि सूचना

**नागपूर जनमाध्यम :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पद्धतीत आवश्यक सुधारणा करण्यासह राज्यातील शासकीय भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक सुरक्षित विश्वासार्ह आणि उमेदवारकेंद्रीत करण्याच्या दृष्टीने बुधवारी पूर्व विदर्भातील विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधण्यात आला. सदर येथील जिल्हा नियोजन भवनात उच्चस्तरीय समितीच्या अध्यक्ष तथा अपर मुख्य सचिव सेवा व्ही. राधा आणि समितीच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांच्या अडचणी अपेक्षा आणि सूचना जाणून घेतल्या. यावेळी पूर्व विदर्भातील स्पर्धा परीक्षा परीक्षार्थी पालक शिक्षक शैक्षणिक संस्था कोचिंग क्लासेस अभ्यासिका चालक आणि नागरिक उपस्थित होते.



राज्याचे पोलीस महासंचालक तथा समितीचे सदस्य सदानंद दाते समितीचे सदस्य सचिव तथा पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आयआयटी मुंबईचे प्रा. श्यामप्रसाद करगड्डे नागपूर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आदी उपस्थित होते. इलेक्ट्रॉनिक्स माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह तसेच संघ लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य एअर मार्शल अजित भोसले दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले.

परीक्षांचे वेळापत्रक परीक्षा केंद्रांची उपलब्धता अभ्यासक्रमातील बदल प्रश्नपत्रिकेची गुणवत्ता परीक्षा आयोजनातील पारदर्शकता निकाल जाहीर करण्यासाठी लागणारा कालावधी तसेच भरती प्रक्रियेतील विविध टप्प्यांबाबत विद्यार्थ्यांनी सूचना मांडल्या. ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी परीक्षा केंद्रांचे नियोजन डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर आणि उमेदवारांना वेळेवर माहिती उपलब्ध करून देण्याबाबतही चर्चा झाली.

परीक्षा प्रक्रियेत गैरप्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचनाही विद्यार्थ्यांनी केल्या. उच्चस्तरीय समितीच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या सूचना जाणून घेतल्या. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या विविध मुद्द्यांची समितीने नोंद घेतली.

## १६० वर्षांची भक्तीची परंपरा आजही अखंड

### महाबळा ग्रामस्थांची सिद्धिविनायक चरणी श्रद्धा, दोन गावांच्या ऐक्याचा अनोखा सोहळा

**सेलू जनमाध्यम :** केळझर येथील सिद्धिविनायक गणपती मंदिरात गणेशोत्सवानिमित्त महाबळा ग्रामस्थांची १६० वर्षांपासून सुरू असलेली धार्मिक परंपरा यंदाही उत्साहात पार पडली. पिढ्यानपिढ्या जपल्या गेलेल्या या परंपरेत संपूर्ण गाव सहभागी होत असून भक्तीबरोबरच दोन गावांतील सामाजिक ऐक्याचे दर्शन घडते.

ऋषिपंचमीच्या दिवशी महाबळा येथील ग्रामस्थ एकत्र येऊन सिद्धिविनायकाचे दर्शन घेतात. या दिवशी गावातील एकही व्यक्ती कामावर जात नाही. विवाहित मुलीही माहेरी परत येऊन उत्सवात सहभागी होतात. रात्री मंदिरात भजन कीर्तनाचा कार्यक्रम रंगतो. भक्तिरसात तल्लीन झालेले ग्रामस्थ रात्र जागून काढतात.

या परंपरेची सुरुवात स्वर्गीय वडकुजी बोरकर आणि स्वर्गीय बापुराव फंड यांनी केली होती. त्यानंतर अनेक पिढ्यांनी ही परंपरा श्रद्धेने पुढे नेली आहे. सिद्धिविनायक हे जागृत देवस्थान असल्याची भाविकांची श्रद्धा असून मनोभावे पूजा केल्याने संकटे दूर होतात असा ग्रामस्थांचा विश्वास आहे.

दुसऱ्या दिवशी महाबळा ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. दुपारी कीर्तन आणि काला झाल्यानंतर महाप्रसादाला सुरुवात होते. रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या या महाप्रसादाचा हजारो भाविक लाभ घेतात. मंदिराचे अध्यक्ष माधव इरुटकर सचिव सुभाष तेलरांधे तसेच मंदिर समितीचे पदाधिकारी आणि सदस्य सहकार्य करतात.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
e paper www.janmadhyam.com

# मक्कावरील हल्ल्याचा प्रयत्न उधळला; सौदीने पाडला ड्रोन

**अबुधाबी/वृत्तसंस्था :** इस्लाम धर्मियांचे पवित्र स्थळ इस्लाम धर्मातील अत्यंत पवित्र स्थळ मानल्या जाणा-या मक्का शहराच्या दिशेने हुथी बंडखोरांनी डागलेला एक ड्रोन सौदी आघाडीच्या सैन्याने हवेतच रोखून नष्ट केला आहे. या गंभीर घटनेमुळे पवित्र शहराच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून दोन्ही देशांमधील संघर्ष अधिक पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, या युद्धावर पडदा पाडण्यासाठी चीनने मध्यस्थीचे प्रयत्न सुरू केले आहेत. याच पार्श्वभूमीवर इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अरागची हे चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांची भेट घेण्यासाठी बीजिंगला रवाना झाले आहेत.हुथी बंडखोरांच्या सततच्या ड्रोन हल्ल्यांनंतर सौदी अरेबियाने आपल्या यांबू बंदरावरील तेलाचे लोडिंग तूर्तास थांबवले आहे. तथापि, सौदीचा पूर्व-पश्चिम पाईपलाईन मार्ग येत्या काही दिवसांत पुन्हा पूर्ववत सुरू होईल, अशी अपेक्षा अमेरिकेचे उर्जा सचिव ख्रिस राइट यांनी व्यक्त केली आहे.

**हुथीने सर्व आरोप फेटाळले-**हुथीच्या परराष्ट्र मंत्रालयाने या घडामोडींवर स्पष्टीकरण देताना म्हटले आहे की, बाब अल-मंदिब सामुद्रधुनीतील सागरी वाहतूक पूर्णपणे सुरक्षित आहे. सौदी अरेबिया या जलमार्गाबाबत आंतरराष्ट्रीय समुदायाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोपही हुथी प्रशासनाने केला आहे. दरम्-यान, संयुक्त राष्ट्रांच्या निर्वासित संस्थेने दिलेल्या माहितीनुसार, येमेनच्या पश्चिम किनारपट्टीवर अचानक वाढलेल्या सशस्त्र संघर्षामुळे देशांतर्गत तब्बल १ लाखांपेक्षा जास्त नागरिक विस्थापित झाले आहेत. यामुळे हजारो लोकांना आपला जीव धोक्यात घालावा लागत आहे.



**सौदीचा हुथी बंडखोरांना इशारा-**इस्लाम धर्मातील दोन सर्वात पवित्र स्थळे आणि तेथे येणा-या भाविकांची (जायरीन) सुरक्षा ही आमच्यासाठी रेड लाईन असल्याचे सौदी अरेबियाच्या नेतृत्वाखालील आघाडीने बुधवारी स्पष्ट केले. येमेनमधील हुथी बंडखोरांनी मक्का शहराच्या दक्षिणेकडून डागलेला एक ड्रोन सौदीच्या हवाई संरक्षण यंत्रणेने हवेतच नष्ट केल्यानंतर हे विधान समोर आले आहे. सौदी आघाडीनुसार, मंगळवारी संध्याकाळी मक्का अल-मुकर्रमाच्या प्रतिबंधित हवाई क्षेत्रात प्रवेश करण्यापूर्वीच या ड्रोनला रोखण्यात आले.

**शत्रुत्वपूर्ण आणि दहशतवादी कृत्य-** आघाडीचे प्रवक्तेमेजर जनरल तुर्की अल-मलिकी यांनी या घटनेला शत्रुत्वपूर्ण आणि दहशतवादी कृत्य म्हटले आहे. ड्रोन डागणा-या संघटनेचा उल्लेख त्यांनी दहशतवादी हुथी मिलिशिया असा केला. अल-मलिकी म्हणाले की, दोन पवित्र मशिदी आणि भाविकांची सुरक्षा ही आमची रेड लाईन आहे. हुथी चळवळीविरुद्ध आवश्यक आणि प्रतिबंधात्मक पावले उचलण्यास आघाडीची संयुक्त सैनिक कमान मागे हटणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. येमेनमधील सौदी आघाडी आणि हुथी बंडखोरांमधील लष्करी तणाव आणि आरोप-प्रत्यारोप वाढत असताना ही कारवाई झाली आहे.

**मक्का शहराला लक्ष्य करण्याचा दुसरा प्रयत्न-** मक्का शहराला लक्ष्य करण्याचा हा दुसरा प्रयत्न असल्याचे सौदी आघाडीने म्हटले आहे. यासाठी त्यांनी २७ जुलै २०१७ रोजी घडलेल्या घटनेचा संदर्भ दिला, ज्यामध्ये मक्काच्या दिशेने बॅलिस्टिक क्षेपणास्त्र डागण्यात आल्याचे सांगितले गेले होते. ताजी घटना भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करण्यासाठी आणि तेथील नागरिकांना हानी पोहोचवण्याच्या उद्देशाने करण्यात आली असल्याचे अल-मलिकी यांनी सांगितले.

**हुथी प्रवक्त्याकडून सौदीच्या हल्ल्यांचे आरोप-**दुस-या बाजूला, हुथींचे लष्करी प्रवक्ते ब्रिगेडियर जनरल याह्या सारी यांनी मंगळवारी टेलिग्रामवर निवेदन जारी करून सौदी अरेबियावर हल्ले केल्याचा आरोप केला. गेल्या २४ तासांत सौदीच्या युद्ध विमानांनी ५२ हवाई हल्ले केल्याचा दावा त्यांनी केला. त्यांच्या मते, या हल्ल्यांमध्ये एफ १५ आणि कायफून लढाउ विमानांचा वापर करण्यात आला असून ती खमीस मुशैत आणि ताइफ एअरबेसवरून चालवली गेली. ताइज प्रांतातील शाळा, पूल आणि रस्ते यांसारख्या नागरी पायाभूत सुविधांना या हल्ल्यांत लक्ष्य करण्यात आल्याचा आरोप सारी यांनी केला.

**हल्ल्यांना सडेतोड उत्तर दिले जाईल-** अल-जौफ, अल-बायदा, सादा आणि अमरान प्रांतातील इतर ठिकाणांवरही हल्ले झाल्याचा दावा हुथी प्रवक्त्याने केला आहे. मात्र, या दाव्यांना स्वतंत्र दुजोरा मिळालेला नाही. या क्रूर हल्ल्यांचे उत्तर दिल्याशिवाय सोडले जाणार नाही, असे हुथी प्रवक्त्याने म्हटले आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांत हुथींनी येमेनमधील अनेक महत्त्वाच्या ठिकाणांवर ताबा मिळवल्याने सौदी अरेबियाची चिंता वाढली आहे.

**येमेनपासून बाब-अल-मंदेबपर्यंत वाढता तणाव**

पश्चिम आशियातील युद्धाची झळ आता येमेन आणि सौदी-हुथी संघर्षापर्यंत पोहोचताना दिसत आहे. यामुळे धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या बाब-अल-मंदेब सामुद्रधुनीबाबतची चिंता वाढली आहे. हुथी बंडखोरांनी या सागरी मार्गावरून जाणा-या व्यापारी जहाजांनाही लक्ष्य केले आहे, ज्यामुळे बाब-अल-मंदेब स्ट्रेट हा प्रादेशिक तणावाचा केंद्रबिंदू बनला आहे. मक्काजवळ ड्रोन पाडल्यानंतर सौदी आघाडीने दिलेल्या रेड लाईन च्या इशार्यामुळे रियाध आणि हुथींमधील तणाव अधिक वाढण्याची शक्यता आहे.

## त्र्यंबकेश्वरहून परतणा-या ४ भाविकांचा जागीच मृत्यू, ६ जखमी

**नाशिक/प्रतिनिधी :** मुंबई-नाशिक महामार्गावर शहापूर तालुक्यातील अटगावजवळ एक अत्यंत दुर्दैवी आणि भीषण रस्ता अपघात झाला आहे. रस्त्याच्या कडेला बंद अवस्थेत उभ्या असलेल्या एका जुन्या जळालेल्या ट्रकला भरधाव



वाहनाने मागून जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला. या अपघातात ४ जणांचा जागीच मृत्यू झाला असून ६ जण गंभीर जखमी झाले आहेत. मृतांमध्ये एका लहान मुलाचा समावेश आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील जोगेश्वरी परिसरात राहणारे एक कुटुंब आपल्या नातेवाईकांसह नाशिक येथील त्र्यंबकेश्वर येथे देव दर्शनासाठी गेले होते. दर्शन उरकून कुटुंबासह सर्वजण चारचाकी वाहनाने मुंबईच्या दिशेने परत येत होते. प्रवास दरम्यान शहापूर तालुक्यातील अटगाव जवळ महामार्गावर सुमारे दोन वर्षांपूर्वी जळालेल्या स्थितीत उभा असलेला एक ट्रक थांबलेला होता. प्रवासाच्या वेळी चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने किंवा उभ्या ट्रकचा अंदाज न आल्याने त्यांच्या वाहनाची या उभ्या ट्रकला प्रचंड वेगाने मागून धडक बसली. धडक इतकी भीषण होती की गाडीचा पुढील भागाचा पूर्णपणे चक्काचूर झाला आहे. या अपघाताचा आवाज ऐकून स्थानिक नागरिक आणि महामार्ग पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मात्र, धडक एवढी जोरदार असल्याने वाहनातील चार जणांचा जागीच दुर्दैवी अंत झाला. स्थानिकांच्या व महामार्ग पोलिसांच्या मदतीने अपघातातील सर्व जखमींना तातडीने बाहेर काढून शहापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. जखमींपैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

## शेतात फवारणीसाठी गेले अन् मधमाशांनी केला भीषण हल्ला, शेतक-याचा दुर्दैवी मृत्यू

**गोंदिया :** गोंदियामधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. शेतामध्ये फवारणीसाठी गेलेल्या एका शेतक-यावर मधमाशांनी हल्ला केला. या घटनेमध्ये जखमी झालेल्या ४८ वर्षीय शेतक-याचा दुर्दैवी मृत्यू झाला. ऐन गणेशोत्सवाच्या काळात ही घटना घडल्यामुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गोंदिया जिल्ह्यातील आमगाव तालुक्यातील झालिया येथील परिसरात ही घटना घडली. मधमाशांनी केलेल्या हल्ल्यात रवींद्र पटले (वय ४८ वर्षीय) या शेतक-याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतक रवींद्र पटले हे झालिया येथील आपल्या शेत शिवारात पिकांवर फवारणी करण्यासाठी गेले होते. फवारणी सुरू असताना अचानक परिसरात असलेल्या मधमाशांनी त्यांच्यावर हल्ला केला. मोठ्या संख्येनं मधमाशांनी दंश केल्याने ते गंभीर जखमी झाले. मधमाशांनी हल्ला केल्याची माहिती शेतकरी आणि मजुरांनी पटले यांच्या कुटुंबीयांनी दिली. गावक-यांनी शेताकडे धाव घेतली. शेतामध्ये रवींद्र पटले हे बेशुद्ध होउ कोसळलेले होते. गावक-यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी गोंदिया येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यासाठी गोंदिया येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. या दुर्दैवी घटनेमुळे मृताच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## 10 बंडखोर आमदारांना अपात्रतेची नोटीस

**कोलकाता :** तृणमूल काँग्रेसच्या १० बंडखोर आमदारांना पश्चिम बंगाल विधानसभा सचिवालयाने नोटीस बजावली आहे. या आमदारांना एका आठवड्याच्या आत आपले स्पष्टीकरण देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील गटाने दाखल केलेल्या अपात्रतेच्या



अर्जावर उत्तर देण्यासाठी पश्चिम बंगाल विधानसभा सचिवालयाने मंगळवारी बंडखोर आमदारांना नोटीस बजावली. तृणमूलचे ज्येष्ठ नेते सोभनदेव चॅटर्जी यांनी सोमवारी विरोधी पक्षनेते ऋतब्रत बॅनर्जी यांच्यासह १० आमदारांना अपात्र ठरवण्यासाठी थेट सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर लगेचच विधानसभेकडून या नोटिसा जारी करण्यात आल्या. त्यामुळे आता हा कायदेशीर आणि राजकीय लढा विधानसभा, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय, संसद आणि निवडणूक आयोग अशा पाचही ठिकाणी एकाच वेळी पाहायला मिळत आहे. विधानसभा सचिवालयाने ऋतब्रत बॅनर्जी (बंडखोर गटाचे विरोधी पक्षनेते), अरूप राय, फिरहाद हकीम, सांदीपन साहा, अखरुझमन अन्सारी, शिउली साहा, सबिना यास्मिन, बिप्लव मित्रा, जावेद खान आणि राथिन घोष या दहा बंडखोर आमदारांना नोटीस बजावली आहे. या संदर्भात बोलताना बंडखोर गटाचे आमदार अखरुझमन अन्सारी यांनी नोटीस मिळाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. आम्हाला नोटीस प्राप्त झाली असून आम्ही पक्षाच्या अंतर्गत बैठकीत चर्चा करून दिलेल्या मुदतीत योग्य ते उत्तर देउ, असे त्यांनी स्पष्ट केले. मे महिन्यात झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये मोठी फूट पडली. तृणमूल काँग्रेसने सोभनदेव चॅटर्जी यांची विरोधी पक्षनेतेपदासाठी निवड केली होती. मात्र ८० पैकी ६५ आमदारांचा पाठिंबा असल्याचा दावा करत बंडखोर गटाने ऋतब्रत बॅनर्जी यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड केली. अध्यक्षांनी ऋतब्रत बॅनर्जी यांना विरोधी पक्षनेते म्हणून मान्यता दिल्याने सोभनदेव चॅटर्जी यांनी या निर्णयाविरोधात कोलकाता उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

## सिंहस्थ महाकुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकच्या ब्रँडिंगसाठी व्यापक आराखडा तयार करावा -प्रधान सचिव ब्रिजेश सिंह







**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणा-या कुंभमेळ्याच्या माध्यमातून नाशिकची धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनविषयक ओळख देशासह जागतिक पातळीवर पोहोचविण्यासाठी व्यापक व प्रभावी आराखडा तयार करावा, असे निर्देश माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी दिले. महासंचालक सिंह यांच्या उपस्थितीत नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या सभागृहात माध्यम आराखड्यासंदर्भात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पोलीस आयुक्त डा. संदीप कर्णिक, कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, माहिती व जनसंपर्क विभागाचे संचालक डा. किशोर गांगुर्डे, प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त कमलाकर रणदिवे, नाशिक विभागाचे उपसंचालक डा. किरण मोघे, जिल्हा माहिती अधिकारी विलास बोडके, महासंचालकांचे विशेष कार्य अधिकारी इर्शाद बागवान, वृत्तचित्र विभागाचे वरिष्ठ सहायक संचालक सागरकुमार कांबळे आदी उपस्थित होते.

महासंचालक ब्रिजेश सिंह म्हणाले, नाशिक त्र्यंबकेश्वर येथे १२ वर्षानंतर कुंभमेळा भरत आहे. या कुंभमेळ्याचे जागतिक स्तरावर प्रभावी ब्रँडिंग करण्यासाठी पारंपरिक माध्यमांसोबतच डिजिटल माध्यमे, समाजमाध्यमे, दृक-श्राव्य माध्यमे आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध माध्यमांचा समन्वयित वापर करावा. त्यासाठी व्यापक आणि सर्वंकष असा आराखडा तयार करावा.

या माध्यमातून नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याची वैशिष्ट्ये, धार्मिक परंपरा, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा, गोदावरी नदी आणि प्रमुख तीर्थस्थळांची माहिती देश-विदेशातील भाविक व पर्यटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी नियोजनबद्ध मोहीम राबविण्यात यावी.कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक त्र्यंबकेश्वरची स्वतंत्र पर्यटन ओळख निर्माण करण्याबरोबरच अध्यात्मिक ठिकाणे, स्थानिक कला, संस्कृती, खाद्यपरंपरा, वारसा स्थळे आणि पर्यटनस्थळांचे प्रभावी सादरीकरण करण्यावरही भर द्यावा. त्यासाठी विविध माध्यमांसाठी स्वतंत्र आशय निर्मिती, साहित्य आणि सोशल मीडिया मोहिमेचे सूक्ष्म नियोजन करावे.कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक त्र्यंबकेश्वरसह जिल्ह्यात सुरू असलेल्या दीर्घकालीन विविध पायाभूत सोयीसुविधांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचावी. चुकीच्या बाबी, अफवांचे तातडीने खंडन करावे, अशाही सूचनाही त्यांनी दिल्या. कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी प्राधिकरणाच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकास कामांची सविस्तर माहिती दिली. बैठकीनंतर महासंचालक श्री. सिंह यांनी रामकुंड परिसराला भेट देत पाहणी केली. कुंभमेळ्याच्या अनुषंगाने भाविकांना उपलब्ध होणा-या सुविधा, प्रमुख स्थळांचे माध्यमीय सादरीकरण आणि प्रसिद्धीच्या दृष्टीने आवश्यक बाबींची त्यांनी माहिती घेतली.यावेळी पोलिस आयुक्त श्री. कर्णिक, संचालक डा. गांगुर्डे, प्राधिकरणाचे अतिरिक्तआयुक्तश्री. रणदिवे, उपसंचालक डॉ. मोघे, पोलिस उपायुक्त मोनिका राउत, जिल्हा माहिती अधिकारी श्री. बोडके यांच्यासह विविध विभागांचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## महिला शेतकरी सक्षमीकरणासाठी राज्य शासनाची महत्त्वपूर्ण पावले

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत महिला शेतक-यांना कायदेशीर व प्रशासकीय पातळीवर सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने अधिसूचना जारी केली आहे. या अधिसूचनेनुसार, अधिनियमांतर्गत कार्यवाहीसाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी सहाय्यक कृषी अधिकारी आणि नगरपंचायत क्षेत्रासाठी कृषी अधिकारी (विस्तार) यांची पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच संबंधित क्षेत्रासाठी तालुका कृषी अधिका-यांची अपील अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महिला शेतक-यांच्या सक्षमीकरणासाठी विविध विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी महिला शेतकरी सक्षमीकरण परिषद स्थापन करण्यात आली आहे. या परिषदेचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतील. उपमुख्यमंत्री, कृषी, महिला व बालविकास, ग्रामविकास, सहकार, पशुसंवर्धन, वित्त, वन, महसूल, नगरविकास आदी विभागांचे मंत्री सदस्य असतील, तर कृषी विभागाचे सचिव सदस्य-सचिव असतील. या निर्णयामुळे महिला शेतक-यांशी संबंधित अधिकार व कार्यवाही स्थानिक स्तरावर सुलभ होण्यास तसेच विविध शासकीय विभागांमध्ये समन्वय वाढण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने ही महत्त्वपूर्ण प्रशासकीय व्यवस्था आहे.

## गणेशोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राची समृद्ध परंपरा जागतिक पातळीवर पोहोचेल - पर्यटन मंत्री

### विविध देशांच्या वाणिज्यदूतांनी मुंबईतील गणपतीचे घेतले दर्शन

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन जगभरातील पर्यटकांना घडविणा-या गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध देशांच्या वाणिज्यदूतांनी मुंबईतील विविध गणेशमंडळांना भेट देउन बाप्पांचे दर्शन घेतले. यामध्ये फिनलंड, फ्रान्स, थायलंड, नार्वे, चीन, बेल्जियम, स्वीडन आणि इजिप्त या देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. महाराष्ट्राचा गणेशोत्सव, त्याची ऐतिहासिक परंपरा आणि मुंबईतील प्रसिद्ध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची माहिती या प्रतिनिधींना देण्यात आली.

पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले की, गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे, सामाजिक एकतेचे आणि लोकसहभागाचे प्रतीक आहे. या उत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राची कला, परंपरा, इतिहास, लोकजीवन आणि आतिथ्यशीलता जगभर पोहोचत आहे. आंतरराष्ट्रीय पर्यटकांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पर्यटनाचा अनुभव मिळावा, यासाठी पर्यटन विभागाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

**मुंबईतील प्रसिद्ध गणेशोत्सव मंडळांना दिली भेट**

माटुंगा येथील खालसा महाविद्यालयात परदेशी पाहुण्यांचे पारंपारिक फेटे बांधून व पुष्पगुच्छ देउन स्वागत करण्यात आले. आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींनी मुंबईतील ऐतिहासिक आणि लोकप्रिय गणेशोत्सव मंडळांतील गणेशाचे दर्शन घेतले. माटुंगा येथील जी.एस.बी. गणपती, वडाळा येथील जी.एस.बी. सार्वजनिक गणेशोत्सव-गणेश गल्ली येथील मुंबईचा राजा, गिरगावातील केशवजी नाईक चाळ येथे भेट देउन गणपतीचे दर्शन घेतले. महाराष्ट्रात गणेशोत्सव हा दहा दिवस साजरा होणारा प्रमुख उत्सव आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राची संस्कृती, इतिहास, लोकपरंपरा आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश याची माहिती पाहुण्यांना देण्यात आली.

## सेवा संकल्प अभियानात राज्यातील सर्व जनतेची आरोग्य तपासणी करा

### ■ सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर ■

**मुंबई/प्रतिनिधी :** सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून राज्यातील नागरिकांच्या सर्वसमावेशक आरोग्य तपासणीसह ॲनिमिया निर्मूलन, बाल आरोग्य, ज्येष्ठ नागरिकांची आरोग्यसेवा, शालेय विद्यार्थ्यांची तपासणी आणि उपचारांचा पाठपुरावा यासाठी विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या. आरोग्य संस्थांतील सेवांचे नियमित संनियंत्रण, जनआरोग्य समित्यांचा सहभाग, रुग्णवाहिका सेवेचे बळकटीकरण तसेच वैद्यकीय मनुष्यबळाची उपलब्धता यावर विशेष भर देण्यात यावा असेही त्यांनी सांगितले. आरोग्यभवन येथे सेवा संकल्प अभियानात राबविण्यात येणा-या उपक्रमांची मंत्री आबिटकर यांनी माहिती घेतली त्यावेळी त्यांनी सूचना दिल्या. यावेळी आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डा. निपूण विनायक, आरोग्यसेवा डा. संजय काटकर, नागरी सेवा आयुक्त डा. सुनील भाकरे उपस्थित होते. राज्यातील अनिमियाचे प्रमाण कमी करण्यासाठी तपासणी, उपचार आणि नियमित संनियंत्रणावर भर देत विशेष अभियान राबवावे. गर्भवती महिला, शून्य ते दोन वर्षे वयोगटातील बालके, शालेय विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य तपासणीला प्राधान्य द्यावे. यासाठी सार्वजनिक आरोग्य, महिला व बालविकास




आणि आदिवासी विकास विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत देण्यात आले. राज्यातील ?निमियाची स्थिती, लोहयुक्त औषधांचा पुरवठा, रुग्णांकडून औषधांचे सेवन आणि उपचारानंतरची प्रगती यांचे आरोग्य संस्थानिहाय संनियंत्रण करण्यात यावे. मध्यम आणि तीव्र स्वरूपाच्या अनिमियाने ग्रस्त गर्भवती महिलांसाठी फेरिक कार्बोक्सिमाल्टोज उपचाराच्या वापराबाबत तज्ज्ञांच्या सल्ल्याने प्रमाणित मार्गदर्शक सूचना तयार करण्याचा प्रस्ताव सादर करावा. उपचाराबरोबरच पोषणविषयक मार्गदर्शन आणि नियमित हिमोग्लोबिन तपासणीवर भर द्यावा, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. आरोग्य सेवेतील मनुष्यबळाची कमतरता पूर्ण करण्यासाठी राज्यात १४४० डाक्टरांची भरती, तसेच दर्जेदार आरोग्यसेवा मिळण्यासाठी उत्तरदायित्व ठरणे आवश्यक आहे. १५ हजार आरोग्य समित्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात आरोग्य अभियान राबवावे असे मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

**शून्य ते दोन वर्षे वयोगटावर विशेष लक्ष-** बालकांची सर्वाधिक शारीरिक आणि बौद्धिक वाढ शून्य ते दोन वर्षे या कालावधीत होत असल्याने या वयोगटासाठी विशेष कृती आराखडा तयार करावा. कुपोषण, ॲनिमिया, जन्मजात आजार यांचे लवकर निदान करून आवश्यक उपचार तत्काळ सुरू करावेत. पोषण पुनर्वसन केंद्रांशी समन्वय साधून उपचारासाठी निश्चित केलेल्या प्रत्येक बालकाचा पाठपुरावा करण्यात यावा. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत तपासणीमध्ये आढळून आलेल्या बालकांवर शंभर टक्के उपचार पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवावे. जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका आणि आश्रमशाळांमधील सर्व विद्यार्थ्यांची नियोजित वेळेत आरोग्य तपासणी पूर्ण करावी. अंगणवाडी आणि शाळांमधील तपासणीची माहिती डिजिटल प्रणालीवर नोंदवून उपचार पूर्ण होईपर्यंत प्रत्येक बालकाचा मागोवा घ्यावा.

प्राथमिक आरोग्य संस्थांमध्ये कोणत्या सेवा अनिवार्यपणे उपलब्ध असाव्यात, याबाबत प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करावी. रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, वृद्धापकाळाशी संबंधित आजार आणि संसर्गजन्य आजारांच्या तपासणीसाठी नियमित शिबिरे आयोजित करावीत. उच्च रक्तदाबाचे निदान झाल्यानंतरही उपचार सुरू न केलेल्या नागरिकांची स्वतंत्र यादी तयार करून त्यांना उपचार व्यवस्थेशी जोडावे. आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक अलोपॅथी, आयुर्वेदिक आणि होमिओपॅथी औषधांची उपलब्धता सुनिश्चित करण्याचे निर्देशही देण्यात आले.

**ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष आरोग्य शिबिरे-** साठ वर्षांवरील नागरिकांची रक्तदाब, मधुमेह, दृष्टी, श्रवण, अस्थिरोग, मानसिक आरोग्य आणि इतर वयोमानानुसार उद्भवणा-या आजारांसाठी तपासणी करावी. प्रत्येक आयुष्मान आरोग्य मंदिरामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात यावे. गरजेनुसार वृद्ध आणि उपशामक शुश्रुषा (जेरियाट्रिक आणि पॅलिएटिव्ह केअर) सेवांशी त्यांना जोडण्यात यावे.

**आरोग्य सेवांसाठी केंद्रीय संनियंत्रण व्यवस्था-**राज्यातील आरोग्य संस्थांमधील रुग्णसेवांचे प्रत्यक्ष वेळेत संनियंत्रण करण्यासाठी केंद्रीय नियंत्रण कक्ष कार्यान्वित करावा. रुग्ण नोंदणी कक्ष, बाह्यरुग्ण विभाग आणि अपघात विभागासारख्या महत्त्वाच्या ठिकाणांचे नियमित निरीक्षण करण्यात यावे. राज्यातील विविध श्रेणीतील आरोग्य संस्थांच्या कामकाजाचे उपलब्ध डिजिटल साधनांच्या माध्यमातून मूल्यमापन करावे. नियंत्रण कक्षासाठी आवश्यक जागा, तांत्रिक सुविधा, इंटरनेट क्षमता आणि मनुष्यबळाचा आराखडा तातडीने सादर करावा.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## जरांगेचा हट्ट

'वेताळ पंचविशी' तील विक्रम आणि वेताळाच्या २५ कथा एकेकाळी महाराष्ट्रातल्या मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय होत्या. 'विक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही....' या वाक्यानेच त्या प्रत्येक कथेची सुरुवात व्हायची. महाराष्ट्रात मनोज जरांगे सध्या या विक्रमादित्याच्या भूमिकेत असल्यासारखे वावरत आहेत. ऐन गणेशोत्सवात त्यांनी उपोषणासाठी मुंबईत येऊ नये, यासाठी सरकारने सगळे प्रयत्न केले. पण, जरांगे ऐकायला तयार नाहीत. सगळ्यांचे सगळे ऐकून घेऊन जरांगे मुंबईला येण्याचा आपला बेत बदलायला तयार नाहीतच. आपल्या नियोजनुसार त्यांनी मुंबईसाठी प्रस्थान ठेवलेही आहे.मुंबईला निघण्यापूर्वी गेल्या महिन्याभरापासून जरांगे आपल्या मागण्यांचा पुनरुच्चार करत होते. मुंबईतल्या गेल्या उपोषणावेळी सरकारने ज्या मागण्या मान्य केल्या, त्याच्या अंमलबजावणीत काही त्रुटी आहेत; त्या दूर करा,अशी त्यांची मागणी आहे. सरकारने तत्वतः जे मान्य केले आहे, ते प्रत्यक्ष मान्य होताना अनेक अडचणी येत आहेत, मोठा विलंब होतो आहे. त्यामुळे, सरकारने जे मान्य केले, ते प्रत्यक्षात येतच नसेल, तर जे मान्य केले, त्याचा उपयोगच काय? अशी त्यांची विचारणा आहे. त्यासाठी ते अंमलबजावणीची जी मागणी करत आहेत, त्या पद्धतीने अंमलबजावणी झाल्यास ती न्यायालयात टिकणार नाही, अशी सरकारची भीती आहे. जरांगे आणि आंदोलकांना शांत करण्यासाठी त्यांची केवळ समजूत काढायची आणि बाजूला व्हायचे, ही सरकारची भूमिका नाही. तसे सरकारच्यावतीने वारंवार सांगितले जाते आहे. अंमलबजावणीची जी पद्धती कायदेशीर चौकटीत वैध आहे, तीच अवलंबली जाईल, त्यापेक्षा वेगळे आश्वासनसुद्धा देणार नाही, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली असून त्याला मंत्रिमंडळाचाही एकमुखी पाठिंबा आहे. 'न्याय आणि न्यायालयाच्या चौकटीत जे टिकेल, असेच आरक्षण मराठा समाजाला देऊ', अशी भूमिका या सरकारने पहिल्यापासूनच घेतली आहे. राजकीय शहाणपणाने या भूमिकेचा अर्थ समजावून घेतला पाहिजे. एक, जे देऊ, ते न्यायालयालाही मान्य होईल; म्हणजे न्यायाच्या चौकटीत बसेल, तेच देऊ' असा होतो. दुसरा अर्थ अधिक महत्त्वाचा आहे. 'तुम्ही मागण्या काहीही करून चालणार नाही. जे घटनेच्या, कायद्याच्या चौकटीत असेल, तेवढेच मिळेल. त्या बाहेर जाऊन सरकार काही देऊ शकणार नाही'. 'एकाच्या ताटातले काढून दुसऱ्याला देता येणार नाही' हे फडणवीस यांनी आत्ताच काही दिवसांपूर्वी केलें विधान त्यांच्या पहिल्या भूमिकेच्या दुसऱ्या बाजूचे अधिक स्पष्टीकरण आहे.'माझी भूमिका सरकारने समजावून घेतली नाही. माझे म्हणणे ऐकून घेतले नाही', अशी तक्रार करायलाही जरांगे यांना जागा नाही. कारण, मंत्रिमंडळातल्या अनेक मंत्र्यांनी गेल्या महिन्याभरात जरांगे यांची भेट घेतली आहे. त्यांच्याबरोबर बसून त्यांचे सगळे म्हणणे ऐकून घेतले आहे. मंत्रिमंडळाबाहेरच्या मुख्यमंत्र्यांच्या निकटच्या सहकाऱ्यांनीही मुख्यमंत्र्यांचे 'विशेष दूत' म्हणून जरांगे यांच्याशी अनेकदा सविस्तर चर्चा केली आहे. जरांगे ज्या मराठा जातीच्या मागण्या मांडत आहेत, तो समाज महाराष्ट्रात बहुसंख्य आहे. राज्यातील राजकारणासह सर्व क्षेत्रांवर त्यांचा मोठा प्रभाव आहे. या समाजाकडे कानाडोळा करणे कोणत्याच पक्षाला परवडणारे नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच जरांगे जालना जिल्ह्यातल्या ज्या अंतरवाली सराटी गावी असतात, तिथे राज्यातील झाडून सगळ्या पक्षांचे सगळे नेते पायधूळ झाडत असतात. समाजाचे हे स्थान हेच जरांगे यांचे खरे बलस्थान आहे. महाराष्ट्राचा 'शासनकर्ता समाज' म्हणून या समाजाची ओळख आहे. या समाजाने शतकानुशतके महाराष्ट्राचे राज्यशकट हाकले आहे. त्यामुळे, शासनकर्त्यांमध्ये असलेली जबाबदारीची, समजूतदारपणाची जाणीव या समाजाचे वैशिष्ट्ये आहे. आततायी थयथयाट करणाऱ्यांकडे हा समाज जसे कधी आपल्या नेतृत्व देत नाही, तसेच कोणी एक व्यक्तीच समाजाची कधी अन भिषिक्त नेता म्हणूनही राहिलेली नाही, हा इतिहास आहे. जरांगे यांनी हे आजघडीला समजाऊन घेण्याची गरज दिसते आहे. मराठा जातीच्या सवलतीसाठी सुरुवातीला या जातीतील सर्व मान्यवर रस्त्यावर आले होते. त्यांनी जरांगे यांना मोठ्या मनाने पाठिंबाही दिला होता. आज त्यातले किती मान्यवर जरांगे यांच्या भूमिकेसोबत असतील, याविषयी शंका आहे. मागण्यांना, त्यांच्या योग्य आणि जलद अंमलबजावणीला सगळ्यांचा पाठिंबा कायम आहे. फक्त कायद्याच्या मर्यादा अंमलबजावणीसाठी असलेली अटी शर्तीची पूर्तता हा संवैधानिक विषय आहे. त्यासाठी समजून उमजून पुढे जात राहावे लागणार आहे. निव्वळ हट्टाने ते होणार नाही, अशीच बहुतेकांची भूमिका दिसते आहे. मराठ्यांच्या सवलतीच्या मागणीचा विषय सध्यातरी पूर्णपणे जरांगे यांच्या हाती आहे. गरजेनुरूप त्यांना सगळ्यांचं सहकार्य आणि पाठिंबाही आहे. जरांगे त्यामुळे अब महाराष्ट्राच्या राजकारणात पहिल्या रांगेत पोहोचले आहेत. ही फार मोठी जबाबदारी आहे. हाती घेतलेल्या मागणीला किती आणि कसे यश द्यायचे, हे आता पूर्णपणे त्यांच्या हाती आहे. अशा स्थितीत आंदोलनाची नीती अधिक सावधपणे ठरवावी लागते. 'गमावण्यासारखे माझ्याकडे काय आहे?' या निःसंग वृत्तीने जरांगे लढत आहेत, ही त्यांच्यासाठी जमेची बाजू असली तरी ते ज्यांचे प्रतिनिधित्व करत आहेत, त्यांची ऐतिहासिक कमाई मोठी आहे. ऐन गणेशोत्सवात कायदा सुव्यवस्थेच्यादृष्टीने नाजूक काळात त्याच यंत्रणेवर असह्य बोजा टाकून काय मिळणार आहे? खुद्द जरांगे यांनीच याचा विचार करायचा आहे. कारण, ते म्हणतील तेच त्यांच्या आदेशाने येणाऱ्या सगळ्यांना मान्य असणार आहे.

# खांदेपालटाचे आव्हान

**काँग्रेसच्या इतिहासात पराभवानंतरही अनेक नेते संपले नाहीत; उलट त्यांचा अनुभव पुढील राजकीय लढायांत पक्षाच्या उपयोगी पडला. आज मात्र राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली पक्षाची नवी घडी बसविताना ही परंपरा काहीशी मागे पडताना दिसते. राजकारणात नवे नेतृत्व उभे करणे आणि अनुभवी नेतृत्व निरुपयोगी ठरविणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. काँग्रेसच्या पुनरुज्जीवनाची कसोटी नेमकी येथेच लागणार आहे.**



राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला नवा चेहरा देण्याचा प्रयत्न सुरू आहे. तरुण पिढी, जातनिहाय आरक्षण, सामाजिक न्याय आणि 'स्मॅश द पॅट्रिआर्की'सारख्या मोहिमांना त्यांच्या राजकारणात वाढते स्थान मिळत आहे. पक्षाच्या जुन्या पिढीतील काही नेते मात्र या नव्या राजकीय भाषेबद्दल अस्वस्थ असल्याची चर्चा आहे. 'जेन झी'च्या प्रश्नांवर अधिक भर देताना महागाई आणि मध्यमवर्गाच्या आर्थिक अडचणींसारखे व्यापक प्रश्न मागे पडतील, अशी त्यांची चिंता आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाचा प्रश्न संघटनेचा आहे. अनेक दशकांचा प्रशासकीय अनुभव, वैयक्तिक संबंध आणि राज्याराज्यांत उभे केलेले राजकीय जाळे असलेल्या नेत्यांना पिढीबदलाच्या नावाखाली दूर ठेवणे काँग्रेसला महागात पडू शकते.

काँग्रेसच्या राजकारणातील एक जुना अलिखित नियम म्हणजे मुख्यमंत्री कधीच पूर्णपणे 'माजी' होत नाही. पद जाते, सत्तेची वर्दळ कमी होते; पण वर्षानुवर्षे जमविलेली राजकीय पुंजी नाहीशी होत नाही. आमदार, जिल्ह्यांतील नेते, उद्योजक, नोकरशहा, विविध समाजघटक आणि कार्यकर्ते यांच्याशी तयार झालेले संबंध पदानंतरही टिकतात. आज काँग्रेसकडे अशी मोठी पुंजी आहे. दिग्विजय सिंह, कमलनाथ, अशोक गेहलोत, भूपिंदरसिंह हुड्डा, भूपेश बघेल, सिद्धरामय्या, पृथ्वीराज चव्हाण, चरणजितसिंह चन्नी, सुशीलकुमार शिंदे, राजिंदर कौर भट्टल आणि ए. के. अँटनी अशा नेत्यांच्या रूपाने अनेक दशकांचा अनुभव पक्षाकडे उपलब्ध आहे. यातील प्रत्येक नेता बाजूला पडला आहे, असे नाही. बघेल पंजाबचे प्रभारी सरचिटणीस आहेत. चन्नी यांच्याकडे २०२७ च्या पंजाब निवडणुकीच्या प्रचार समितीचे अध्यक्षपद आहे आणि हुड्डा हरियाणातील विरोधी पक्षनेते आहेत, तरी राहुल गांधी यांच्याभोवती आकार घेत असलेल्या नव्या काँग्रेसच्या राजकीय चौकटीत या माजी मुख्यमंत्र्यांचे स्थान तुलनेने परिघावर गेलेले दिसते. पिढीबदल कोणत्याही पक्षासाठी आवश्यक असतो; पण तो संस्थात्मक स्मृती पुसून टाकणारा असू नये.

एकेकाळी काँग्रेसला या अनुभवाचा उपयोग करून घेता येत होता. केरळचे मुख्यमंत्रिपद सोडल्यानंतर ए. के. अँटनी संरक्षणमंत्री आणि पक्षाचे संकटमोचक झाले. मध्य प्रदेशात १० वर्षे मुख्यमंत्री राहिलेल्या दिग्विजय सिंह यांनी पुढे 'एआयसीसी'मध्ये अवघड राज्यांच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. अशोक गेहलोत यांनी मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीमधल्या काळात संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम केले. सुशीलकुमार शिंदे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावरून पुढे राज्यपाल, केंद्रीय ऊर्जामंत्री आणि केंद्रीय गृहमंत्री झाले. विधानसभा निवडणुकांनंतर माजी मुख्यमंत्र्यांना निरीक्षक म्हणून पाठविण्यामागेही हेच शहाणपण होते. २००९ मध्ये महाराष्ट्रात अँटनी आणि दिग्विजय सिंह, तर हरियाणात पृथ्वीराज चव्हाण यांना अशी जबाबदारी देण्यात आली होती.

मुख्यमंत्रिपदासाठीची अंतर्गत स्पर्धा स्वतः अनुभवलेला नेता बंडखोरीची चाहूल लवकर ओळखू शकतो. आज राहुल गांधींना तरुण, वैचारिकदृष्ट्या अधिक स्पष्ट आणि व्यवहारांच्या राजकारणात कमी अडकलेली काँग्रेस हवी आहे. ही अपेक्षा गैर नाही. प्रादेशिक सुभेदारांनी अनेकदा संघटनेला वेठीस धरल्याचा इतिहासही आहे; पण निवडणुकीचे राजकारण अजूनही विचारांइतकेच संघटना, सामाजिक समीकरणे, संपर्क आणि वाटाघाटींवर चालते. भाजप ज्येष्ठांना निवृत्त करतो; पण त्यांच्या संपर्कजाळ्याचा उपयोग करून घेतो. काँग्रेसमध्ये मात्र अनेकदा नेत्याबरोबर त्याचे राजकीय जाळेही निवृत्त होते.

दिग्विजय सिंह यांच्या काही विधानांनी काँग्रेसची अडचण झाली असली, तरी मध्य प्रदेशचा राजकीय भूगोल त्यांच्याइतका जाणणारे नेते पक्षात फार नाहीत. २०२३ च्या निवडणुकीपूर्वी भाजपचे वर्चस्व असलेल्या कठीण मतदारसंघांत कार्यकर्त्यांना सक्रिय करण्याची जबाबदारी त्यांनी सांभाळली. त्यांची खरी ताकद प्रसिद्धीपेक्षा पाच दशकांत उभ्या राहिलेल्या संपर्कजाळ्यात आहे. कमलनाथ यांच्याकडे लोकसभेतील ९ विजय, केंद्रीय मंत्रिमंडळाचा प्रदीर्घ अनुभव, उद्योगविश्व आणि दिल्लीतील संपर्क तसेच छिंदवाड्यात उभी केलेली संघटना आहे. २०२३ आणि २०२४ मधील पराभवांनी त्यांचा प्रभाव कमी झाला असला, तरी निवडणूक जिंकण्याची क्षमता कमी होणे आणि आयुष्यभराचे राजकीय संबंध निरुपयोगी होणे या वेगळ्या गोष्टी आहेत.

अशोक गेहलोत यांच्याकडेही काँग्रेसच्या संस्थात्मक स्मृतीचा मोठा ठेवा आहे. तीनवेळा मुख्यमंत्रिपद, राजस्थान काँग्रेसचे नेतृत्व आणि 'एआयसीसी'तील प्रदीर्घ कामामुळे पक्षाची अंतर्गत यंत्रणा आणि मित्रपक्षांशी व्यवहार या दोन्हींचा अनुभव त्यांच्याकडे आहे. भूपिंदरसिंह हुड्डा आजही हरियाणातील मोठे जनाधार असलेले काँग्रेस नेते आहेत. २०२४ च्या पराभवानंतर काँग्रेसने हुड्डा कुटुंबाच्या प्रभावक्षेत्रापलीकडे विस्तारावे, हा युक्तिवाद रास्त आहे; पण विस्तार आणि विद्यमान शक्तिकेंद्र मोडून टाकणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. भूपेश बघेल यांच्याकडे ओबीसी पार्श्वभूमी, प्रशासनाचा अनुभव, जमिनीशी जोडलेली प्रचारशैली आणि कल्याणकारी राजकारण मतदारांच्या भाषेत सांगण्याची क्षमता आहे. पंजाबची जबाबदारी देऊन पक्षाने त्याची दखल घेतली आहे. जून २०२६ मध्ये डी. के. शिवकुमार कर्नाटकचे मुख्यमंत्री झाल्यानंतर माजी मुख्यमंत्र्यांच्या यादीत आलेल्या सिद्धरामय्या यांचे महत्त्वही वरुणा मतदारसंघापुरते मर्यादित नाही. 'अहिंदा' सामाजिक आघाडी, मागासवर्गीयांचे राजकारण आणि भाजपशी थेट वैचारिक संघर्ष ही त्यांची बलस्थाने आहेत. २०२८ ची निवडणूक लढविणार नसल्याचे त्यांनी सांगितले असले, तरी निवडणुकीतून निवृत्ती म्हणजे राजकीय अप्रासंगिकता नव्हे.

पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे वेगळी क्षमता आहे. पंतप्रधान कार्यालय, केंद्र सरकार आणि महाराष्ट्रातील प्रशासनाचा अनुभव, धोरणकेंद्री भूमिका आणि स्वच्छ प्रतिमा यामुळे शासन व संस्थांच्या मुद्द्यावर ते पक्षासाठी उपयुक्त ठरू शकतात. पंजाबमध्ये चरणजितसिंह चन्नी दलित शीख नेता म्हणून स्वतंत्र शक्तिकेंद्र बनले आहेत. राजिंदर कौर भट्टल यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांचा उपयोग निवडणूक नेतृत्वापेक्षा मध्यस्थ आणि मार्गदर्शक म्हणून होऊ शकतो. सुशीलकुमार शिंदे यांचे महाराष्ट्रापासून दिल्लीपर्यंतचे संबंध वाटाघाटी, उमेदवार निवड आणि आघाड्यांशी संपर्कासाठी उपयोगी आहेत. सक्रिय राजकारणातून दूर झालेले ए. के. अँटनी, तर वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपलीकडील नैतिक अधिकाराचे प्रतिनिधित्व करतात.

या अनुभवाचे महत्त्व २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपुरते नाही. २०२९ ची लढाई त्याआधीच सुरू होणार आहे. पंजाब, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, गुजरात आणि इतर राज्यांतील निवडणुका काँग्रेसची कसोटी पाहतील. राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि कर्नाटकातील आव्हानेही सोपी नाहीत. प्रत्येक विजय-पराभवाचा परिणाम मित्रपक्षांतील काँग्रेसचे वजन, कार्यकर्त्यांचे मनोबल, निधी उभारणी आणि राहुल गांधींच्या राष्ट्रीय संदेशाचे राज्यातील सत्तेत रूपांतर करण्याच्या क्षमतेवर होईल.

राहुल गांधी यांनी काँग्रेसला संविधान, जातनिहाय जनगणना, विषमता, संस्थांवरील नियंत्रण आणि सामाजिक न्याय अशी अधिक स्पष्ट वैचारिक भाषा दिली आहे; पण विचार मतदारांपर्यंत पोहोचविण्यासाठी मजबूत संघटनात्मक वाहिन्या लागतात. माजी मुख्यमंत्री त्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. याचा अर्थ काँग्रेसने पुन्हा ज्येष्ठांच्या वर्चस्वाकडे वळावे असा नाही. ज्येष्ठांची सल्लागार व्यवस्था, राज्यांना अनुभवी मार्गदर्शक, उमेदवार निवडीत सहभाग, गटबाजी मिटविण्यासाठी मध्यस्थी आणि कमकुवत जिल्ह्यांच्या संघटनात्मक पुनर्बांधणीसाठी त्यांचा उपयोग करता येईल. त्यांच्या सामाजिक, व्यावसायिक आणि प्रशासकीय संपर्कांची पुंजी नव्या पिढीकडे सोपविणे अधिक महत्त्वाचे आहे. राहुल गांधी यांच्यापुढील आव्हान फक्त नरेंद्र मोदी यांच्या भाजपला पराभूत करण्याचे नाही, तर काँग्रेसला पुन्हा टिकाऊ राष्ट्रीय संस्था म्हणून उभे करण्याचे आहे. त्यासाठी तरुण नेतृत्वाचा वेग आवश्यक आहेच; पण अनुभवाची शिदोरीही तितकीच आवश्यक आहे. पक्षाच्या पुनर्बांधणीत नवे चेहरे पुढे आणणे अपरिहार्य आहे; मात्र त्यासाठी जुन्या पिढीने वर्षानुवर्षे जमविलेली राजकीय पुंजी वाया घालविण्याची गरज नाही. काँग्रेसच्या पिढीबदलाचे यश अखेरीस जुने आणि नवे यांच्यातील ही सांगड किती कुशलतेने घातली जाते, यावरच ठरेल.

**रशीद किडवई**

# डिजिटल क्रांती : समृद्ध शेतीचा पाया

**'ड्रोनची फवारणी, मोबाइलवर मातीचे रिपोर्ट आणि जनावरांच्या गळ्यात स्मार्ट सेन्सर ! कालपर्यंत स्वप्न वाटणाऱ्या या गोष्टी आज शेताच्या बांधावर प्रत्यक्ष उतरल्या आहेत. शेतीला खरा नफा मिळवून देणारी ही क्रांती नक्की काय आहे?' याचा ऊहापोह करणारा हा लेख !**

हवामानातील तीव्र बदल, अवेळी येणारा पाऊस, जमिनीचा घटणारा कस आणि मजुरांची भासणारी तीव्र टंचाई या पार्श्वभूमीवर भारतीय शेती क्षेत्र सध्या एका मोठ्या स्थित्यंतरामधून जात आहे. पारंपरिक पद्धतीने केलेल्या शेतीत केवळ मेहनतीवर अवलंबून राहून अपेक्षित उत्पादन मिळवणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. अशा वेळी संगणकीय बुद्धिमत्ता, उपग्रह यंत्रणा, मानवरहित हवाई वाहने म्हणजेच ड्रोन आणि विविध डिजिटल प्रणालींचा शेतीत वापर करणे ही काळाची गरज बनली आहे. या आधुनिक तंत्रज्ञानाची आणि शेतीची अचूक सांगड घातल्यास पिकांचे नुकसान तर टळतेच, शिवाय शेतीचा उत्पादन खर्च कमी होऊन एकूण उत्पादकतेत मोठी वाढ साधता येते.

पारंपारिक शेती आणि तंत्रज्ञानाधारित यामधील सर्वांत मोठा फरक म्हणजे निर्णयांची अचूकता होय. पूर्वी शेतकरी केवळ अनुभवावरून किंवा अंदाजावर आधारित निर्णय घेत असत. जसे की, खत कधी द्यायचे, फवारणी कधी करायची किंवा पाणी किती द्यायचे. मात्र आता डिजिटल प्रणालींमुळे शेती अंदाजावरून चालण्याऐवजी अचूक माहितीवर आधारित झाली आहे. भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या (ICAR) अहवालानुसार, तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास शेतीतील उत्पादन खर्चात २५ ते ३० टक्क्यांपर्यंत बचत होते आणि उत्पादनात १५ ते २५ टक्क्यांपर्यंत थेट वाढ होऊ शकते. पिकांवरील रोग-कीड नियंत्रण हा शेतकऱ्यांच्या चिंतेचा मुख्य विषय असतो. अनेकदा रोग पसरल्यानंतर शेतकरी औषधांची फवारणी करतात, ज्यामुळे आधीच मोठे नुकसान झालेले असते. आता मोबाइल प्रणालीच्या माध्यमातून पिकाच्या बाधित भागाचे छायाचित्र काढताच क्षणात रोगाचे अचूक निदान होते आणि त्यावर कोणते औषध किती प्रमाणात वापरावे, याचे स्पष्ट मार्गदर्शन मिळते.

### नमो ड्रोन दीदी

ड्रोन तंत्रज्ञान आणि सूक्ष्म उपग्रह डेटाने शेतीची पाहणी करण्याची पद्धत पूर्णपणे बदलून टाकली आहे. मानवरहित विमानांद्वारे काही मिनिटांत संपूर्ण शेताचा नकाशा तयार केला जातो. शेतातील कोणत्या भागात पाणी कमी पडत आहे, कुठे पिकाची वाढ खुंटली आहे किंवा कोणत्या भागात रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे, याची माहिती रंगीत नकाशांच्या स्वरूपात शेतकऱ्याला मिळते. यामुळे पूर्ण शेतात विनाकारण औषधा किंवा खता पसरण्याऐवजी केवळ गरज असलेल्या भागावरच अचूक फवारणी केली जाते. केंद्र सरकारच्या 'नमो ड्रोन दीदी' योजनेअंतर्गत देशातील सुमारे १५ हजार महिला बचत गटांना ड्रोनचे प्रशिक्षण व साधनसामग्री देण्यात येत आहे, ज्यामुळे ग्रामीण भागात रोजगारासोबतच आधुनिक शेतीला मोठा वेग मिळत आहे. एका एकर शेतात औषध फवारणीसाठी पारंपरिक पद्धतीने ३ ते ४ तास लागतात आणि शेकडो लिटर पाणी खर्च होते; मात्र ड्रोनच्या साह्याने हीच फवारणी अवघ्या ७ ते १० मिनिटांत आणि ९० टक्के कमी पाण्यात पूर्ण होते.



### पाणी व्यवस्थापन

हा उत्पादकता वाढवण्याचा पाया आहे. जमिनीतील पोषक घटकांचे प्रमाण न तपासता रासायनिक खतांचा आणि पाण्याचा अतिवापर केल्याने जमिनीचा पोत खराब होतो. आता बाजारात उपलब्ध असलेल्या पोर्टेबल माती परीक्षण यंत्रांद्वारे अवघ्या काही मिनिटांत जमिनीची धूप, सेंद्रिय कर्ब आणि खतांची गरज समजते. तसेच, जमिनीत बसवलेल्या स्वयंचलित संवेदकांमुळे (सेसर) मातीतील ओलाव्याचे प्रमाण थेट भ्रमणध्वनीवर कळते. जेव्हा जमिनीला खरोखर पाण्याची गरज असते, तेव्हाच सूक्ष्म सिंचन यंत्रणा आपोआप सुरू होते. केंद्रीय जल आयोगाच्या आकडेवारीनुसार, या पद्धतीमुळे शेतीतील पाण्याची सुमारे ४० ते ५० टक्के बचत होते आणि पिकाच्या मुळांना गरजेनुसार पाणी मिळाल्याने उत्पादनाची गुणवत्ता उत्तम राहते.

### हवामानाचा अंदाज अन् बाजारपेठेची जोड

हे या तंत्रज्ञानाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. 'आंतरराष्ट्रीय कृषी संशोधनासाठी सल्लागार गटा'च्या (CGIAR) अभ्यासानुसार, अचूक हवामान अंदाजावर आधारित शेती केल्यास नैसर्गिक आपत्तींमुळे होणारे पिकांचे नुकसान ४० टक्क्यांनी कमी करता येते. डिजिटल प्रणालींद्वारे शेतकऱ्यांना ढगफुटी, गारपीट किंवा वादळाची पूर्वसूचना ३ ते ४ दिवस आधीच मिळते, ज्यामुळे काढणीस आलेले पीक वाचविणे शक्य होते. याशिवाय, देशातील प्रमुख बाजार समित्यांमधील आवक आणि दरांचे विश्लेषण करून आगामी काळात पिकाला काय भाव मिळू शकतो याचा अंदाज या प्रणाली देतात. यामुळे शेतकरी आपला माल योग्य वेळी आणि योग्य बाजारात विकून अधिक नफा मिळवू शकतात.

उसाच्या आणि फळबागांच्या शेतीमध्ये 'स्मार्ट सिंचन आणि फर्टिगेशन तंत्रज्ञान' उत्पादकता वाढविण्यासाठी क्रांतिकारी ठरत आहे. जमिनीत बसविलेले सेन्सर्स मातीतील ओलावा आणि खतांची पातळी मोजतात. आवश्यकतेनुसार स्वयंचलित ड्रीप सिस्टिम सुरू होऊन उसाच्या मुळांना घेट विरघळलेली खते आणि पाणी दिले जाते. यामुळे उसाचे एकरी उत्पादन ६० टनांवरून थेट १०० टनांपर्यंत वाढल्याची अनेक उदाहरणे महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात पाहायला मिळतात. तसेच सफरचंद आणि द्राक्ष बागांमध्ये 'स्मार्ट कॅमेरा व रोबोटिक्स'च्या माध्यमातून फळांचा रंग आणि आकार तपासून आपोआप वर्गवारी आणि काढणी केली जाते, ज्यामुळे मनुष्यबळाचा खर्च ६० टक्क्यांनी घटतो.

भारतात तेलंगणा, महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यांमध्ये झालेल्या विविध प्रयोगांमधून हे सिद्ध झाले आहे, की तंत्रज्ञानाचा अवलंब केलेल्या कपाशी, द्राक्ष, डाळिंब आणि भात पिकांच्या उत्पन्नात २० ते ३० टक्क्यांची भर पडली आहे. परंतु हे तंत्रज्ञान सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात काही आव्हाने नक्कीच आहेत. साधनांची सुरुवातीची किंमत, ग्रामीण भागातील इंटरनेटची उपलब्धता आणि तांत्रिक साक्षरतेचा अभाव या प्रमुख अडचणी आहेत. यासाठी पंचायत स्तरावर तंत्रज्ञान भाड्याने देणारी केंद्रे उभारणे आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना (FPO) प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान हे शेतकऱ्याच्या अनुभवाला पर्याय नसून त्याच्या अनुभवाला अधिक धार देणारे एक प्रभावी साधन आहे. जेव्हा पारंपरिक ज्ञान आणि संगणकीय तंत्रज्ञान एकत्र येतात, तेव्हा शेती हो केवळ उदरनिर्वाहाचे साधन न राहता एक फायदेशीर उद्योग बनू शकते. येत्या काळात भारतीय शेतीला जागतिक स्तराकार स्पर्धात्मक बनविण्यासाठी आणि अन्न सुरक्षा टिकवूर ठेवण्यासाठी या आधुनिक तंत्रज्ञानाचा अंगीकारकर सर्वांत शाश्वत आणि यशस्वी भार्ग उरेल (लेखिका अर्थशा विषयाच्या प्राध्यापिका आहेत)

**डॉ. रिता शेटिया**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# उमरखेड तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा !

## काँग्रेसचे निवेदन,वाळलेले सोयाबीन एसडीओंच्या हातात दिले

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. १६ :** उमरखेड तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करा अशी प्रमुख मागणी करीत, शेतकऱ्यांना खरीप पिक सोयाबीन हेक्टरी २ लाख मदत, ऊस व हळद उत्पादकांना हेक्टरी २ लाख रुपये शासनाने विशेष मदत करावी. तसेच गतवर्षीचा पिक विमा तातडीने मंजूर करावा, अशा विविध मागण्यासाठी, शहर व तालुका काँग्रेसच्या वतीने, वाळलेल्या सोयाबीनची झाडे प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत, उपविभागीय अधिकाऱ्यांना बुधवारी निवेदन देण्यात आले.

उमरखेड तालुक्यात यावर्षी पावसाचे अत्यल्प व अनियमित प्रमाण, पावसातील मोठे खंड आणि प्रतिकूल हवामानामुळे शेती व शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. अनेक भागांमध्ये पिकांची वाढ खुंटली असून पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी मोठा उत्पादन खर्च करून उभी केलेली पिके पाण्याअभावी धोक्यात आली आहेत. या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन उमरखेड तालुका कोरडा दुष्काळ म्हणून जाहीर करावा, तसेच शेतकरी व पशुपालकांना तातडीने विशेष आर्थिक मदत व आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

उमरखेड तालुका काँग्रेस कमिटी व उमरखेड शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने शासन व प्रशासनाकडे खालील ठोस मागण्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये उमरखेड तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करावा व हेक्टरी २ लाख मदत द्यावी. तालुक्यातील गंभीर पाणीटंचाई व पीक नुकसानीची पाहणी करून, उमरखेड तालुका तातडीने कोरडा दुष्काळ म्हणून जाहीर करावा. तसेच खरीप नुकसानग्रस्त सर्व पात्र शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २ लाख आर्थिक मदत देण्यात यावी, ऊस व हळद उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी २ लाख विशेष मदत द्यावी. ऊस व हळद या पिकांसाठी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात उत्पादन खर्च केलेला आहे. मात्र पाण्याअभावी व प्रतिकूल हवामानामुळे या दोन्ही पिकांचे मोठे नुकसान होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे ऊस व हळद उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २ लाख विशेष आर्थिक मदत देण्यात यावी. इसापूर धरणातून तातडीने पाणी सोडावे. अशा विविध मागण्यांचे निवेदन तालुका काँग्रेस कमिटीच्या वतिने उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांना देण्यात आले. यावेळी काँग्रेसचे विधानसभा प्रभारी तथा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल ठाकरे , अरविंद वाढोणकर , संजय मोघे, महेंद्र कावळे यांच्यासह तातू देशमुख , नंदकिशोर अग्रवाल , महेन्द्र कावळे , दत्तराव शिंदे , गोपाल अग्रवाल , ख्वाजाभाई कुरेशी , बाळासाहेब चंद्रे , गणेश बेले, धोंडबा माने , उत्तम पांडे, अनिल कदम, गजानन भारती, कैलास राऊत, तात्या चव्हाण, गजानन मिटकरे, अमोल तुपेकर, जाहीर काजी, हमीद काजी, युवराज जाधव यांच्यासह असंख्य काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते

# वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकांच्या दिरंगाईचा फटका,लिपिक राठोड निलंबित

## जिल्हाधिकारी विकास मीना यांची जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयावर धडक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १६ :** शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकांचा निपटारा करण्यास दिरंगाई केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी विकास मीना यांनी धडक कारवाई केली आहे. जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातील वैद्यकीय देयक कक्षाची अचानक पाहणी करताना मोठ्या प्रमाणात प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले. लोकसेवा हक्क कायद्यातील निर्धारित कालमर्यादेचे उल्लंघन झाल्याने देयकाचे काम हाताळणारे संबंधित लिपिक स्वप्निल राठोड (बाह्यरुग्ण लिपिक) यांना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

जिल्हाधिकारी विकास मीना यांनी बुधवारी जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाला अचानक भेट देत कार्यालयीन कामकाजाची पाहणी केली. यावेळी त्यांनी विशेषतः वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक कक्षाच्या कामकाजाचा आढावा घेतला. जिल्ह्यातील शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मागील वर्षभरातील वैद्यकीय देयकांच्या प्रलंबित प्रकरणांची संख्या मोठी असल्याचे आढळून आले.

**दोन आढावा बैठका, १७८ देयके निकाली**

**वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकांचा प्रलंबित निपटारा करण्यासाठी जिल्हाधिकारी विकास मीना यांनी यापूर्वी सप्टेंबर महिन्यात दोन आढावा बैठका घेतल्या होत्या. या बैठकीनंतर १७८ वैद्यकीय देयके निकाली काढण्यात आली. मात्र, त्यानंतरही मोठ्या प्रमाणात प्रकरणे प्रलंबित राहिल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कार्यालयीन पाहणी करण्याचा निर्णय घेतला.**

**पाहणीदरम्यान अद्यापही दोनशेहून अधिक वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकांची प्रकरणे प्रलंबित असल्याचे उघड झाले. तसेच, काही प्रकरणांमध्ये लोकसेवा हक्क कायद्यातील निर्धारित कालमर्यादेचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले. यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित कामकाजाबाबत गंभीर दखल घेतली.**

**दिरंगाईवर जिल्हाधिकाऱ्यांचा कठोर बडगा**

**शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय देयकांचा वेळेत निपटारा होणे अपेक्षित असताना मोठ्या प्रमाणात प्रकरणे प्रलंबित राहिल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विकास मीना यांनी संबंधित लिपिक स्वप्रिल राठोड यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याचे निर्देश दिले. वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकांच्या निपटाऱ्यातील दिरंगाईला जबाबदार अधिकाऱ्यांकडून उत्तरदायित्व निश्चित करण्याचा संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.**

## थोडक्यात

### पटवर्धन मल्टीस्टेट प्रकरणाला नवे वळण..!

**अतुल महाजनांनी जबाबदारी स्वीकारल्याचा ठेवीदारांचा दावा माजी अध्यक्ष आशिष सोमण यांच्याकडून कागदपत्रांसह वस्तुस्थिती मांडण्याचा प्रयत्न**

**यवतमाळ :** रावसाहेब पटवर्धन मल्टीस्टेट सहकारी संस्थेतील कथित घोटाळ्याच्या प्रकरणाला बुधवारी (दि. १६ सप्टेंबर) नवे वळण मिळाले. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात संबंधित संचालकांना बैठकीसाठी बोलावण्यात आले होते. मात्र, मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या कामकाजामुळे पटवर्धन मल्टीस्टेटच्या संचालकांना पुढील तारीख देण्यात आली. दरम्यान, संस्थेचे माजी अध्यक्ष आशिष सोमण बैठकीच्या ठिकाणी उपस्थित राहिल्याने ठेवीदारा मध्ये चर्चेला उधाण आले. यावेळी आशिष सोमण यांनी ठेवीदारांशी संवाद साधत संबंधित तक्रारींची कागदपत्रे आणि पुरावे दाखविण्याचा प्रयत्न केला. या कागदपत्रांद्वारे त्यांनी आपली बाजू मांडत ठेवीदारांचा संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न केला. सोमण यांच्या म्हणण्यानुसार, आपण या प्रकरणात निर्दोष असल्याचे स्पष्ट करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे सोबत आणली होती.या प्रकरणी कीर्ती महाजन, सचिन बनकर, अश्विनी बनकर, अनिल बांद्रे, रुपेश येडे यांच्यासह इतर संचालकांनाही बैठकीसाठी बोलावण्यात आले होते. मात्र, संबंधित संचालक उपस्थित न राहिल्याने ठेवीदारांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली. त्यानंतर कथित घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार अतुल रामदास महाजन असल्याचा आरोप करत ठेवीदारांनी मोर्चा त्यांच्या निवासस्थानी वळविला. अतुल महाजन घरी उपस्थित नसल्याने ठेवीदारांनी त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधला. त्यानंतर महाजन यांना बोलावून सुमारे दोन तास चर्चा करण्यात आली. या चर्चेदरम्यान अतुल महाजन यांनी प्रकरणाची जबाबदारी स्वीकारून काही ठेवीदारांना पैसे परत करण्याचे आश्वासन दिल्याचा दावा उपस्थितांकडून करण्यात आला. मात्र, आश्वासनानंतरही ठेवीदारांचा निधी प्रत्यक्षात कधी परत मिळणार, याबाबत अद्याप ठोस स्पष्टता नाही. त्यामुळे आश्वासनाची अंमलबजावणी आणि ठेवीदारांच्या पैशांच्या परतफेडीची निश्चित प्रक्रिया जाहीर करण्याची मागणी होत आहे. कथित घोटाळ्याची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई होणार का, याकडे आता ठेवीदारांचे लक्ष लागले आहे.

### सहा महिन्यांची मुदत संपली, ग्रामपंचायतींच्या कारभारावर आता अधिकाऱ्यांचा ताबा!

**बाभुळगाव तालुक्यात विस्तार अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती**

**बाभुळगाव :** बाभुळगाव तालुक्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या कारभारावर आता विस्तार अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
यापूर्वी मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर सरपंच अथवा उपसरपंच यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, ही नियुक्ती निवडणुका होईपर्यंत किंवा जास्तीत जास्त सहा महिन्यांच्या कालावधीसाठी करण्यात आली होती. सहा महिन्यांचा कालावधी उलटूनही निवडणुका न झाल्याने आता ग्रामपंचायतींचा कारभार अधिकाऱ्यांच्या हाती सोपविण्यात आला आहे.
ग्रामपंचायतींच्या निवडणुका रखडल्याने गावपातळीवरील लोकप्रतिनिधिचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर शासनाच्या निर्णयानुसार प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया राबविण्यात आली. बाभुळगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी विस्तार अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची तसेच त्यांच्याकडे सोपविण्यात येणाऱ्या ग्रामपंचायतींची यादी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल खत्री यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविली होती.
या यादीला मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांकडे ग्रामपंचायतींच्या प्रशासकीय कारभाराची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यामुळे आता संबंधित ग्रामपंचायतींचे दैनंदिन कामकाज, प्रशासकीय निर्णय तसेच विकास कामाशी संबंधित प्रक्रिया नियुक्त प्रशासक अधिकाऱ्यांच्या माध्यमातून पार पडणार आहेत.
ग्रामपंचायतींच्या निवडणुका वेळेत न झाल्याने गावांच्या कारभारात लोकप्रतिनिधींची भूमिका मर्यादित झाली आहे. प्रशासकीय यंत्रणेकडे कारभार सोपविण्यात आला असला, तरी गावातील स्थानिक प्रश्न, विकासकामे आणि ग्रामस्थांच्या मागण्यांकडे प्रभावीपणे लक्ष देण्याचे आव्हान प्रशासनासमोर राहणार आहे. निवडणुका आणखी किती काळ लांबणार, असा सवाल आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.


**लवकर निवडणुका घेण्याची ग्रामस्थांची मागणी**

ग्रामपंचायतींच्या निवडणुका शासनाने तातडीने घ्याव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. गावपातळीवरील लोकप्रतिनिधित्व पूर्ववत होऊन स्थानिक समस्या मार्गी लागाव्यात आणि रखडलेल्या विकासकामांना गती मिळावी, यासाठी निवडणुका लवकर घेणे गरजेचे असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. प्रशासकीय कारभार सुरू असला, तरी गावाचा विकास आणि नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्यासाठी निवडणुका कधी होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पाटणबोरी स्टेट बँकेच्या मनमानी कारभाराचा आरोप..!

## ४२ गावांतील ग्राहक त्रस्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पाटणबोरी, दि. १६ :** पाटणबोरी येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेतील कथित संथ व मनमानी कारभारामुळे ४२ गावांतील ग्राहक त्रस्त झाल्याची तक्रार समोर आली आहे. क्षुल्लक कामांसाठीही ग्राहकांना दोन-दोन तास प्रतीक्षा करावी लागत असून, एका टेबलवरून दुसऱ्या टेबलवर वारंवार पाठवले जात असल्याचा आरोप ग्राहकांकडून करण्यात येत आहे.

पाटणबोरी येथील ही बँक परिसरातील ४२ गावांसाठी महत्त्वाची असून, वृद्धापकाळ निवृत्तीवेतन, निराधार योजना, 'लाडकी बहीण' योजनेशी संबंधित व्यवहार, शेतकरी तसेच व्यापाऱ्यांचे विविध बँकिंग व्यवहार मोठ्या प्रमाणात येथे होतात. विशेषतः हाताचा ठसा अथवा थम इम्प्रेशन न येणाऱ्या वृद्ध व महिलांना प्रत्यक्ष बँकेत येऊन व्यवहार करावा लागतो. काही ग्राहकांना ४० ते ५० किलोमीटर अंतरावरून बँकेत यावे लागत असल्याने दीर्घ प्रतीक्षेमुळे त्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगण्यात येते. ग्राहकांच्या म्हणण्यानुसार, दुपारी सुमारे २ वाजताच्या सुमारास लंच ब्रेकच्या नावाखाली बराच वेळ काउंटरवर सेवा उपलब्ध राहत नसल्याने ग्राहकांची गैरसोय होते. नव्याने कर्मचारीवर्ग दाखल झाल्यानंतरही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याची नाराजी ग्राहकांनी व्यक्त केली आहे. तसेच दुपारी ४ वाजल्यानंतर बँकेचे प्रवेशद्वार बंद केले जाते. एखाद्या ग्राहकाचे महत्त्वाचे काम प्रलंबित असतानाही प्रवेश नाकारला जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे दूरवरून आलेल्या ग्राहकांना पुन्हा बँकेत येण्याची वेळ येते.बँकेतील कामकाजात पारदर्शकता, वेळेवर सेवा आणि ग्राहकांशी योग्य वागणूक मिळावी, अशी मागणी ग्राहकांकडून होत आहे. या तक्रारींची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेऊन शाखेच्या कामकाजाची चौकशी करावी आणि आवश्यक त्या सुधारणा कराव्यात, अशी मागणी ४२ गावांतील ग्राहक व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# ऊस उत्पादक शेतकरी, व संघटनेची मागणी; उसाला प्रतिटन ५ हजार रुपये दर द्या

## गळीत हंगाम सुरू करण्याअगोदर दर घोषित करावा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. १६ :** येणाऱ्या ऊस गळीत हंगामात उसाला प्रती टन ५००० रूपये दर देण्याची मागणी आज उमरखेड महागाव ऊस उत्पादक संघटनेच्या वतीने नैचरल शुगर युनिट दोन च्या कार्यालयात एका लेखी निवेदनाद्वारे केली असुन हा दर गळीत हंगाम सुरू करण्या अगोदर घोषीत करावा.

मशागत,रा.खत,मजुरी व ऊस ऊत्पादनास लागणारे विविध निविष्ठा व ईतर बाबीचा खर्च दुप्पट झाला आसुन यावर्षी पाऊस सुध्दा आपुरा आहे. त्यामुळे एकरी उत्पादन सुध्दा बरेच घटणार आहे आणि शासनाने कारखाने लवकर सुरू करण्याचे ठरवील्याने त्याचा आर्थिक परीणाम आम्ही ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी का?भोगायचा या संपूर्ण बाबीचा सखोलपणे विचार करुन पाच हजार दर घोषीत करण्यात यावा तसेच जळीत ऊसाची केली जाणारी कपात आणि हार्वेस्टिंग मशीनने तोडलेल्या ऊसाची कपात सुध्दा बंद करावी. व ओव्हरलोड वाहतुकीसाठी परवानगी देण्यात येऊ नये अशा विविध मागण्यांचे निवेदन युनिट दोनचे जनरल मॅनेजर कदम साहेब यांना देण्यात आले. यावेळी संघटनेचे सचीव सुदर्शन रावते, गोविंदराव देशमुख, नंदकुमार हेडे,शरद देशमुख, सुधाकर दुपात्रे, गजानन तायडे, प्रथमेश देशमुख, अंकुश देशमुख, पांडुरंग विलायते, विलास गोरे, शिवाजी काकडे, इत्यादी ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# पुसद येथे गुरुदेव सेवा मंडळाच्यावतीने नगरसेवकांचा सत्कार.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १६ :** येथील गुरुदेव सेवा मंडळ, तालुका शाखा पुसदच्यावतीने नगर परिषद प्रभाग क्रमांक ११ चे नगरसेवक तथा शिक्षण सभापती विठ्ठल खडसे व नगरसेविका शिल्पा देशमुख, हभप विठ्ठल महाराज भोयर आदींचा शाल, ग्रामगीता व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. अध्यक्ष स्थानी मंडळाचे तालुकाध्यक्ष प्रा प्रकाश लामणे होते. यावेळी संभाजी ब्रिगेडचे प्रदेश कार्याध्यक्ष सुधीर देशमुख, मंडळाचे पदाधिकारी रमेश सरागे, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर सुरडकर, भजन प्रमुख माधवराव जाधव, ज्येष्ठ पदाधिकारी डॉ शरद राऊत, मनोहर बनस्कर, ज्ञानेश्वर ताकतोडे आदी उपस्थित होते.

स्थानिक देशमुख नगर मधील मंडळाच्या सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थनास्थळी आयोजित कार्यक्रमात सर्वप्रथम ग्रामगीता निर्माते वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आली. यावेळी मंडळाचे प्रचार प्रमुख राजेंद्र काळबांडे, शिक्षण सभापती विठ्ठल खडसे, सुधीर देशमुख व हभप विठ्ठल महाराज भोयर आदींनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे समता, मानवता व ग्रामगीतेचे कार्य मागील २५ वर्षांपासून समाजात निःस्वार्थपणे पोहचविणाऱ्या गुरुदेव सेवा मंडळ, पुसद तालुका शाखेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे कौतुक केले. व भविष्यात गुरुदेव सेवा मंडळाला सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. उपस्थितांचे आभार मंडळाचे उपाध्यक्ष प्रा नंदकुमार खैरे यांनी मानले. यावेळी मंडळाचे सदस्य वसंतराव ढोणे, यशवंत देशमुख, पुंडलिक भालेराव, यशवंत भगत, माधव गव्हाणे, बाबासाहेब वाघमारे, राजू बनस्कर, महिला प्रतिनिधी छाया प्रकाश लामणे, चंदा गोडसे आदी उपस्थित होत्या. याप्रसंगी पुसद शहर व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २३ सप्टेंबरला यवतमाळात उद्धव ठाकरे गटाचे शेतकरी आंदोलन..!

## आमदार नितीन देशमुख यांची पत्रकार परिषदेत घोषणा, विदर्भात कोरडा दुष्काळ जाहीर करा..! शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची मदत द्या!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १६ :** विदर्भातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची सरसकट मदत द्यावी, या मागणीसाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाच्या वतीने विदर्भातील विविध जिल्ह्यांत आंदोलन छेडण्यात येणार आहे.

यवतमाळ येथे २३ सप्टेंबर रोजी शेतकरी व शिवसेना पदाधिकाऱ्यांचा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येणार असल्याची घोषणा शिवसेनेचे उपनेते तथा आमदार नितीन बाबू देशमुख यांनी स्थानिक विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत केली. वाशिम, अकोला, यवतमाळ, बुलढाणा यासह अनेक तालुक्यांत आंदोलनाचे नियोजन सुरू असून, जिल्ह्यात आतापर्यंत शंभरहून अधिक शेतकऱ्यांसोबत बैठका झाल्याचे देशमुख यांनी सांगितले. विदर्भात पावसाने तब्बल ५० दिवस पाठ फिरवल्याने कपाशी व सोयाबीन पिके संपण्याच्या अवस्थेत आली आहेत. उत्पादनातून मिळणाऱ्या उत्पन्नावर कुटुंबाचा खर्च, मुलांचे शिक्षण आणि भविष्यातील स्वप्ने अवलंबून असताना शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची सरसकट मदत, पीकविमा योजना सुरू करणे, चारा डेपो सुरू करणे आणि नियमित वीजपुरवठा देणे, या प्रमुख मागण्या आंदोलनातून मांडण्यात येणार आहेत. उद्धव ठाकरे यांच्या निर्देशानुसार शिवसेना शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर रस्त्यावर उतरत असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी आमदार संजय देरकर, राजेंद्र गायकवाड, प्रवीण शिंदे, किशोर इंगळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. सरकारच्या शेतकरी धोरणावर टीका करताना देशमुख यांनी, सत्तेत नसताना कापूस व सोयाबीनला चांगला भाव देण्याचे आश्वासन देणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आता शेतकऱ्यांच्या वेदना दिसत नाहीत का, असा सवाल उपस्थित केला.

# मागासवर्गीयांच्या निधीवरून उईके यांच्या घरावर धडक मोर्चा!

## पोलिसांनी मोर्चा रोखून कार्यकर्त्यांना घेतले ताब्यात, डॉ.निरज वाघमारे यांचा इशारा - "निधी परत आणा, अन्यथा राजीनामा द्या!"

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १६ :** अनुसूचित जाती-जमातींच्या विकासासाठी असलेला तब्बल ४,६०१.१३ कोटी रुपयांचा निधी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकडे वळविल्याचा आरोप करत वंचित बहुजन आघाडी आणि विविध सामाजिक संघटनांनी आदिवासी विकासमंत्री प्रा. डॉ.अशोक उईके यांच्या निवासस्थानावर धडक मोर्चा काढला. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. निरज वाघमारे यांच्या नेतृत्वात शोभादेवी मंगल कार्यालय येथून निघालेल्या या मोर्चात जिल्हाभरातील वंचितचे कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत मागासवर्गीयांच्या हक्काचा निधी परत करण्याची मागणी करण्यात आली.

मोर्चाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी मंत्री अशोक उईके यांच्या निवासस्थान परिसरात मोठा फौजफाटा तैनात केला होता. आंदोलकांना निवासस्थानापूर्वीच पोलिसांनी अडविले. त्यानंतर आंदोलनकर्त्यांना पोलीस व्हॅनमध्ये बसवून ताब्यात घेण्यात आले. त्यामुळे परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. ४,६०१.१३ कोटींचा निधी परत करा अशी ठाम मागणी आंदोलना दरम्यान करण्यात आली यावेळी माध्यमांशी बोलताना डॉ. निरज वाघमारे यांनी सरकार आणि आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांच्यावर आक्रमक टीका केली. अनुसूचित जाती-जमातींचा ४,६०१.१३ कोटी रुपयांचा निधी सरकारने लाडकी बहीण योजनेसाठी वळविला आहे. हा पैसा आम्हाला परत मिळालाच पाहिजे. ज्या अनुसूचित जाती-जमातींच्या समाजाने अशोक उईके यांना निवडून दिले, त्याच समाजासोबत त्यांनी मोठी गद्दारी केली आहे. त्यांनी हा निधी परत आणण्यासाठी ठोस पुढाकार घ्यावा अन्यथा पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. वंचित बहुजन आघाडीच्या दाव्यानुसार, अनुसूचित जाती घटकातील ३,५९४.०३ कोटी रुपये आणि अनुसूचित जमाती घटकातील १,००७.१० कोटी रुपये, असा एकूण ४,६०१.१३ कोटींचा निधी महिला व बालविकास विभागाकडे वळविण्यात आला आहे. हा निधी शिक्षण, शिष्यवृत्ती, आरोग्य, पाणीपुरवठा, रोजगार तसेच दलित-आदिवासी वस्ती विकासासाठी वापरणे अपेक्षित असल्याचे पक्षाने म्हटले आहे. हा केवळ पैशांचा प्रश्न नसून समाजाच्या पुढील पिढीच्या भविष्याचा प्रश्न आहे. निधी परत मिळेपर्यंत संघर्ष थांबणार नाही. असा इशारा डॉ. वाघमारे यांनी दिला. वंचित बहुजन आघाडीच्या आंदोलनाच्या भूमिकेचा भाग म्हणून यवतमाळात करण्यात आलेल्या या मोर्चातून मागासवर्गीयांच्या विकास निधीचा मुद्दा आक्रमकपणे उपस्थित करण्यात आला.

# मातीच्या गणेशमूर्तींचा संदेश, महाविद्यालयाची जनजागृती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. १६ :** पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केळापूर (पांढरकवडा) येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जनजागृती मोहीम राबविण्यात आली. प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसरात जनजागृतीपर बॅनर लावून पीओपी मूर्ती टाळून मातीच्या गणेशमूर्तींचा वापर करण्याचे आवाहन केले.

यावेळी पीओपी व मातीच्या मूर्तींमधील फरक, पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या पद्धती आणि निर्माल्य व्यवस्थापनाची माहिती देण्यात आली. स्वयंसेवकांनी मातीच्या गणेशमूर्तींची विक्री करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. निर्माल्य नदी, नाले व जलस्त्रोतांमध्ये न टाकता निर्माल्य कुंडीत जमा करून त्यापासून खत तयार करण्याचे आवाहन करण्यात आले. नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्तीसोबतचे छायाचित्र प्रा. डॉ. अमर वंजारी यांच्याकडे पाठवावे. उत्कृष्ट सहभागासाठी विशेष बक्षीस देण्यात येणार आहे. बबलू येनचलवार, श्रेयश राठोड, सोनल किनाके व हर्षल गेडाम यांनी परिश्रम घेतले.

# अंजनगाव सुर्जी पंचायत समितीत खळबळ

## कुंभारगावचे तात्कालिक सचिव भरत निस्ताने तात्काळ निलंबित

**अंजनगाव सुजी/वार्ताहर**

कुंभारगाव ग्रामपंचायतीचे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी तथा सध्याचे सचिव भरत निस्ताने यांना शासकीय जागा खासगी व्यक्तीच्या नावे केल्याप्रकरणी तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे. गटविकास अधिकारी नवनाथ डापके यांनी हे निलंबन आदेश निर्गमित केले असून या कारवाईमुळे अंजनगाव सुर्जी पंचायत समिती प्रशासनात चांगलीच खळबळ उडाली आहे.




प्राप्त माहितीनुसार, प्रविण मालगे रा. कुंभारगाव यांनी ४ मार्च रोजी तक्रार अर्ज दाखल करून कुंभारगाव येथील शासकीय जागा खासगी व्यक्तींच्या नावे केल्याबाबत तक्रार केली होती.या तक्रारीच्या अनुषंगाने पंचायत समिती कार्यालयाने १४ ऑगस्ट रोजी निस्ताने यांना कारणे दाखवा नोटीस बजावून वस्तुनिष्ठ पुराव्यासह खुलासा मागविला होता.निस्ताने यांनी त्याच दिवशी खुलासा सादर केला, मात्र सदर खुलासा असमाधानकारक व मोघम स्वरूपाचा असल्याने तो अमान्य करण्यात आला.त्यानंतर दि. १७ ऑगस्ट रोजी चौकशी अहवाल पूर्ण करून कुंभारगाव ग्रामपंचायत अभिलेख्यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. त्यात असे आढळून आले की, निस्ताने यांनी फेरफार आकारणी करताना विहित कार्यपद्धतीचा अवलंब न करता शासकीय जागेची ग्रामपंचायत मूळ अभिलेखामध्ये खासगी व्यक्तीच्या नावे मालकी हक्कात नोंद घेऊन त्यांना करपावती देण्यात आली होती.त्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा वर्तणूक नियम १९६७ चे नियम ०३ अन्वये सचिव पदाचा गैरवापर करून नियमबाह्य काम व कर्तव्यात कसूर केल्याचे प्रथमदर्शनी आढळून आल्याने यापूर्वीच त्यांची जुलै २०२७ ची एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात थोपविण्याची कार्यवाही करण्यात आली होती.दरम्यान, या प्रकरणी कारवाईची मागणी करत १४ ऑगस्ट रोजी पंचायत समिती परिसरात आमरण उपोषण व गटविकास अधिकारी यांचे कक्षात ठिय्या आंदोलन झाले होते. आंदोलनादरम्यान सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीत विकास कामांमध्ये भ्रष्टाचार केल्याबाबतही चौकशीची मागणी करण्यात आली होती.त्या अनुषंगाने कुंभारगाव येथील विकास कामांमधील भ्रष्टाचार प्रकरणी उपअभियंता (बांधकाम) उपविभाग दर्यापूर यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच सदर प्रकरण राज्य गुणवत्ता निरीक्षक श्रेणी-२ यांचेकडे वर्ग करण्यात आले असून चौकशी प्रलंबित आहे.

अखेर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अमरावती यांचे आदेश क्रं. जिप/वित्त/आस्था/३८९०/१६ दि. ११/११/२०१६ अन्वये प्रत्यायोजित केलेल्या अधिकारानुसार, महा. जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे नियम ५ (२), (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून भरत शेषराव निस्ताने, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.पं. कुंभारगाव यांना हे आदेश निर्गमित झाल्याचे दिनांकापासून निलंबित करण्यात येत आहे. निलंबन काळात त्यांचे मुख्यालय मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांनी निश्चित करून दिल्याप्रमाणे राहील, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.या कारवाईमुळे अंजनगाव पंचायत समिती प्रशासनात चांगलीच खळबळ उडाली असून पंचायत समितीचा कारभार चव्हाट्यावर आला आहे.

### पंचायत समितीत एकाच वर्षात अनेक कारवाया

अंजनगाव सुर्जी पंचायत समिती प्रशासनात एक वर्षापासून कारवाईचे ग्रहण लागले आहे. शिक्षण विभागाती दोन अधिकाऱ्यांवर कारवाई झाल्यानंतर ग्राम विस्तार अधिकारी यांना लाचलुचपत विभागाने कारवाई केली आहे तर कुंभारगाव घरकुल घोटाळा प्रकरणी घरकुल अभियंता यांना सेवेतून कमी करण्यात आले असून ग्रामरोजगार सेवकावर वसूलीची कारवाई करण्यात आली आहे तर तात्कालिक ग्रामविकास अधिकारी भरत निस्ताने यांनी शासकीय जागा खाजगी व्यक्तीच्या नावे केल्याप्रकरणी तात्काळ प्रभावाने निलंबित केले आहे. या कारवाईमुळे पंचायत समिती प्रशासनात चांगलीच खळबळ उडाली आहे.

# कत्तलीसाठी बांधून ठेवलेले ७ गोवंश जनावरे जप्त

## धारणी पोलिसांची कारवाई

**धारणी/वार्ताहर**



पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण निकेतन कदम यांनी अवैध गोवंश वाहतूक व कत्तली विरोधात धडक कारवाईचे आदेश दिले आहेत. या आदेशानुसार धारणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठी कारवाई करण्यात आली आहे.१४ सप्टेंबर रोजी ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांना गोपनीय माहिती मिळाली की, खा-या टेंभ्रू गावात अज्ञात इसमाने गोवंश जनावरांची कत्तल करण्याच्या उद्देशाने जनावरे बांधून ठेवली आहेत. माहिती मिळताच पोलिस पथकाने गावात जाऊन पाहणी केली असता एका ठिकाणी ५ आणि दुसऱ्या ठिकाणी २ अशी एकूण ७ गोवंश जातीची जनावरे कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवल्याचे आढळले. पोलिसांनी सर्व जनावरे जप्त केली असून त्यांची अंदाजे किंमत १,२०,००० रुपये आहे.


चौकशी केली असता, ही जनावरे शेख समीर शेख गफ्फार, रा. धारणी याने १३सप्टेबर रोजी २०२६ रोजी रात्री ९ ते ९.३० वाजताच्या दरम्यान कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवल्याचे निष्पन्न झाले.याप्रकरणी आरोपी शेख समीर शेख गफ्फार याच्या विरुद्ध पोलीस स्टेशन धारणी येथे महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५, ५(बी), ९, ११ आणि प्राण्यांच्या छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी माधवराव गरूड यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार अवतारसिंग चव्हाण, पोहेकॉ सुमित सुरजूसे, पोकॉ रीतेश देशमुख , पोकॉ जगत तेलगोटे , पोकॉ आदित्य सुरनार यांनी केली.

# परतवाडा पोलिसांची अवैध गोवंश वाहतुकीवर कारवाई

## २,८०,००० रुपयांच्या मुद्द्यामालासह ३ आरोपी अटकेत

**अचलपूर/वार्ताहर**

धारणी रोडवरून बेकायदेशीररीत्या कत्तलीच्या उद्देशाने गोवंश जनावरांची वाहतूक करणाऱ्या बोलेरो वाहनावर परतवाडा पोलिसांनी धाड टाकून कारवाई केली आहे. या कारवाईत ८० हजार रुपये किंमतीची ९ गोवंशीय जनावरे आणि २ लाख रुपयांचे बोलेरो वाहन असा एकूण २,८०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ३ आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.



१६ सप्टेंबर रोजी परतवाडा पोलिसांना गोपनीय सूत्राकडून माहिती मिळाली .त्याआधारे धारणी रोडने एका पांढऱ्या रंगाच्या बोलेरो वाहनातून तीन इसम गोवंश जनावरांची चोरी करून त्यांना कत्तलीच्या उद्देशाने करजगावकडे घेऊन जात असल्याचे समोर आले.आणि याबाबत शहानिशा करून परतवाडा पोलिस स्टेशन चे ठाणेदार अजय आखरे यांच्या सूचनेनुसार व स.पो.नि.सलीम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ.सचिन होले, पो.हे.कॉ. सुधिर राऊत,पो.कॉ. चंद्रशेखर वानखडे, पो.कॉ. सचिन कोकणे,पो.कॉ. जितेश बाबील व दोन पंचांच्या पथकाने धारणी रोडवरील बुरडघाट बस थांब्याजवळ नाकाबंदी केली आणि सकाळी सुमारे ०६:०५ वाजताच्या सुमारास संशयित पांढऱ्या रंगाचे बोलेरो वाहन (क्र.एम.एच.१८ व्ही ०४५७) थांबवले. वाहनाची पाहणी केली असता, त्यामध्ये पाय बांधून कोंबलेल्या स्थितीत ९ गोवंशीय जनावरे आढळून आली. यात अटक करण्यात आलेले आरोपी खालीलप्रमाणे आहे .यात आरोपी सोहेल अहेमद शकील अहमद वय २२ वर्षे, रा. बोदड प्लॉट, करजगाव, ता. चांदुर बाजार ,समीर खान अझीम खान वय २२ वर्षे, रा. भट्टीपुरा, करजगाव, ता. चांदुर बाजार, रिजवान अहमद शेख निसार वय १९ वर्षे, रा. कुरेशी पुरा, करजगाव, ता. चांदुर बाजार यांचा समावेश आहे.आरोपींकडे जनावरांच्या मालकी हक्काबाबत किंवा वाहतुकीबाबत कोणतेही कायदेशीर कागदपत्रे अथवा वाहन चालकाचा परवाना मिळून आला नाही. यामध्ये ९ गोवंशीय जनावरे किंमत सुमारे ८० हजार रुपये आहे.बोलेरो चारचाकी वाहन क्र. MH 18 V 0457 किंमत सुमारे दोन लाख रुपये असून एकूण मुद्देमाल २ लाख ८० हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.यात जप्त करण्यात आलेल्या सर्व जनावरांची पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून वैद्यकीय तपासणी व उपचार करण्यात आले. त्यांची पुढील व्यवस्थेसाठी सैतुतबाग हनुमान गोसेवा समिती, अचलपूर येथे दाखल करण्यात आले आहे.सदर प्रकरणी पो.हे.कॉ. सचिन होले यांच्या फिर्यादीवरून आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०३(२), ३(५), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, प्राणी छळ प्रतिबंधक कायदा आणि मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमान्वये पोलीस ठाणे परतवाडा येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# श्री निळकंठ गणेशोत्सव मंडळतर्फे सायकल स्वास्थ रॅली

**अमरावती/का.प्र.**

श्री निळकंठ व्यायाम मंडळाचे गणेशोत्सवनिमित्य आयोजित परकोटाचे आत स्वास्थ रॅलीला सायकल स्वरांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला.या रॅलीचे आयोजन अभिनंदन पेंढारी आयोजक सायकल स्वास्थ रॅली यांनी केले. यावेळी या सायकल स्वास्थ रॅलीचा प्रारंभ हिरवी झेंडी दाखविण्यासाठी विरोधी पक्षनेता विलास इंगोले,सुनिल राणा तसेच प्रमुख अतिथी गोविंद कासट,अल्का आडे, वसंतराव साऊरकर, मेजर राजेंद्र बघेल, दिपक गुल्हाने, अध्यक्ष नि. व्या. मं अनंत साऊरकर गणेशोत्सव अध्यक्ष, योश्वर्य खोडकर व्यासपीठावर उपस्थित होते.



रॅलीत अमरावती जिल्हा सायकल असोसिएशनचे सदस्य, रामकृष्ण विद्यालयाचे विद्यार्थी, निळकंठ विद्यालयाचे विद्यार्थी, सहभागी झाले प्रास्ताविकपर भाषणातुन आयोजक अभिनंदन पेंढारी यांनी अतिथीचे स्वागत करीत नियमित सायकल चालविण्याचे फायदे विषद केले.विलास इंगोले,सुनिल राणा,प्राचार्या अलका आडे, गोविंद कासट यांनी समयोचित मार्गदर्शन केले. सर्व अतिथीनी सायकल रॅलीस हिरवी झेंडी दाखविली.५०० सायकल स्वार या रॅलीत सायकल चालवा आरोग्य मिळवा, सायकल चालवा शरीर तंदरुस्त राखा, सायकल चालवा प्रदुर्षण टाळा, सायकल चालवा हृदयविकार टाळा अश्या घोषणा देत शहरातील जुन्या भागात फिरून पुन्हा निळकंठ चौकात रॅली परत आली. त्यानंतर सायकल असोसिएशनच्या पंढरपूर रॅलीत सहभागी झालेल्या सर्व सदस्यांना मंडळाच्या वतीने सन्मान पत्र बहाल करण्यात आले.संचालन दिपक हुंडीकर तर आभार आनंद पारेख यांनी केले या कार्यक्रमास डॉ घनश्याम मुदगल मधुकर साऊरकर, धंनजय चतारे, विलास कारंजकर, प्रमोद गंगात्रे मनोज केवले रविंद्र इंगळे, श्रेयस शेलूकर, उमेश कोणलाडे, किरण साऊरकर,राजेंद्र गावाफळे, प्रा, राधेश्याम यादव, विजय बर्वे, अविनाश राजगुरे, देमराज मेंटे,बाळू कोणलाडे, पृथ्वीराज चव्हाण,डॉ शंशाक दुबे, राजा चौधरी सचिन पारेख, विकास केमदेव,संजय मेंडसे,राजेंद्र महाजन, पवनकुमार रामावत, आनंद वानखडे, दिनेश नरसु, जयमाला देशमुख राजू देशमुख, वर्षा सदार, प्रसाद पंत, प्रविण खानपासोले, प्रदीप झोड, सुभाष गुप्ता, राजकुमार अंबाडकर,प्रदीप खेडकर, राम जोशी, वेद बारलिगे, नरेश अतकरे, निलेश कारंजकर, सलील केवले, प्रवीण करुले,विजय शेलूकर, सदान् आरणकर, साईश खेडकर, मल्हार कारंजकर, प्रजवल खडेकर,संदीप खेडकर, श्रेयस शेलूकर, राजेंद्र केवले, प्रितम भोरे, सचिन खडेकार, मुख्याध्यापिका कविता कुमरे व शाळेचे शिक्षक वृंद, विदयार्थी गण बहुसंख्यने उपस्थित होते.

## जलवृक्ष चळवळीच्या वतीने नगरपालिका जवळच्या १७ झाडे कापणाऱ्यावर कारवाई करा!

**दर्यापूर/वार्ताहर**



चार दिवसाआधी हनुमान व्यायाम शाळा दर्यापूर यांच्या मालकीच्या हद्दीतील १७ झाडे कुठलीही पूर्वपरवानगी न घेता भर दिवसा तोडण्यात आली. त्याचे कुठलेही ठोस कारण सांगण्यात आले नाही.किंवा गेल्या पाच दिवसांमध्ये झाडे तोडणाऱ्यांचा शोध सुद्धा घेतला गेला नाही.म्हणून जल वृक्ष प्रेमींच्या व नागरिकांच्या मनामध्ये अनेक संभ्रम निर्माण होत आहे.यासबंधात जल वृक्ष चळवळीच्या वतीने नप ला निवेदन देण्यात आले.

झाडे हे शहराचा श्वास आहे. सर्व राष्ट्रीय कार्यक्रमांमधून झाडे लावा झाडे जगवा असा संदेश दिला जातो.प्रत्यक्षात मात्र ५०/ ५० वर्षाची झाडे अतिशय निर्दयीपणे बुडापासून तोडल्या जात आहेत.हे अत्यंत दुर्दैवी आहे. झाडे तोडणाऱ्यांचा तातडीने शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच महाराष्ट्र वृक्ष संवर्धन कायद्यानुसार दंड करण्यात यावा. व बारा फुटी पारंपारिक १०० झाडे त्यांच्याकडून लावून घेण्यात यावी.अशा स्वरूपाचे निवेदन विजय विल्हेकर,माणिकराव मानकर,मनोज तायडे,आतिश बयस,विजय लाजूरकर,गजानन देवके,दत्तात्रय मुऱ्हेकर,वर्षा अग्रवाल,नम्रता शहा,मालिनी पाटील,सिंधू विल्हेकर समस्त जलवृक्ष प्रेमी व नागरिकांच्या वतीने देण्यात आले.

# महानगरपालिकेच्या आमसभेत आता पूर्ण 'वंदे मातरम' सह 'जय जय महाराष्ट्र माझा'

## सभागृह नेते चेतन गावंडे यांचा पुढाकार; महाराष्ट्र गीताचाही समावेश

**अमरावती/का.प्र**


अमरावती महानगरपालिकेच्या आज झालेल्या आमसभेच्या प्रारंभी घेतल्या जाणाऱ्या 'वंदे मातरम' गीताच्या गायनाबाबत सभागृह नेते चेतन गावंडे यांनी महत्त्वाची मागणी सभागृहात मांडली.

मनपाच्या आमसभेच्या सुरुवातीला सध्या 'वंदे मातरम'च्या केवळ पहिल्या कडव्याचे गायन केले जाते. मात्र, शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचा संदर्भ देत 'वंदे मातरम' संपूर्णपणे म्हटले जावे, अशी आग्रही मागणी गावंडे यांनी केली.यासोबतच अमरावती महानगरपालिकेच्या आमसभेच्या प्रारंभी 'महाराष्ट्र गीत' अर्थात 'जय जय महाराष्ट्र माझा' याचाही समावेश करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली.



चेतन गावंडे यांनी सभागृहात भूमिका मांडताना सांगितले की, महानगरपालिकेची आमसभा ही लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या सहभागातून चालणारी महत्त्वाची सार्वजनिक संस्था आहे. त्यामुळे सभेच्या प्रारंभी देशभक्तीची भावना जागृत करणाऱ्या 'वंदे मातरम'ला योग्य तो सन्मान मिळणे आवश्यक आहे. केवळ काही ओळी न म्हणता पूर्ण गीताचे गायन करण्याची पद्धत सुरू करावी, अशी त्यांची भूमिका आहे.विशेष म्हणजे महाराष्ट्र शासनाने 'जय जय महाराष्ट्र माझा' हे महाराष्ट्राचे राज्यगीत म्हणून १९ फेब्रुवारी २०२३ पासून स्वीकारले असून, शासनाच्या सार्वजनिक कार्यक्रमांच्या सुरुवातीस राज्यगीताचे गायन किंवा वादन करण्याबाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. महाराष्ट्राचे राज्यगीत 'जय जय महाराष्ट्र माझा' या दोन्ही गीतांना स्थान देण्याची मागणी सभागृह नेते चेतन गावंडे यांनी केली आहे.दरम्यान, 'वंदे मातरम'ला २०२५ मध्ये १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने विविध शासकीय आणि सार्वजनिक उपक्रमांमध्ये या गीताच्या गायनासह देशभक्तीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबत निर्णय घेतले होते.


# अचलपुर येथील गणेश दर्शन




जय शिवराय गणेशोत्सव मंडळ,तुळजापुर जहागिरी




नवयुवक गणेश उत्सव मंडळ, महिराबपुरा



निळकंठ गणेश उत्सव मंडळ, नशिबपुरा




बाल गणेश उत्सव मंडळ




श्री गणेश उत्सव मंडळ रायपुरा




श्री बाल ध्रुव मंडळ



श्री बालमित्र गणेश उत्सव मंडळ खिरणीबागपुरा



श्री महाविर हनुमान मित्र गणेश मंडळ



श्री नवकेशरी गणेश मंडळ, लोहार लाईन.



श्री जगदंब बाल गणेश मंडळ, अब्बास पुरा.

# विघ्नहर्त्याचा प्रवास...

वैदिक सूक्तांमधील एका गूढ, अमूर्त संकल्पनेपासून सुरू झालेला 'श्री गणेशा'चा प्रवास पुढे मध्ययुगीन पुराणांमधून आकारास आला आणि महाराष्ट्राच्या भक्ती चळवळीत कोट्यवधींच्या हृदयातील 'लोकदैवत' बनून रुजला. कोणत्याही कार्याचा प्रारंभ ज्याच्या नामस्मरणाने होतो, त्या विघ्नहर्त्याचा हा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक प्रवास म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानाचा एक अनोखा इतिहासपट आहे.

वैदिक काळ (इ.स.पूर्व १५००-८००) : अमूर्त 'गणांचा स्वामी' ऋग्वेदात (२.२३.१) गणपती ही हत्तीच्या मुखाची मूर्ती नसून एक अमूर्त संकल्पना होती. 'गणानां त्वा गणपतिं हवामहेष्ठ' या प्रसिद्ध मंत्रात 'गणांचा पती' किंवा 'प्रार्थनांचा स्वामी' म्हणून ब्रह्मणस्पती (बृहस्पती) देवतेला ही पदवी दिली गेली होती. या काळात कोणत्याही भौतिक रूपाची किंवा मूर्तीची पूजा केली जात नव्हती, तर केवळ मंत्र आणि ऋचांद्वारे या अमूर्त शक्तीचे आवाहन केले जात असे.




उत्तर-वैदिक काळात अमूर्त संकल्पनेला प्रथमच एक निसर्गरूप मिळण्यास सुरुवात झाली. यजुर्वेदाच्या 'मैत्रायणी



संहिते'त (२.९.१) प्रथमच गणेशाच्या शारीरिक स्वरूपाचा संदर्भ मिळतो : 'तत्पुरुषाय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि तन्नो दन्तिः प्रचोदयात्'. येथे 'वक्रतुंड' आणि 'दंती' (हत्तीचे मुख असलेला) या शब्दांद्वारे गणपतीचे प्रतीक स्पष्ट झाले.वैदिक काळातील सूक्ष्म आणि अमूर्त 'ब्रह्मणस्पती' हळूहळू निसर्गातील भव्य, ताकदवान आणि बुद्धिमान अशा हत्तीच्या रूपाशी जोडला गेला. या काळात हत्तीचे मस्तक हे केवळ शारीरिक रूप नसून अफाट शक्ती, गांभीर्य आणि मार्ग निर्माण करणाऱ्या क्षमतेचे प्रतीक मानले गेले, ज्यातून पुढे 'विघ्नहर्ता' ही संकल्पना दृढ झाली.

उपनिषद काळ (इ.स.पूर्व ५००-३००) : 'गणपति अथर्वशीर्ष उपनिषदात' गणपतीला केवळ एक देव न मानता सर्वोच्च परब्रह्म आणि सृष्टीचे मूळ मानले गेले : 'त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसिष्ठ त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि' येथे गणपतीला ॐकार (प्रणव) रूप आणि त्रिमूर्तींचा (ब्रह्मा, विष्णू, महेश) उगम मानले गेले.

गुप्त काळ व पुराणे (इ.स. ४ थे ते १० वे शतक) : गुप्त काळात गणपतीच्या स्वतंत्र मूर्ती व पूजेला ऐतिहासिक बळकटी मिळाली. उदयगिरी लेणी (विदिषा, मध्य प्रदेश), भूमराचे शिवमंदिर (सतना) आणि देवगडचे दशावतार मंदिर (उत्तर प्रदेश) येथे इ.स. ४ थ्या ते ६ व्या शतकातील गणपतीच्या सर्वात प्राचीन स्वतंत्र मूर्ती आढळतात. या काळात गणपती 'विघ्नहर्ता' आणि आद्य पूज्य म्हणून प्रस्थापित झाला. तसेच महाभारतात महर्षी व्यासांचा लेखनिक म्हणून त्याचा गौरव झाला.

गणेश पुराण व गाणपत्य संप्रदाय (इ.स. ११००-१६००) : मध्ययुगात 'गाणपत्य संप्रदाया'चा उदय झाला. या काळात रचल्या गेलेल्या 'गणेश पुराणा'त (उपासना व क्रीडा खंड) गणपतीला सर्व देवांपेक्षा श्रेष्ठ स्थान देऊन चार युगांतील त्याच्या अवतारांची (महोत्कट, मयूरेश्वर, गजानन, धूम्रकेतू) कथा मांडली गेली.

महाराष्ट्रातील भक्ती चळवळ (१६ वे व १७ वे शतक) : संत मोरया गोसावी यांनी चिंचवड येथे इ.स. १५६१ मध्ये संजीवन समाधी घेतली. त्यांनी चिंचवड देवस्थानची स्थापना करून गाणपत्य संप्रदायाचे पुनरुज्जीवन केले. त्यांच्या अनन्य भक्तीमुळेच 'गणपती बाप्पा मोरया !' या जयघोषाचा जन्म झाला.

समर्थ रामदास स्वामी यांनी 'दासबोधाच्या' प्रारंभी (१.१.२) गणेश स्तवन रचले आणि मोरगावच्या मयुरेश्वर दर्शनानंतर 'सुखकर्ता दुखहर्ता' ही प्रसिद्ध आरती रचून गणपतीला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचे केंद्रस्थान बनवले. आधुनिक काळात, १८९३ मध्ये लोकमान्य टिळकांनी घरगुती पूजेला 'सार्वजनिक गणेशोत्सवा'चे क्रांतिकारी स्वरूप दिले. यामुळे गणपती हा केवळ धार्मिक राहिला नाही, तर तो समाज संघटन आणि राष्ट्रजागृतीचे महाप्रतीक बनला.

**गौरी मांजरेकर**

# सोन पावलांनी गौराई आली..

भारतीय मन हे उत्सवप्रिय आहे. अनेक सांस्कृतिक सण मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. गणेश चतुर्थी हा याच परंपरेतील सर्वात मोठा सण आहे. घरोघरी श्री गणेशाचे आगमन मोठ्या थाटात केले जाते. गणपती हे या सणाचे आराध्य दैवत असले तरी, गणेशाच्या मागून लगेचच येणाऱ्या गौरींनाही तेवढेच महत्त्व आहे. त्या त्याच थाटात श्री गणेशाच्या शेजारी विराजमान होतात.



भाद्रपद मासात येणाऱ्या या गौरींचे व्रत 'ज्येष्ठा गौरी' या नावाने प्रसिद्ध आहे. श्री गणेश आणि गौरी यांचे एकत्र आगमन त्यांच्यातील ऋणानुबंध दर्शवते, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. गणेशासह येणाऱ्या गौरी कधी गणेशाची पत्नी म्हणून, तर कधी भगिनी, तर कधी माता म्हणून दिसतात. कधी लक्ष्मी रूपात तर कधी पार्वती स्वरूपात असतात. मुळात त्या आदिशक्तीच्या प्रतिरूपात असल्याने पार्वती आणि लक्ष्मी ही भिन्न नावे असली तरी त्यांचा मूळ शक्तीस्रोत एकच आहे. त्यांचे उत्पत्ती मूळ, तसेच काळानुरूप त्यांच्या रूपात झालेला बदल आणि विकास हा तितकाच रोचक आणि गूढरम्य आहे.

**गौरी म्हणजे काय?**

गौर म्हणजे सर्वोत्तम असे तेज. तपोबलाच्या तेजाने युक्त आहे ती म्हणजे गौरी. वैशाख वणवा सरला की निसर्गात परिवर्तनाचे वारे वाहू लागतात. तप्त धरणीवर पर्जन्याच्या तुषारांचे असंख्य मोती नवचैतन्य निर्माण करतात. सृष्टी जणू सासरच्या तप्त झळा सोसून माहेरी आलेल्या विवाहितेप्रमाणे पुन्हा एकदा बहरून येते. सृष्टीचे नवतेजाने बहरास येणे, हे गावोगावच्या माता-भगिनी ज्येष्ठा गौरी या व्रताच्या माध्यमातून साजरे करतात. म्हणूनच कोकणासारख्या ठिकाणी पृथ्वीतत्त्वाचे प्रतीक असलेल्या तेरड्याच्या रोपांचे गौरी म्हणून पूजन केले जाते. येथे साक्षात भूमातेला गौरींच्या रूपात घरी आणून पोटच्या लेकीप्रमाणे यथामती, यथाशक्ती तिचे गोडकौतुक केले जाते. जगतजननीच्या मातृत्वाचा सामान्य मातेकडून होणारा हा सन्मान अद्भुतच म्हणावा लागेल.

**ज्येष्ठा आणि कनिष्ठा**

ज्येष्ठा गौरींच्या मुळाचा शोध घेतल्यास त्यांचा सर्वप्रथम स्पष्ट संदर्भ आपल्याला पुराणात 'ज्येष्ठा लक्ष्मी' आणि 'कनिष्ठ लक्ष्मी' असा सापडतो. महाराष्ट्रातील काही भागात ज्येष्ठा गौरींची आरास दोन बहिणींच्या रूपात केली जाते. याच दोघी पौराणिक ग्रंथात मोठी 'ज्येष्ठा' तर धाकटी 'कनिष्ठा' म्हणून आढळतात. त्यांचा येणारा हा उल्लेख मध्ययुगीन काळातील असला तरी त्यांच्या गुण-कर्मानुसार त्यांचा प्राचीन उल्लेख हा वैदिक वाङ्मयात 'पापीलक्ष्मी' आणि 'पुण्यलक्ष्मी' असा आलेला आहे. या विशेषणांवरूनच दोघींच्या सात्विक आणि तामसिक प्रवृत्तीची अनुभूती येते. गौरी-गणपतीच्या काळात जरी दोघींची एकत्र पूजा होत असली तरी त्या परस्परविरुद्ध स्वभावाच्या आहेत.

गौरी-गणपतीचा हा सण महाराष्ट्रात मोठ्या श्रद्धेने, पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो. गौरी विसर्जन साधारणपणे तिसऱ्या दिवशी वाजत-गाजत आणि गौरीचा जयघोष करत केले जाते. महाराष्ट्रात गौरी-गणपती या सणाला आगळे-वेगळे सांस्कृतिक महत्त्व आहे.

गौरी-गणपतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**- डॉ. विजय बाबर,** वर्धा. (मो. ९४२३११८८०६)
ज्येष्ठ पत्रकार, चंद्रपूर/पुणे

# पुण्याचा गणेशोत्सव : हर्षोल्लास, चैतन्य आणि परंपरेचा संगम

गणेशोत्सव म्हणजे हर्षोल्लासाचा, चैतन्याचा आणि पारंपारिक संस्कृतीचा महोत्सव. गेल्या वर्षी राज्य शासनाने गणेशोत्सवाला 'राज्योत्सव' म्हणून घोषित केल्याने सर्व गणेश मंडळांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. शंभर वर्षांहून अधिक काळ मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या या उत्सवाला आता शासकीय पाठबळ मिळाल्याने आर्थिक मदत आणि सुविधाही मिळणार आहेत. त्यामुळे हा उत्सव अधिक भव्य-दिव्य होणार असून जागतिक स्तरावर त्याला नवी ओळख मिळत आहे.

ढोल-ताशांच्या गजरात आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात लाडक्या बाप्पाचे मांगल्यमय आगमन झाले आहे. बाप्पाच्या आगमनाने पुणेकरांचा आनंद द्विगुणित झाला आहे. नगारा आणि सनईच्या सुमधुर आवाजात मानाच्या पाच आणि प्रमुख मंडळांच्या मिरवणुकांनी शहर दुमदुमून गेले. गणेश चतुर्थीच्या दिवशी रस्त्यांवर माणसांचे थवेच्या थवे ओसंडून वाहत होते. घरगुती गणपती प्रतिष्ठापनेच्या लगबगीमुळे लक्ष्मी रोड, तुळशीबाग, शिवाजीनगर, नारायण पेठ, सदाशिव पेठेतील बाजारपेठा गजबजून गेल्या होत्या.

**ढोल-ताशा पथकांचा उत्साह**

गेल्या काही वर्षांत पुण्यात ढोल-ताशा-नगारा वाजवणारी अनेक मंडळे स्थापन झाली आहेत. यात उच्चभ्रू घरातील माणसे व महिलांचाही मोठा सहभाग असतो. एकेका मंडळात ४० ते ५० किंबहुना १०० हून अधिक वादक असतात. रस्त्यावर ढोल वाजवण्याचा आनंद अप्रतिम असतो. यासोबत लेझीम पथकेही असतात. पांढरा कुर्ता, भगव्या रंगाचे जॅकेट किंवा दुपट्टा व फेटा असा त्यांचा पेहेराव असतो. शहराबाहेरील अनेक सोसायट्यांमध्येही स्वतंत्र ढोल-ताशा मंडळे स्थापन झाली आहेत. गणेशोत्सवाच्या महिनाभर



आधी ही मंडळे वादनाची तालीम करतात.

**मानाच्या पाच गणपतींचे आगमन**

१. कसबा गणपती (मानाचा पहिला) : प्रथम पूजेचा मान लाभलेल्या श्री कसबा गणपतीचे उत्साहात आगमन झाले. सकाळी ८ वाजता मिरवणुकीला प्रारंभ झाला. प्रभात बँड पथक, संघर्ष श्रीराम आणि शौर्य ढोल-ताशा पथकाच्या तालाने पुणेकर थिरकले. परंपरेप्रमाणे श्रींची मूर्ती चांदीच्या पालखीतून मंडपात



आणण्यात आली.

२. तांबडी जोगेश्वरी (मानाचा दुसरा) : नारायण पेठेतील केळकर रस्त्यावरून या मंडळाच्या मिरवणुकीला सुरुवात झाली. आठव बंधूंचे नगारा वादन, न्यू गंधर्व ब्रास बँड, शिवमुद्रा व ताल ढोल-ताशा पथकाच्या वादनाने भाविक मंत्रमुग्ध झाले.

३. गुरुजी तालीम (मानाचा तिसरा) : फुलांच्या आकर्षक रथात विराजमान झालेल्या गणपतीसमोर जयंत नगरकर यांचे नगारा वादन, गुरुजी प्रतिष्ठान, शिवतेज, शिवरुद्र, शिवताल, रुद्रतेज, कलावंत ढोल-ताशा पथके सहभागी झाली होती. स्वप्नील आणि सुभाष सरपाले यांनी बनविलेल्या फुलांच्या रथातून आगमन झाले.

४. तुळशीबाग गणपती (मानाचा चौथा) : तुळशीबागेतील श्रीराम मंदिरापासून पालखीतून मिरवणूक निघाली. बाबू गेनू चौक, मंडई, बाजीराव रस्ता, लक्ष्मी रस्त्यावरून मिरवणूक काढण्यात आली. दुपारी १२.३० वाजता श्री गोविंद देवगिरी महाराज यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा झाली. यावर्षी प्रथमच भाविकांना चरणस्पर्शाचा लाभ घेता येणार आहे.

५. केसरी वाडा गणपती (मानाचा पाचवा) : लोकमान्य टिळकांनी स्वतः स्थापन केलेल्या या मंडळाच्या गणपतीची पालखीतून मिरवणूक निघाली. रौनक रोहित टिळक यांच्या हस्ते प्रतिष्ठापना झाली. येथे सर्व परंपरा पाळून उत्सव साजरा केला जातो.

याशिवाय हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती असलेल्या श्रीमंत भाऊसाहेब रंगारी ट्रस्ट, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती आणि अखिल मंडई मंडळाच्या गजाननाची फुलांनी सजविलेल्या ओंकार रथातून पारंपरिक पद्धतीने प्राणप्रतिष्ठा झाली. या मंडळांच्या दर्शनासाठी दहाही दिवस भाविकांची प्रचंड रांग लागलेली असते.या काळात पुणे फेस्टिव्हलचाही शुभारंभ होतो. देशातील मोठे कलावंत हजेरी लावतात. रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, मनोरंजन आणि ज्ञानवर्धक कार्यक्रमांची रेलचेल असते. पुणेकरांसाठी हा दहा दिवसांचा सोहळा मोठी पर्वणीच असते.

**मानाचे गणपती म्हणजे काय?**

१८९३ साली लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरुवात केली. स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा त्यामागे होती. दुसऱ्याच वर्षी मंडळांची संख्या १०० वर गेली. त्यामुळे विसर्जन मिरवणुकीचे नियोजन कसे असावे यावर चर्चा झाली. कसबा गणपती हे पुण्याचे ग्रामदैवत असून त्याचे मंदिर शिवाजी महाराजांच्या काळातील आहे. म्हणून कसबा गणपतीला मानाचा पहिला मान आणि विसर्जन मिरवणुकीतही पहिला मान देण्याचे टिळक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ठरवले. म्हणून आजही कसबा गणपती विसर्जन मिरवणुकीत पहिला असतो.

त्यानंतर ग्रामदेवी मानल्या जाणाऱ्या तांबडी जोगेश्वरी मंदिराच्या सार्वजनिक गणपतीला दुसरा मान मिळाला. हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या गुरुजी तालीम मंडळाच्या गणपतीला तिसरा, तर तुळशीबाग मंडळाच्या गणपतीला चौथा मान दिला गेला. टिळकांनी स्थापन केलेला केसरी वाडा गणपती हा मानाचा पाचवा गणपती मानला जातो.दहा दिवसानंतर सर्वत्र विसर्जनाची तयारी सुरू होते. विसर्जन मिरवणूक जवळपास १८ ते २० तास चालते. ती शांततापूर्ण आणि शिस्तीने व्हावी यासाठी प्रशासन आणि पोलीस प्रयत्न करतात. ही मिरवणूक पाहायला पुणे व परिसरातील लोक लाखोंच्या संख्येने येतात आणि बाप्पाला निरोप देतात. ढोल, ताशे, नगारे, भजनी मंडळ, लेझीम पथक, तालीम मंडळ यांचा मिरवणुकीत मोठा सहभाग असतो. जिवंत देखावे व स्वयंचलित देखावेही सादर केले जातात. या उत्सवामुळे दहा दिवस पुणेकरांचे जीवन चैतन्याने आणि उत्साहाने भरलेले असते आणि हा उत्साह वर्षभर कायम टिकतो.

**- सुनील देशपांडे,**

## त-ड-का

### जय हो महाभूपती..!

ज्यांची मनोभावे करीता भक्ति
जीवनातील विघ्ने दूर होती
आम्ही नमितो असा जो तो
पार्वतीनंदन महाभूपती..!

कार्यारंभी श्रध्दा सदभावनेने
जो पुजे महाभूपती
निर्विघ्न त्यांचे कार्य पार पडे
अशी भक्तांना येतसेअनूभूती ..!

शक्ति युक्तिचा तो दाता
म्हणुनी म्हणती विघ्नहर्ता
जगा व जगू द्या चा संदेश
देई तो आपल्या भक्ता .. !



**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
मो.९४२१३९४३३९

## जागतिक रुग्ण सुरक्षा दिन

# प्रत्येक रुग्णाला उत्तम आरोग्यसेवा आणि सुरक्षा मिळवणे कितपट सहज

अलीकडेच एका प्रसिद्ध वृत्तपत्रात बातमी वाचली. राजस्थानमधील कोटा येथील १५ वर्षीय तन्वी परियानी ही गंभीर हृदयरोगाने ग्रस्त होती. वर्ष २०१४ पासून तब्बल १३ वर्षे दिल्लीतील एम्स रुग्णालयात शस्त्रक्रियेची वाट पाहत असताना १ सप्टेंबर रोजी तिचे निधन झाले. या १३ वर्षांच्या कालावधीत तन्वीच्या कुटुंबाचे लाखो रुपये खर्च झाले. शस्त्रक्रियेसाठी नवीन नवीन तारखा मिळत राहिल्या; मात्र शस्त्रक्रिया झाली नाही. तन्वीच्या वडिलांनी रुग्णालयावर दोषारोप केला आणि म्हटले की, 'मी गरीब आहे, पण मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी लढत राहील.' तन्वीच्या मृत्यूनंतर एम्सने उपचार आणि मृत्यूच्या प्रकरणाचा आढावा घेण्यासाठी चौकशी समिती स्थापन केली आहे. मध्य प्रदेशातील बालाघाटच्या आदिवासी भागात ३० हून अधिक मुलांच्या मृत्यूच्या बातमीने अस्वस्थ केले; अशा दुःखद घटनांमुळे आरोग्य सुविधा सुरक्षा आणि प्रशासनावर थेट प्रश्नचिन्ह निर्माण होतो. अलीकडेच तेलंगणातील कोलामगुडा या ग्रामीण भागात सात महिन्यांची गर्भवती महिला गंभीर आजारी पडली. खराब रस्ता आणि कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्यामुळे गावातील लोकांनी कामचलाऊ स्ट्रेचर तयार केले आणि उफाळून वाहणारी नदी पार करून त्या महिलेला प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचवले. ग्रामीण भागात अशा अनेक घटना दररोज घडतात. अनेक भागांत आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचण्यासाठी साधे रस्तेही उपलब्ध नाहीत. वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे दरवर्षी मोठ्या संख्येने लोकांना आपला जीव गमवावा लागतो. ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांमध्ये पुरेशा आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता कायमच असते.

दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी जगभरात रुग्णांना उत्तम आरोग्य सुविधा आणि सुरक्षितता मिळावी यासाठी जागतिक रुग्ण सुरक्षा दिन साजरा केला जातो. यावर्षी २०२६ ची थीम 'गैर-संसर्गजन्य रोगांसाठी सुरक्षित आरोग्यसेवा' अशी आहे आणि त्याचा अधिकृत नारा 'जीवनासाठी सुरक्षित आरोग्यसेवा' असा आहे. भारतात रुग्णांच्या सुरक्षिततेसमोर आरोग्यसेवेच्या मूलभूत पायाभूत सुविधांवर असलेला अत्यधिक ताण, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची मोठी कमतरता, अत्याधुनिक संसाधनांचा अभाव आणि रुग्ण-आरोग्यसेवा प्रदाता यांच्यातील उच्च प्रमाण यांसारखी मोठी आव्हाने आहेत. आपल्या देशात लोकसंख्येच्या तुलनेत आरोग्य चिकित्सकांची मोठी कमतरता आहे.झपाट्याने वाढणारे आजार देशाच्या लोकसंख्येवर आपली पकड वेगाने घट्ट करत आहेत. यामध्ये गरीब आणि मध्यमवर्गीय, विशेषतः ग्रामीण भागातील रुग्णांना मोठा संघर्ष करावा लागतो. रुग्णवाहिकेसाठी पैसे नसल्यामुळे आपल्या प्रियजनांचे मृतदेह खांद्यावर वाहून नेणाऱ्या कुटुंबियांना आपण अनेक वेळा पाहिले आहे.




सॅम्पल रजिस्ट्रेशन सिस्टम स्टॅटिस्टिकल रिपोर्टनुसार, २०२४ मध्ये झालेल्या एकूण मृत्यूंपैकी जवळपास निम्मे मृत्यू कोणत्याही प्रशिक्षित व्यावसायिकाच्या वैद्यकीय देखरेखीशिवाय झाले. २०२४ मध्ये अशा मृत्यूंचे प्रमाण ४५.५ टक्के होते, जे २०२० मध्ये नोंदवलेल्या १८ टक्क्यांपेक्षा दुप्पटपेक्षाही अधिक आहे. २०२१ पासून हे प्रमाण एकूण मृत्यूंच्या जवळपास निम्मे राहिले आहे. या श्रेणीत अशा लोकांचा समावेश होतो, ज्यांना मृत्यूच्या वेळी कोणतीही वैद्यकीय मदत मिळाली नाही किंवा ज्यांची काळजी केवळ अप्रशिक्षित व्यक्तीकडून घेण्यात आली. २०२४ मध्ये प्रशिक्षित वैद्यकीय सेवेशिवाय झालेल्या मृत्यूंचे प्रमाण ग्रामीण भागात ४८.९ टक्के, तर शहरी भागात ३६.१ टक्के होते.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार, आरोग्यसेवा घेत असताना प्रत्येक १० रुग्णांपैकी जवळपास एका रुग्णाला हानी पोहोचते आणि असुरक्षित आरोग्यसेवेमुळे दरवर्षी ३० लाखांहून अधिक मृत्यू होतात. कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये असुरक्षित आरोग्यसेवेमुळे प्रत्येक १०० लोकांपैकी ४ जणांचा मृत्यू होतो. ५० टक्क्यांहून अधिक हानी टाळता येऊ शकते. या हानीपैकी निम्मी हानी औषधांशी संबंधित समस्यांमुळे होते. काही अंदाजानुसार, प्राथमिक आणि बाह्यरुग्ण आरोग्यसेवा व्यवस्थेत प्रत्येक १० रुग्णांपैकी ४ रुग्णांना हानी पोहोचते, तर यापैकी ८० टक्क्यांपर्यंत हानी टाळता येऊ शकते. उदाहरणार्थ औषधांशी संबंधित चुका, असुरक्षित शस्त्रक्रिया प्रक्रिया, आरोग्यसेवेशी संबंधित संसर्ग, तपासणी किंवा निदानातील चुका, प्रेशर अल्सर, रुग्णाची चुकीची ओळख, असुरक्षित रक्त संक्रमण आणि व्हेनस थ्रोम्बोएम्बोलिझम यांचा समावेश होतो. रुग्णाला होणाऱ्या हानीमुळे जागतिक आर्थिक विकासात घट होऊ शकते. जागतिक स्तरावर या हानीची अप्रत्यक्ष किंमत दरवर्षी ट्रिलियन अमेरिकी डॉलर इतकी असते.

हेल्थव्हॉइस - मेडिसर्कल मीडिया व्हेंचर जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, जगातील सर्वात मोठ्या आणि सर्वाधिक गुंतागुंतीच्या आरोग्यसेवा व्यवस्थांपैकी एक असलेल्या भारतावर या समस्येचा मोठा भार आहे. १८व्या वार्षिक मेडिकोलीगल रिव्ह्यूनुसार, केवळ २०२५ मध्ये भारतात वैद्यकीय निष्काळजीपणाची ६५,००० प्रकरणे नोंदवली गेली. अशा प्रकरणांमधून समोर येणारे धोके ही एक मोठी जागतिक समस्या दर्शवतात. जागतिक आरोग्य संघटनेचे म्हणणे आहे की, असुरक्षित वैद्यकीय सेवेमुळे दरवर्षी अंदाजे १३.८ कोटी रुग्णांना हानी पोहोचते.

आजकाल प्रत्येक क्षेत्रात बनावट उत्पादनांची भरमार आहे आणि औषध बाजारही त्याला अपवाद नाही. बनावट औषधांचे साम्राज्य वेगाने वाढत आहे. बनावट औषधांच्या नेटवर्कमध्ये आणि उत्पादनात वेगाने होत असलेल्या वाढीमुळे बनावट औषधे रोखण्यासाठीच्या पॅकेजिंगची जागतिक बाजारपेठ २०२६ मध्ये १२९ अब्ज अमेरिकी डॉलर पर्यंत पोहोचली आहे. महाराष्ट्रातील सरकारी रुग्णालयांमध्ये बनावट औषधांचा साठा आढळल्याच्या घटनाही घडल्या आहेत. काही काळापूर्वीच शासकीय नागपूर मेडिकल महाविद्यालय व रुग्णालयातही अशी बाब समोर आली होती. एक काळ असा होता की, चिकित्सक हाताची नाडी, डोळे आणि जीभ पाहूनच आजाराचे निदान करत असत आणि क्वचितच तपासण्या करायचे. मात्र आज रुग्णालयात गेल्यानंतर बहुतांश वेळा प्रथम विविध तपासण्या लिहून दिल्या जातात आणि त्यानंतर अहवाल आल्यानंतर उपचार केले जातात. अनेक वेळा कोणती तपासणी कुठे करायची आणि औषधे कुठून घ्यायची, हे देखील पूर्वीच ठरलेले असते.

**डॉ. प्रितम भि. गेडाम**
मो.०८२३७४१७०४१

# ‘घोषणा नको, दुष्काळ जाहीर करा!’

## अकोट तालुका दुष्काळग्रस्त घोषित करण्याच्या मागणीसाठी काँग्रेसचे एकदिवसीय उपोषण

■ प्रतिनिधी | अकोट ■

पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगाम संकटात सापडला असताना शेतकऱ्यांना आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. त्यामुळे अकोट तालुका तातडीने दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा, या मागणीसाठी अकोट शहर काँग्रेस कमिटी व तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकदिवसीय उपोषण करण्यात आले.



**एसडीओंना निवेदन**

सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत झालेल्या या आंदोलनात काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

तालुक्यात अपुरा व अनियमित पाऊस झाल्याने खरीप पिकांवर त्याचा विपरीत परिणाम झाला आहे. त्यातच वाढता उत्पादन खर्च, घटलेले उत्पन्न आणि आर्थिक अडचणींमुळे शेतकऱ्यांसमोरील संकट अधिक गंभीर झाले असल्याचे आंदोलकांनी नमूद केले.

‘आता घोषणा नको, दुष्काळ जाहीर करा’ असा जोरदार नारा देत आंदोलकांनी शासनाचे लक्ष वेधले. शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी, पिकांच्या नुकसानीची भरपाई द्यावी, कर्जमाफी करावी तसेच विविध सवलती जाहीर कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने पाहून तातडीने निर्णय घ्यावा. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. उपोषणानंतर काँग्रेसच्या शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. अकोट तालुका दुष्काळग्रस्त घोषित करण्यासह शेतकऱ्यांना आर्थिक मदत, पीक नुकसानभरपाई, कर्जमाफी व आवश्यक सवलती देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली. आंदोलनात काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# पणज येथे श्री महालक्ष्मी माता यात्रा महोत्सव

## १७ सप्टेंबरला गौरी स्थापना; १८ रोजी मुख्य यात्रा व महाप्रसाद

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील पणज येथील श्री महालक्ष्मी माता मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही १७ ते १९ सप्टेंबरदरम्यान श्री महालक्ष्मी माता यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर समिती व समस्त गावकऱ्यांकडून भाविकांच्या सोयीसाठी विविध व्यवस्था करण्यात येत आहेत.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी, १७ सप्टेंबर रोजी गौरी स्थापनेचा कार्यक्रम होणार आहे. १८ सप्टेंबर रोजी मुख्य यात्रा महोत्सव तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, १९ सप्टेंबर रोजी गौरी विसर्जनाचा कार्यक्रम पार पडणार आहे. या कालावधीत मंदिर परिसरात पूजन, भजन तसेच विविध



धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

बोर्डी नदीच्या काठावर वसलेले श्री महालक्ष्मी माता मंदिर हे परिसरातील पुरातन व जागृत देवस्थान म्हणून भाविकांचे श्रद्धास्थान आहे. यात्रा महोत्सवानिमित्त पणजसह अकोट तालुका आणि परिसरातील विविध गावांमधून दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात.

भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता यंदा दर्शन व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि महाप्रसादासाठी आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.

**Change In Name**

I Have Change My Name
**SUNIL NAMDEORAO INGLE** --TO--
**SUNIL NAMDEVRAO INGLE**
My Residential Address is - Gajanan Maharaj Mandir Mukund Nagar Telegraph Colony VCT Akola -444001

**Change In Name**

I, **AYAESHA FATEEMA ALI AKBAR KHAN** (Old Name) R/o. Near Aksa Masjid, Husain Layout, Ganga Nagar, Akola, Tq. Dist. Akola, Passport No. R5370611 do hereby declare that, my said name is mistakenly and by typographical technical mistake mentioned as **AYAESHA FATEEMA ALI AKBAR KHAN** (Old Name). That, my name wrongly mentioned on Passport as **"AYAESHA FATEEMA ALI AKBAR KHAN"** therefore, I have changed my name as **"AYESHA FATEMA ALI AKBAR KHAN"** (New Name) as per Adhar Card No. 2319 4373 2893. I am the one and the same person of the above said two names and there is no any person of the said names other than me.

**जाहीर सूचना**

माझे पक्षकार यांनी दिलेल्या महिती वरून सर्व नागरिकांना तसेच वित्तीय संस्था व बँक यांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते कि, माझे पक्षकार श्री. सचिन गजानन ढोरे, रा. शिवर, ता. आणि जि. अकोला यांच्या मालकी व ताब्यातील मौजा/कसबे शिवर, येथील शेती जुना सर्व्हे/गट नं. १/१ मधील अकृषक प्लॉट नं. १५(पार्ट), एकूण क्षेत्रफळ ९७.५३ चौ.मी., ता. आणि जि. अकोला.; हे सदर मालमत्ता रजिस्टर खरेदीखताने ज्याचा र.द.क्र. ४३५०; दि. ०९/०९/२०२६ ने श्री. मनोहर शामराव मानकर अधिक ५ यांच्या कडून खरेदी घेतली असून मालकी हक्कात आहे. सदर मालमत्तेची मूळ खरेदी ज्याचा र. द.क्र. १८३७ दि. १५/०४/१९९८ हा गहाळ झाला आहे. तसेच सदर मालमत्तेवर Hinduja Housing Finance Ltd. अकोला शाखा मार्फत कर्ज मंजूर झाले असून त्याकरिता नमूद मालमत्ता गहाण देत आहेत, म्हणून सदर दस्ताची अन्यंत आवशकता आहे.

तरी जाहीर नोटीस द्वारे, आपणास कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हिस्सा, अधिकार किंवा गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केला असल्यास, तथा ताबा असल्यास, किंव्हा कुठलाही दिवाणी अथवा फौजदारी दावा प्रलंबित व निकाली असल्यास, संबंधित व्यक्तीने नीटीस वृत्तपत्रात जाहीर झाला तारखे पासून ७ दिवसांच्या आत संपर्क साधावा; अन्यथा सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारे काहीहि ऐक हक्क, अधिकार, हित-संबंध आणि आक्षेप नसल्याचे समजले जाईल.

अकोला
दिनक:- १६/०९/२०२६

**अँड. गौरव शि. देशमुख**
‘वैष्णवी कॉम्प्लेक्स’ फ्लॅट क्र. S-4
दुसऱ्या मजल्यावर, MSEB पॉवर हाऊस समोर,
गोरक्षण रोड, अकोला ता. आणि जि. अकोला.
मो. नं. ९०२८२३२२४६

**जाहीर नोटीस**

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५४८/२०२६ — प्रोसेस नं. ११६४६/२०२६
चौ.ता. २६/१०/२०२६ — दिनांक : ११/०९/२०२६

**अर्जदार :** १. लक्ष्मण वासुदेवराव देशमुख रा. गल्ली नं. १, लक्ष्मण नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. २. रामराव वासुदेवराव देशमुख रा. यशोधरा नगर, गजानन महाराज मंदिर जवळ, खामगाव, ता. खामगाव, जि. बुलढाणा. ३. सौ. निर्मल धरेराव देशमुख रा. एस. टी. डेपो मागे, बोबडे कॉलनी, खामगाव, ता. खामगाव, जि. बुलढाणा. ४. सौ. कल्पना दिलीप देशमुख रा. बालाजी नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ५. सौ. सविता दिनकरराव देशमुख रा. हिवरा खुर्द, निपाणा, ता. जि. बुलढाणा.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. वासुदेवराव रूपराव देशमुख २. प्रमिलाबाई वासुदेवराव देशमुख
**पत्ता :-** रा. व्दारा लक्ष्मण वासुदेवराव देशमुख रा. गल्ली नं. १, लक्ष्मण नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत वासुदेवराव रूपराव देशमुख यांचे दि. २४/०१/१९९४ रोजी अकोला येथे व मयत प्रमिलाबाई वासुदेवराव देशमुख यांचे दि. ३०/०३/१९८० रोजी रिधोरा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २६/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**Change In Name**

I Have Change My Name In My Son Passport No. V9747530 From
**DOLLY MAHESH KHANDELWAL** -TO-
**PRAMODINI MAHESH KHANDELWAL**
My Residential Address is - Gaurakshan Road Near Khandelwal Dnyan Mandir, Vijay Housing Society Akola Maharashtra 444001.

# शिवस्मारकाच्या कामावर देखरेख कोणाची?


## अधिकारी-कर्मचारी साइटवर नसल्याचा आरोप
## पारदर्शकतेअभावी विवेक खारोडे आक्रमक

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तेल्हारा : छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे बांधकाम सुरू झाले; मात्र कामाच्या ठिकाणी नगरपरिषदेचा जबाबदार अधिकारी अथवा कर्मचारीच नियमितपणे उपस्थित नसल्याचा आरोप पुढे आल्याने कामाच्या देखरेखीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्मारकाचे बांधकाम अंदाजपत्रकानुसार आणि निर्धारित दर्जाने होत आहे की नाही, हे पाहणार कोण? असा थेट सवाल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख विवेक खारोडे यांनी नगरपरिषद प्रशासनाला केला आहे.

शहराच्या अस्मितेशी जोडलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या कामातच जर देखरेखीचा अभाव राहणार असेल, तर कामाच्या गुणवत्तेची जबाबदारी निश्चित कोणाची, असा प्रश्न उपस्थित होत आहे. कामाच्या ठिकाणी अभियंता, संबंधित कर्मचारी आणि कंत्राटदाराची उपस्थिती असणे आवश्यक असतानाही प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी असल्याचा दावा खारोडे यांनी केला आहे.

स्मारकाच्या बांधकामासाठी किती निधी मंजूर झाला, अंदाजपत्रकात नेमकी कोणती कामे प्रस्तावित आहेत, काम पूर्ण करण्याची मुदत किती आहे आणि वापरण्यात येणाऱ्या साहित्याचा दर्जा काय आहे, याची माहिती नागरिकांना मिळणे हा त्यांचा हक्क आहे. मात्र जबाबदार अधिकारीच कामाच्या ठिकाणी उपलब्ध



नसतील, तर नागरिकांनी माहिती कोणाकडे मागायची, असा सवाल खारोडे यांनी उपस्थित केला.

बांधकाम सुरू असताना केवळ काम सुरू असल्याचे दाखविण्यापेक्षा प्रत्येक टप्प्यावर तांत्रिक देखरेख आणि गुणवत्तेची तपासणी होणे गरजेचे आहे.

**नगरपरिषद प्रशासन ‘अलर्ट’ होणार का?**

स्मारकाच्या बांधकामावर उपस्थित झालेल्या प्रश्नांनंतर नगरपरिषद प्रशासन प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी नियमित देखरेख ठेवते का, कामाची माहिती नागरिकांसाठी उपलब्ध करून देते का आणि बांधकामाच्या गुणवत्तेची तांत्रिक तपासणी केली जाते का, याबाबत आता प्रशासनाकडून स्पष्टता अपेक्षित आहे.

कामाच्या ठिकाणी जबाबदार यंत्रणा प्रत्यक्ष उपस्थित राहून बांधकामाची पाहणी करणार नसेल, तर भविष्यात कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवालही खारोडे यांनी केला. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक हे केवळ शासकीय बांधकाम नसून तेल्हारा शहराच्या भावना आणि अस्मितेशी जोडलेले ठिकाण आहे. त्यामुळे या कामात कोणत्याही प्रकारची तडजोड खपवून घेतली जाणार नाही, अशी भूमिका खारोडे यांनी स्पष्ट केली. ‘स्मारकाचे काम दर्जेदार झाले पाहिजे. कामाच्या ठिकाणी संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित असलेच पाहिजेत. नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांना नगरपरिषदेने स्पष्ट उत्तरे द्यावीत. कामात अनियमितता किंवा दर्जाबाबत प्रश्न निर्माण झाल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारला जाईल,’ असा इशारा विवेक खारोडे यांनी दिला.

# ‘प्रबोधन गणेशोत्सव करंडक २०२६’चे आयोजन

## नशाबंदी मंडळ व राष्ट्र सेवा दलाचा उपक्रम; सामाजिक कार्य करणाऱ्या मंडळांना सन्मान

■ प्रतिनिधी | अकोला ■

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी स्वातंत्र्य चळवळीत जनजागृती आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली. या ऐतिहासिक परंपरेला आधुनिक सामाजिक भानाची जोड देण्याच्या उद्देशाने नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य आणि राष्ट्र सेवा दल, अकोला जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने ‘व्यसनमुक्त भारत अभियान’ अंतर्गत ‘प्रबोधन गणेशोत्सव करंडक २०२६’चे आयोजन करण्यात आले आहे.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी केवळ देखावे, सजावट आणि मिरवणुकीपुरते मर्यादित न राहता सामाजिक, विधायक व प्रबोधनात्मक उपक्रम राबवावेत, यासाठी या उपक्रमाच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जाणार आहे. अंमली पदार्थांचे सेवन, दारू, गुटखा आदी व्यसनांचे वाढते प्रमाण ही तरुण पिढीसमोरील गंभीर समस्या असून, कायद्याबरोबरच सामाजिक आणि सांस्कृतिक प्रबोधनातून या समस्येवर प्रभावीपणे जनजागृती करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जाणार आहे.(व्यसनमुक्तीवर पथनाट्य, व्याख्याने, पोस्टर प्रदर्शन, पर्यावरणपूरक गणेशोत्सव, शाडूमातीच्या मूर्ती, निर्माल्य व्यवस्थापन, रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, अन्नदान, सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता तसेच युवकांच्या प्रबोधनासाठी उपक्रम राबविणाऱ्या गणेशोत्सव मंडळांचा या करंडकासाठी विचार केला जाणार आहे.

उत्कृष्ट सामाजिक कार्य करणाऱ्या मंडळांची निवड परीक्षक समितीमार्फत करण्यात येणार असून, निवडक मंडळांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक करंडक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. ‘गणेशोत्सव हा केवळ उत्सव नसून प्रभावी जनजागृतीचे माध्यम आहे. प्रत्येक गणेश मंडळाने आपल्या मंडपातून ‘अंमली पदार्थांना ना, जीवनाला हो’ हा संदेश दिल्यास युवकांमध्ये सकारात्मक परिवर्तन घडू शकते,’ असे नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक बबनराव कानकिरड यांनी सांगितले.

**मंडळांनी सामाजिक कार्याचा अहवाल सादर करावा**

अकोला जिल्ह्यातील गणेशोत्सव मंडळांनी गणेशोत्सव काळात राबविलेल्या सामाजिक उपक्रमांचे फोटो, व्हिडिओ आणि अहवाल नशाबंदी मंडळ, अकोला जिल्हा, अ-७०, महसूल कॉलनी, अकोला येथे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी प्रकल्प प्रमुख ॲड. बुदे, अरविंद पाठक आणि डॉ. अशोक तायडे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नव्या मुगाला तेल्हारा बाजार समितीत ७,५५१ रुपयांचा भाव

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तेल्हारा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या धान्य बाजारात शनिवारी (दि. १२) नव्या हंगामातील मुगाच्या खरेदीचा शुभारंभ झाला. हंगामातील पहिल्याच खरेदीत सोनवाडी येथील शेतकरी सिताराम तुकाराम सपकाळ यांच्या मुगाला तब्बल ७ हजार ५५१ रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला. समाधानकारक दर मिळाल्याने शेतकरी वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

सपकाळ यांनी विक्रीसाठी बाजार समितीच्या आवारात आणलेल्या नव्या मुगाची हंगामातील पहिली खरेदी करण्यात आली. यानिमित्त बाजार



समितीच्या आवारात संचालक मंडळ, व्यापारी, शेतकरी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बाजार समितीचे प्रभारी सभापती हरिदास पा. वाघ यांच्या हस्ते शेतकरी सिताराम सपकाळ यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. व्यापारी मंडळींच्या वतीनेही त्यांचा गौरव करण्यात आला.

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०७८/२०२६ — प्रोसेस नं. ९३३०/२०२६
चौ.ता. १४/१०/२०२६ — दिनांक : २२/०७/२०२६

**अर्जदार :** दुर्गा रविंद्र अग्रवाल
रा. व्दारा रविंद्र अग्रवाल, फ्लॅट नं. ६१, लाला लजपतराय हाउसिंग सोसायटी, गोकुळ कॉलनी, जवाहर नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सरजुदेवी हरिप्रसाद अग्रवाल
**पत्ता :-** रा. फ्लॅट नं. ६१, लाला लजपतराय हाउसिंग सोसायटी, गोकुळ कॉलनी, जवाहर नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सरजुदेवी हरिप्रसाद अग्रवाल यांचे दि ०६/०४/२०२६ रोजी गोकुळ कॉलनी, जवाहर नगर, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १४/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर सुचना**

दि. १५.९.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, उमादेवी कैलास अग्रवाल हे मौजे मूर्तीजापुर, ता. मूर्तीजापुर जि अकोला येथील नझूल शीट नं २१-ए, नझूल नं प्लॉट १/५, क्षेत्रफळ ३२९.४ चौ मी. अविभाजित हिश्याचे मालक असून सदर मालमत्ता त्यांना दिवंगत तुलसादेवी देवकरणजी अग्रवाल यांनी दि ७.११.२०१६ रोजी करून ठेवलेल्या अनोंदणीकृत मृत्यूपत्राअन्वये प्राप्त झालेली आहे. सदर मालमत्ता ही सुरवातीला हरिओम नाथमल भारुका व सौ शकुंतलादेवी विजयकुमार भारुका यांनी दि. ३१.३.१९९३ रोजी दस्त क्र ७५३ चे खरेदी खतानुसार विकत घेतली होती व त्यानंतर हरिओम नाथमल भारुका व सौ शकुंतलादेवी विजयकुमार भारुका यांनी तुलसादेवी देवकरणजी अग्रवाल यांचे हक्कात दि. १०.१०.२००६ दस्त क्र १८८८, एक घोषणापत्र करून दिले. त्यानुसार वरील मालमत्तेची नोंद तुलसादेवी देवकरणजी अग्रवाल यांचे नावात मालमत्तपत्रकात घेण्यात आली. तुलसादेवी देवकरणजी अग्रवाल या दि ६.१२.२०१६ रोजी मयत झाल्या. सदर मालमत्ता एच.डी.एफ.सी. बँक अकोला कडे कर्जाऊ रकमेच्या मोबदल्यात गहाण ठेवण्यात येत आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन चौदा (१४) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि.

**आपला**
**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला मो: ९८२३०९१३७७

# संस्थेला उर्जितावस्था देण्यासाठी संचालक मंडळ कटिबद्ध

## अकोट शेतकी खरेदी-विक्री संघाची १०३ वी वार्षिक आमसभा उत्साहात

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुका सहकारी शेतकी खरेदी-विक्री संघाला शंभर वर्षांहून अधिक काळाची गौरवशाली परंपरा लाभली आहे. या संस्थेला पुन्हा उर्जितावस्था प्राप्त करून देतानाच उत्पन्नाचे नवीन भक्कम स्त्रोत निर्माण करण्यासाठी संचालक मंडळ कटिबद्ध असून, त्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न सुरू आहेत, अशी ग्वाही संस्थेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते नानासाहेब हिंगणकर यांनी दिली.




अकोट शेतकी खरेदी-विक्री संघाची १०३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. यावेळी भागधारकांशी संवाद साधताना हिंगणकर बोलत होते. सभेला जि.प.चे माजी अध्यक्ष शिवाजीराव देशमुख, कुटबासचे सभापती धीरज हिंगणकर, उपसभापती विजयराव रहाणे, माजी सभापती शंकरराव चौधरी, प्रशांत पाचडे, माजी उपसभापती अतुल खोटरे, गजाननराव गावंडे, गजाननराव सोनोने, रमेश खलोकर, सहकारी जिनिंग फॅक्टरीचे उपाध्यक्ष रामदास थारकर, जिल्हा बँकेचे संचालक जावेद पटेल आदी उपस्थित होते.

बाजारपेठेतील वाढती स्पर्धा आणि बदलत्या परिस्थितीत सहकारी तत्त्वावर खते, बी-बियाणे व कीटकनाशकांचा व्यवसाय करणे आव्हानात्मक झाले आहे. त्यामुळे संस्थेच्या मालकीच्या भूखंडावर भव्य व्यापारी संकुल उभारून उत्पन्नाचा नवीन स्त्रोत निर्माण करण्याचा संचालक मंडळाचा विचार असल्याचे हिंगणकर यांनी सांगितले. संस्थेच्या आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावाही त्यांनी यावेळी मांडला. सभेच्या प्रारंभी संस्थेचे दिवंगत अध्यक्ष हिदायतउल्ला खां पटेल, माजी उपाध्यक्ष मनोहर गये, संचालक विनायक इंदोरे व मनोहर सावरकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

संस्थेचा वार्षिक अहवाल, आर्थिक पत्रके, ताळेबंद, अंदाजपत्रक तसेच नफा-तोटा पत्रक व्यवस्थापक डी. एस. हिंगणकर यांनी सभेपुढे सादर केले. यास उपस्थित भागधारकांनी एकमताने मंजुरी दिली. यावेळी डॉ. गजानन महाले, प्रशांत पाचडे, डॉ. प्रमोद चोरे, अतुल खोटरे आदी सभासदांनी विविध विधायक सूचना मांडल्या. अध्यक्ष नानासाहेब हिंगणकर यांनी या सूचनांचे स्वागत करून त्यांची सकारात्मक दखल घेण्याचे आश्वासन दिले.

सभेला संस्थेचे ज्येष्ठ संचालक सुभाष मगर, दयाराम पाटील धुमाळे, संतोष पुंडकर, हरिभाऊ मानकर, सुरेंद्र ठाकरे, माधवराव बकाल, कुलदीप भिसे, अलोक रहाणे, श्रीकृष्ण रोठे, त्र्यंबकराव मंगळे, दीपक पवार, अरुण जवंजाळ, विजेंद्र तायडे, वृषाली ओळंबे, सविता पाटकर, देविदास बुले, दीपक बुंदे, सारंगधर वालसिंगे यांच्यासह विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, सेवा सहकारी सोसायट्यांचे अध्यक्ष, भागधारक, कर्मचारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेच्या शेवटी संचालक दत्तात्रय तळोकार यांनी आभार मानले.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २७७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com





## वाघाच्या हल्ल्याने मृत्यू प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात सहा दिवसांचा रणसंग्राम

# धुर्वे कुटुंबाला न्याय; खा.अमर काळेंच्या संघर्षापुढे प्रशासन नरमले

**वर्धा/सेलू जनमाध्यम**

सेलू तालुक्यातील रायपूर जंगली येथे ९ सप्टेंबर रोजी वाघाच्या हल्ल्यात ६५ वर्षीय भगवान चंद्रभान धुर्वे यांचा मृत्यू झाला. या मृत्यूनंतर प्रशासनाच्या दिरंगाईचा आरोप करीत ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला. मृतकाच्या कुटुंबाला न्याय मिळाल्याशिवाय अंत्यसंस्कार न करण्याचा निर्धार करीत आंदोलन उभे राहिले आणि या आंदोलनाला खासदार अमर काळे यांनी ठाम साथ दिली. सहा दिवसांच्या ठिय्या आंदोलनानंतर अखेर मंगळवारी सायंकाळी प्रशासन आणि आंदोलनकर्त्यांमध्ये तोडगा निघाला. बुधवारी सकाळी अकरा वाजता सातव्या दिवशी भगवान धुर्वे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

मृतकाच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी आणि २५ लाख रुपयांची मदत द्यावी अशी मागणी खा.काळे यांनी सुरुवातीपासून लावून धरली होती. शासनाला नोकरी देणे शक्य नसेल तर किमान एक कोटी रुपयांची मदत द्यावी अशी त्यांची भूमिका होती. या मागणीवरून प्रशासन आणि आंदोलनकर्त्यांमध्ये तिढा कायम राहिला.

आंदोलनाच्या सहाव्या दिवशी आ.रोहित पवार यांनी आंदोलनस्थळी हजेरी लावली. त्यांनी आंदोलनकर्त्यांच्या प्रतिनिधींशी तसेच जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करून प्रश्न तातडीने सोडविण्याची भूमिका मांडली. त्यानंतर मंगळवारी सायंकाळी जिल्हाधिकारी यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. चर्चेनंतर मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला. तोडग्यानुसार धुर्वे कुटुंबाला एकूण ५३ लाख रुपयांची मदत. कुटुंबातील एका सदस्याला कंत्राटी नोकरी. शंभर टक्के अनुदानावर घरकुल. तसेच मृतकाच्या १७ वर्षीय नातवाच्या शिक्षणाचा खर्च करण्याच्या मागण्या मान्य करण्यात आल्या.

**राजकारणाचा आरोप, काळेंचा पलटवार**

या आंदोलनावर खासदार अमर काळे यांनी राजकारण केल्याचा आरोपही करण्यात आला. यापूर्वी वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात जिल्ह्यात अनेक नागरिकांचा मृत्यू झाला असताना आताच आंदोलन का असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. मात्र काळे यांनी हा लढा केवळ भगवान धुर्वे यांच्या कुटुंबासाठी नसल्याचे स्पष्ट केले. भविष्यात पुन्हा अशा घटना घडू नयेत. जंगलालगतच्या गावांमध्ये नागरिकांच्या सुरक्षेसाठी शासनाने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात आणि अशा दुर्घटनेनंतर पीडित कुटुंबाला मदतीचा ठोस आधार मिळावा हा आंदोलनामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.रायपूर जंगलीतील सहा दिवसांचा हा संघर्ष केवळ एका कुटुंबाच्या मदतीपुरता मर्यादित राहणार की वन्यजीव संघर्षग्रस्त गावांसाठी कायमस्वरूपी धोरणाचा मार्ग मोकळा करणार. याकडे आता जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

सहा दिवसांच्या आंदोलनात काळे यांनी आपल्या भूमिकेत कोणतीही तडजोड केली नाही. जिल्हाधिकारी किंवा पालकमंत्र्यांनी आंदोलनस्थळी येऊन ग्रामस्थांसमोर चर्चा करावी हा त्यांचा आग्रह शेवटपर्यंत कायम राहिला. सहाव्या दिवशी आमदार रोहित पवार यांच्या मध्यस्थीने आंदोलनातील काही प्रतिनिधींनी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा केली. मात्र काळे स्वतः चर्चेला गेले नाहीत. सकारात्मक निर्णयानंतर शासनाने दिलेला दहा लाखांचा धनादेश धुर्वे कुटुंबाला दिला.

गावाची एकजूट आणि काळेंचा ठाम पवित्रा यामुळे अखेर मागण्या मान्य झाल्या आणि सातव्या दिवशी अंत्यसंस्कार झाले. या संघर्षात काळे यांनी आपली भूमिका आणि स्वाभिमान शेवटपर्यंत कायम ठेवला.

### सहा दिवस झुकले नाहीत, काळेंचा ठाम पवित्रा अखेर यशस्वी

गाव एकवटले. खासदार ठाम राहिले. सातव्या दिवशी झाला अंत्यसंस्कार रायपूर जंगलीतील आंदोलनाने प्रशासनासमोर अभूतपूर्व पेच उभा केला. शवविच्छेदन झाल्यानंतरही भगवान धुर्वे यांचा मृतदेह तब्बल सहा दिवस शवगारात ठेवावा लागला. मृतकाच्या कुटुंबाच्या मागे संपूर्ण गाव भक्कमपणे उभे राहिले. गावातील एकही व्यक्ती आंदोलनातून माघार घेतली नाही. याच एकजुटीला खा.अमर काळे यांच्या ठाम संघर्षाची जोड मिळाली.

## दारूबंदीच्या जिल्ह्यात रस्त्यावरच नशेचा तमाशा

# झेंडा चौकात मद्यधुंद अवस्थेतील व्यक्ती रस्त्यावरच पडला

**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यात दारूबंदी असतानाही मद्यप्राशनाचे प्रकार सुरूच असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. सिंदी रेल्वे शहरातील झेंडा चौकात मद्यधुंद अवस्थेत दिसणारी एक व्यक्ती चक्क रस्त्यावर पडून असल्याचा प्रकार नागरिकांच्या निदर्शनास आला. काही काळ ही व्यक्ती रस्त्यावरच पडून असल्याने परिसरातून ये जा करणाऱ्या नागरिकांचे लक्ष या प्रकाराकडे वेधले गेले.



दारूच्या नशेत असल्याचे दिसणाऱ्या व्यक्तीची अवस्था पाहून नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले. दारूबंदी असलेल्या जिल्ह्यात सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारे मद्यधुंद अवस्थेतील व्यक्ती आढळत असेल तर अवैध दारूविक्री आणि मद्यप्राशनाला आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या कारवाईचा परिणाम नेमका किती आहे, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. अवैध दारूविक्री आणि मद्यप्राशनाला आळा घालण्यासाठी पोलिस तसेच संबंधित विभागाकडून कारवाई केली जाते. मात्र शहरातील मुख्य चौकातच मद्यधुंद अवस्थेतील व्यक्ती रस्त्यावर पडलेली दिसल्याने दारूबंदीच्या अंमलबजावणीबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर तसेच सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करणाऱ्यांवर प्रभावी कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. शहरात दारूबंदीचा कायदा कागदावर न राहता त्याची प्रभावी अंमलबजावणी प्रत्यक्षात दिसावी, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

# सात दिवसांच्या संघर्षानंतर भगवान धुर्वेंना अखेरचा निरोप

**सेलू/ जनमाध्यम**

तालुक्यातील रायपूर येथे वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या ६५ वर्षीय भगवान धुर्वे यांच्यावर अखेर बुधवारी दुपारी बारा वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रशासनाकडून न्याय आणि कुटुंबाला योग्य मदतीच्या मागणीसाठी गावकऱ्यांनी तब्बल सात दिवस संघर्ष केल्यानंतर धुर्वे यांना अखेरचा निरोप देण्यात आला. भगवान धुर्वे यांच्या मृत्यूने रायपूरसह परिसरात वन्यजीव संघर्षाचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला. मृतदेह अंत्यसंस्कारासाठी स्वीकारण्यास गावकऱ्यांनी नकार देत प्रशासनासमोर आपल्या मागण्या ठामपणे मांडल्या होत्या. या संघर्षात खासदार अमर काळे



यांनी गावकऱ्यांसोबत ठामपणे उभे राहत आंदोलनाला पाठिंबा दिला. बुधवारी अंत्यसंस्काराच्या वेळी खासदार अमर काळे अभ्युदय मेघे तसेच गावातील महिला आणि पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.सात दिवसांच्या प्रतीक्षेनंतर अखेर धुर्वे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार झाले.मात्र या घटनेने रायपूरच्या शेतकरी आणि ग्रामस्थांच्या मनात वाघाच्या दहशतीचा प्रश्न कायम ठेवला आहे.

## संक्षिप्त

### व्हिडिओ गेम पार्लरमध्ये तोडफोड

**हिंगणघाट**-व्हिडिओ गेम पार्लरमध्ये ४० हजार रुपये हरल्यानंतर परत आलेल्या युवकाने दुकानातील साहित्याची तोडफोड करून १ लाख ७० हजार रुपयांचे नुकसान केल्याची घटना घडली. यावेळी दुकानातील कर्मचाऱ्याच्या खिशातील ६ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतल्याचा आरोप आहे. याप्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे.शहरातील प्रवीण पलेरिया यांच्या व्हिडिओ गेम पार्लरमध्ये तौसीफ बेग मिर्झा हा ४० हजार रुपये हरला होता. काही दिवसांनी तो पुन्हा दुकानात आला आणि कर्मचाऱ्याला पैसे परत मागू लागला. त्यानंतर मशीन टेबल खुर्च्या कुलरसह अन्य साहित्याची तोडफोड केली. कर्मचाऱ्याने रोखण्याचा प्रयत्न केला असता त्याच्या खिशातील ६ हजार रुपये काढून घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे. राकेश चौरसीया यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास हवालदार किशोर गाडेवान करीत आहेत.

### रस्त्याच्या कामावरून ६० हजारांचे केबल चोरी

**वर्धा**-सावंगी परिसरात सुरू असलेल्या रस्त्याच्या कामावरून अज्ञात चोरट्याने ६० हजार रुपये किमतीचे केबल व तांब्याची वायर चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी सावंगी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.सावंगी रुग्णालयासमोरील रस्त्याचे काम अमरावती येथील एका कंपनीच्या वतीने सुरू आहे. कामाच्या ठिकाणी ठेवलेली २० हजार रुपये किमतीची सुमारे १५० मीटर तांब्याची वायर तसेच पेव्हर मशीनचे ४० हजार रुपये किमतीचे केबल असा एकूण ६० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला. कंपनीचे स्थापत्य अभियंता नवीन निखार वय ४२ यांनी सावंगी पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदविला असून पुढील तपास हवालदार अनिल वैद्य करीत आहेत.

### समता नगरातून दुचाकी लंपास

**वर्धा**-समता नगर परिसरात घरासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.समता नगर येथील चेतना भगत वय ४५ यांच्या मुलाने बाहेरून आल्यानंतर एमएच ३२ एटी ७१३३ क्रमांकाची दुचाकी घरासमोर उभी केली होती. काही वेळाने घराबाहेर आल्यानंतर दुचाकी जागेवर दिसून आली नाही. परिसरात शोध घेतला तसेच नागरिकांकडे विचारणा केली असता दुचाकीचा ठावठिकाणा लागला नाही.`

## निसर्ग संवर्धन आणि पशुपालनाची शिकवण देणारा पारंपरिक उत्सव उत्साहात

# गवळी समाजात भालदेवाचा जयघोष

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

निसर्गाशी नाते जोडणाऱ्या गवळी समाजाच्या परंपरेत आजही मातीचा आणि हिरवाईचा सुगंध दरवळताना दिसतो. श्रीकृष्ण जन्माष्टमीनंतर बारा दिवसांनी सुरू होणारा पारंपरिक भालदेव सण सध्या गवळी समाजात उत्साह आणि भक्तिभावाने साजरा होत आहे. ग्रामीण आणि जंगलकाठच्या भागात या सणानिमित्त पारंपरिक विधी पार पडत असून निसर्ग संवर्धनाचा संदेशही दिला जात आहे.

**लव्हाळ्याच्या गवताला भालदेवाचे रूप**

पावसाळ्यात रानावन हिरवाईने नटलेले असताना फुलोऱ्यात आलेल्या लव्हाळे गवताची भालदेव म्हणून पूजा केली जाते. निसर्गाने दिलेल्या या हिरव्या ठेव्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची ही परंपरा पिढ्यानपिढ्या जपली जात आहे. श्रद्धा आणि निसर्गप्रेम यांचा सुंदर संगम या उत्सवातून पाहायला मिळतो.

**चारा संवर्धनाची परंपरा**

भालदेव सणाचे आणखी एक



महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे चारा संवर्धन. सणाची सांगता होईपर्यंत जनावरांना रानात चरायला सोडण्यावर पारंपरिक बंधने पाळली जातात. पावसाळ्यात गवताची वाढ होऊन पुढील काळात पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध व्हावा, यामागे हा विचार आहे. पशुधन हाच गवळी समाजाच्या जीवनाचा आधार असल्याने या परंपरेतून निसर्ग आणि पशुधन यांच्यातील परस्परावलंबित्व अधोरेखित होते.

**भालदेवातून वृक्षसंवर्धनाचा जागर**

परंपरेसोबतच पर्यावरण संवर्धनाची जोड देत यंदा भालदेव सणानिमित्त मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्याचे आवाहन गवळी समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष देवेंद्र ढोबळे यांनी केले आहे.

समाजबांधवांनी वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करावे आणि पुढील पिढीसाठी हिरवाईचा वारसा जपावा, असा संदेश त्यांनी दिला आहे. या आवाहनाला समाजबांधवांकडून प्रतिसाद मिळत असून भालदेव सणातून निसर्ग संवर्धनाची भावना अधिक दृढ होत आहे.

# १५ दिवसांत १११ वीजचोऱ्या उघड; वर्धा, आर्वी, हिंगणघाट विभागात धडक कारवाई

**वर्धा/जनमाध्यम**

वीजचोरी करणाऱ्यांविरोधात महावितरणने वर्धा जिल्ह्यात धडक मोहीम उघडली असून, अवघ्या १५ दिवसांत तब्बल १११ वीजचोऱ्या उघडकीस आणल्या आहेत. १ ते १५ सप्टेंबरदरम्यान राबविण्यात आलेल्या या विशेष तपासणी मोहिमेमुळे अवैधरीत्या वीज वापरणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

महावितरणच्या अभियंते व तांत्रिक कर्मचाऱ्यांनी जिल्ह्यातील शहरी, ग्रामीण, औद्योगिक तसेच व्यावसायिक भागांतील वीजमीटर व जोडण्यांची कसून तपासणी केली. या कारवाईत वर्धा विभागात ३८, आर्वी विभागात ३३, तर हिंगणघाट विभागात ४० वीजचोऱ्या उघडकीस आल्या.

तपासणीदरम्यान मुख्य विद्युत वाहिनीवर थेट हुक टाकून वीज घेणे, मीटरला बायपास करणे, सीलशी छेडछाड करणे, मीटरचा वेग कमी करणे तसेच डिजिटल डिस्प्ले बायपास करण्याचे प्रकार समोर आले. घरगुती ग्राहकांसह काही व्यावसायिक आस्थापना आणि लघुउद्योगांमध्येही वीजचोरी होत असल्याचे निष्पन्न झाले. उघडकीस आलेल्या प्रकरणांमध्ये चोरीच्या विजेचे अचूक

### वर्धा जिल्ह्यात महावितरणचा दणका



मूल्यमापन करून सिहू बिले तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. दोषी ग्राहकांविरुद्ध भारतीय वीज कायदा, २००३ मधील कलम १३५ व १३८ अन्वये फौजदारी तसेच दंडात्मक कारवाई केली जात आहे. दंडाची रक्कम भरण्यास टाळाटाळ करणाऱ्यांविरोधात पोलीस ठाण्यात थेट एफआयआर दाखल केला जाणार असून, अनेक ठिकाणी वीजपुरवठाही खंडित करण्यात आला आहे.

**हिंगणघाटमध्ये गैरवापराचेही प्रकरण**

वीजचोरीच्या १११ प्रकरणांव्यतिरिक्त, मंजूर कारणाशिवाय दुसऱ्या कारणासाठी वीज वापरल्याचे हिंगणघाट विभागात एक प्रकरण आढळले आहे. या प्रकरणात भारतीय वीज कायदा, २००३ मधील कलम १२६ अन्वये कारवाई करण्यात येत आहे.

**प्रामाणिक ग्राहकांना कमी दाबाचा फटका**

वीजचोरीमुळे महावितरणचे आर्थिक नुकसान तर होतेच; मात्र त्याचा थेट परिणाम नियमित बिल भरणाऱ्या ग्राहकांवरही होतो. वीजचोरीमुळे रोहित्रांवर अतिरिक्त भार येऊन ते जळणे, तांत्रिक बिघाड होणे आणि परिसरातील ग्राहकांना कमी दाबाच्या वीजपुरवठ्याचा त्रास सहन करावा लागतो. नागरिकांनी अधिकृत वीजजोडणी घेऊनच वीज वापरावी. परिसरात वीजचोरी होत असल्याचे निदर्शनास आल्यास महावितरणला माहिती देऊन सहकार्य करावे. माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव पूर्णपणे गुप्त ठेवण्यात येईल, अशी ग्वाही महावितरण प्रशासनाने दिली आहे.

# नवीन आष्टीतील प्रमोद बोरेकर बेपत्ता

## पाच दिवसांपासून शोध सुरू; कुटुंबीयांची चिंता वाढली

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

आजाराने त्रस्त असलेला ४१ वर्षीय तरुण सकाळी फिरायला जात असल्याचे पत्नीला सांगून घराबाहेर पडला. मात्र, त्यानंतर तो घरी परतलाच नाही. नवीन आष्टी येथील प्रमोद वासुदेव बोरेकर हे पाच दिवसांपासून बेपत्ता असून, कुटुंबीयांकडून त्यांचा शोध सुरू आहे.

प्रमोद बोरेकर हे कर्करोगाने त्रस्त असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. सुतारकाम करून ते आई वडील पत्नी आणि दोन लहान मुलांच्या उदरनिर्वाहाला हातभार लावत होते. शनिवारी सकाळी नेहमीप्रमाणे फिरायला जात असल्याचे पत्नीला सांगून ते घराबाहेर पडले. मात्र, बराच वेळ उलटूनही ते घरी परतले नाहीत.

कुटुंबीयांनी परिसरासह नातेवाईक आणि परिचितांकडे चौकशी केली. संभाव्य ठिकाणी शोध घेऊनही प्रमोद यांचा ठावठिकाणा लागला नाही.अखेर त्यांच्या पत्नीने आष्टी पोलिस



ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली.पोलिसांकडूनही त्यांचा शोध घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

दरम्यान, मुलगा सुखरूप परत यावा यासाठी प्रमोद यांच्या आईने गजानन महाराज मंदिरात जाऊन साकडे घातले. पाच दिवस उलटूनही मुलाचा शोध न लागल्याने बोरेकर कुटुंबीयांची चिंता वाढली आहे.प्रमोद बोरेकर यांच्याबाबत कोणाला काही माहिती मिळाल्यास तातडीने आष्टी पोलिस किंवा त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय लोक अदालतीत १६६९ प्रकरणाचा आपसी तडजोडीने निपटारा

## कौटूंबिक हिंसाचाराच्या ५ प्रकरणांमधील तडजोडीच्या रक्कमेचे मुल्य ३ कोटी ५९ लाख

**वर्धा/जनमाध्यम**

राष्ट्रीय विधी सेवा समिती व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणच्या निर्देशानुसार तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हेमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा न्यायिक जिल्ह्यामध्ये १२ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या अदालतीमध्ये १ हजार ६६९ प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढण्यात आली असून तडजोड झालेल्या प्रकरणांमधील तडजोडीच्या रक्कमेचे मुल्य ३ कोटी ५९ लाख ९५ हजार ३०५ इतके आहे.

राष्ट्रीय लोक अदालतमध्ये दोन्ही पक्षकारांना आपापली बाजु मांडण्याची संधी मिळते तसेच दोन्ही पक्षकारांच्या आपसी सहमतीने प्रकरणांमध्ये तडजोड होत असल्याने निकालाचे समाधान दोन्ही पक्षकारांना असते. तसेच यामुळे पक्षकारांचा वेळ व पैशाची बचत होते. मनासारखा समझोता झाल्याने मानसिक समाधान लोक अदालतमुळे पक्षकारांना मिळते, असे विचार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हेमंत गायकवाड यांनी विशेष



लोक अदालत प्रसंगी व्यक्त केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव संजीव सरदार यांनी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यामागील भूमिका याप्रसंगी व्यक्त केली. विशेष लोक अदालतीमध्ये निकाली निघणाऱ्या प्रकरणांमुळे पक्षकारांना समाधान लाभते. कारण दोन्ही पक्षकारांच्या आपसी सहमतीने प्रकरणामध्ये समझोता होत असतो.त्यामुळे 'वादापेक्षा समझोता बरा' या विचारानुसार पक्षकारांनी आपसातील वाद सामोपचाराने लोक अदालतीमध्ये मिटवावे, असे आवाहन त्यांनी केले.

या राष्ट्रीय लोकअदातीत न्यायालयामध्ये प्रलंबित प्रकरणांपैकी १ हजार ३७३ इतकी प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढण्यात आली. सदरहू तडजोड झालेल्या प्रकरणांमधील तडजोडीच्या रक्कमेचे मुल्य १ कोटी ६१ लाख १७ हजार ५५६ इतके होते. तसेच वाद दाखल पुर्व प्रकरणापैकी २९६ इतकी प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढण्यात आली. वाद दाखल पुर्व प्रकरणांमधील तडजोडीचे मुल्य १ कोटी ९८ लाख ७७ हजार ७४९ इतके आहे. या लोकअदालतीची विशेष बाब म्हणजे जिल्ह्यातील न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या कौटूंबिक हिंसाचाराच्या ५ प्रकरणामध्ये पती पत्नी मध्ये असलेले वाद या लोक अदालतीद्वारे निपटारा करण्यात यश प्राप्त झाले व त्यांनी हसत खेळत आपले संसार करण्याचे ठरविले. असल्याचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्यावतीने कळविण्यात आले आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २९१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
## वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.१८३९/२०२६**
**Smt. Kusum wd/o. Akaram Ambhore + 2 Versus Rajendra Akaram Ambhore + 2**
**पुढील ता.११.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**Applicants**
1. **Smt. Kusum wd/o. Akaram Ambhore**, Aged about 62 years. Occu.:- Household,
2. **Smt. Nalini d/o. Akaram Ambhore,** Aged about 42 years. Occu.: Private Service, Both R/o. Takarkheda Sambhu, Tq. Bhatkuli, Dist. Amravati
3. **Sau. Shalini Kailash Nagrale (K. Shalini)**, Aged about 39 years. Occu.: Pvt. Service, R/o. 326, Vinayagar, Jyoti Nagar, Kovil Street, Kuminipeth Arkonam, Dist.Vellur, (Tamilnadu) Pin 631 003

--- Versus----

**Non-Applicants**
1. **Rajendra Akaram Ambhore,** Aged about 56 yrs, Occ.-Agril.
2. **Sau. Kalpana Tulshiram Walpe (Patil)**, Aged about 63 yrs, Occ.-Household Both R/o. Adiwasi Colony, Near Maltekdi, Amravati, Tq. & Dist. Amravati.
3. **Satish Akaram Ambhore (died on 26.11.2025) Through Lrs.-Smt. Usha Satish Ambhore,** Aged about 51 yrs, Occ.-Household, R/o. Galli No. 2, Adarsh Nehru Nagar, Near Maltekadi, P.O. Rukhmini Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Akaram Pandurrang Ambhore** हे दिनांक ०८.०५.१९८८ रोजी मयत झाले. **Smt. Kusum wd/o.Akaram Ambhore+2 Versus Rajendra Akaram Ambhore+2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Smt. Kusum wd/o.Akaram Ambhore + 2 Versus Rajendra Akaram Ambhore+2** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०९.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
## वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.१८९६/२०२६**
**शिला + २- वि. निरंक**
**पुढील ता.०९.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
1. **Shila Subhash Khandare,** Aged 40 year, Occu.: Household work R/o. Quarter No. 86, Near Vidyut Bhavan, Military Camp, Shivaji Nagar, Amravati
2. **Chetan Subhash Khandare,** Aged 23 years. Occu.: Student R/o. Quarter No.86, Near Vidyut Bhavan, Military Camp, Shivaji Nagar, Amravati
3. **Roshani Yogeshrao Natkar,** Aged 24 year, Occu.: Student R/o. Kailash Nagar, Kumbhari, Tq. & Dist. Akola

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- Nil**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Subhash Suryabhan Khandare** हया दिनांक **१०.०६.२०२२** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार Shila Subhash Khandare + 2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Shila Subhash Khandare + 2** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१५.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## जाहिर नोटिस
### अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश-०३, यांचे न्यायालय
### किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २०४/२०२६ ने.ता. १३/१०/२०२६

**Applicant :-** 1) Madhuri Chandrakant Khobragade And Others Age 45 years, Occu. Household work, Natural guardian Mothers of Minors 1 (1) Ku Pranjal Chandrakant Khobragade Aged 17 years, Occu.- Education, 1 (2) Aged 12 years, Occu. -Education, All R/o. Ganesh Nagar, Badnera, Amravati

-V/s

Non-applicant :- Nill

APLICATION UNDER SECTION 8 (2) OF HINDHU MINORITY AND GUARDIANSHIP ACT FOR GRANT OF PERMISSION TO SELL THE PROPERTY STANDING IN THE NAME OF MINORS.

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी अज्ञान पाल्याच्या नावे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता विकण्याची परवानगी मिळण्याकरीता वि. जिल्हा व सत्र न्यायाधिश ०३, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

**DESCRIPTION OF PROPERTY-** All those piece of parcel of layout converted Plot No. 6, having its size 10 mtr X 15 mtr, admeasuring 150 Sq. mtr. (1614 Sq. fit.) out of Field Survey No. 195/2, admeasuring 1.13 HR which is converted into non-agricultural purpose by Id. Collector, Amravati vide Revenud Case No. NAP-34/ Badnera 46/2001-2002 decided on 01/02/2003, situated at Mouza- Badnera, Pragane - Badnera, Tq. And Dist. Amravati, thereon constructed one reseidential house along with Electric and Water Connection of which constructed area is of 65.65 Sq. mtr., the said property is situated in A.M.C.Ward No. 76 and having property No. 1969/1, Within the limits of Amravati Municipal Corporation and within the jurisdiction of Joint Sub-Registrar, Amravati, the said property is bounded by

**Four Boundaries :-** Towards East: Plot No. 7 Towards West House of Shri Chauhan Towards North Plot of others Towards South Road of 7.5 ft. wide road

त्या अर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाची असल्यास अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी यांना जाहिर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, त्यांनी दिनांक १३-१०-२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वि. जिल्हा व सत्र न्यायाधिश ०३, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलांमार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.आज दिनांक १६.०९.२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दिसाठी दिला.

अमरावती **दिनांक** : १६.०९.२०२६

शिक्का

आदेशानुसार
**सहायक अधिक्षक न्यायीक विभाग**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

## दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
## वि. श्री. आर. आर. खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांक १८३६/२०२६ **आशा ३ वि निरंक** पुढील तारीख ०१.१०.२०२६

## जाहिरनामा / सायटेशन

**अर्जदार 1-** Asha Wamanrao Pachpor Age 73 Years, Occu: Nil
2- Manjusha Nandkishor Vikhar Age About 55 Years, Occu: Household R/o Near Water Tank, Arjun Nagar Sadashiv Nagar, Amravati
3-Nilesh Waman Pachpor Age 50 Years, Occu: Broker
4-Sachin Wamanrao Pachpor Age-47 Years, Occu: Self employed Applicant No. 1, 3 & 4 R/o Santosh Bhavan Hotel Gali, Gadge Nagar, Amravati

**विरुध्द-गैरअर्जदार- Nil**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Wamanrao Ramchandra Depe&oej Asha Wamanrao Pachpor** हे दि. १०.०६.२०१२ रोजी अमरावती येथे मयत झाले **Pachpor + 3** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सवर्छु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या **Asha Wamanrao Pachpor+ 3** वरीलप्रमाणे सदर्छु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ११.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ९४
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन्स क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०९६३००,९४२२९६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# गोवंशाच्या मांसाची विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या इसमावर कारवाई

**मोर्शी/प्रतिनिधीः-** घरात गोवंशाची कत्तल करून मांस विक्रीच्या उद्देशाने बाळगल्याच्या संशयावरून मोर्शी पोलिसांनी एका इसमाविरुद्ध कारवाई केली. इकराम अहमद शेख गुलाम दस्तगिर (वय ३४, रा. पेठपुरा, ता. मोर्शी) असे कारवाई करण्यात आलेल्या इसमाचे नाव आहे. या कारवाईत सुमारे १९ हजार १४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार मोर्शी पोलिसांकडून अवैध धंद्याविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. दरम्यान, पोउपनि. तुषार चव्हाण हे पथकासह पेट्रोलिंग करीत असताना पेठपुरा येथे एका घरात गोवंशाची कत्तल करून मांस विक्रीसाठी बाळगल्याची माहिती मिळाली. त्यावरून पोलिसांनी संबंधित घराची झडती घेतली असता मांसाचे तुकडे तसेच ते कापण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य आढळून आले. पोलिसांनी पशुधन विकास अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावून मांसाचा नमुना रासायनिक तपासणीसाठी राखून ठेवला. प्राथमिक तपासणीत सदर मांस गोवंशाचे असल्याचा तोंडी अभिप्राय देण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. उर्वरित मांस दुर्गंधीयुक्त व आरोग्यास घातक असल्याने नगर परिषद मोर्शीच्या सहकार्याने पंचांसमक्ष जमिनीत पुरून विल्हेवाट लावण्यात आली. याप्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३२५ तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमातील संबंधित कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.

### फ्रेन्डस वेलफेअर सोसायटी अमरावती व्दारा संचालित
(अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त)
## फ्रेन्डस उर्दू प्रायमरी स्कूल हबीबनगर अमरावती.
### १००% अनुदानित शाळेत सेवा निवृत्त रिक्त पदावर
नियुक्ती करिता जाहीरात

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | वर्ग ५ ते ७ करीता शिक्षण सेवक | पद एक | माध्यम उर्दू | एच.एस.सी./बी.ए./ डि.एड. तथा टि.ई.टी.उतीर्ण. | शिक्षण सेवक मानधन. |

शैक्षणिक अनुभावाला प्राधान्य देण्यात येईल व संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक.

वरिल पात्रता धारक उमेदवार मुलाखाती साठी दिनांक २७ सेप्टेबर २०२६ सकाळी ११.०० वाजता सर्व कागदपत्रासह फ्रेन्डस उर्दू प्रायमरी स्कूल हबीबनगर अमरावती येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे.

**(हाजी मोहम्मद अय्युब )**
**अध्यक्ष फ्रेन्डस वेलफअर सोसायटी अमरावती**

**( हाजी मोहम्मद याकुब मामु)**
सचिव फ्रेन्डस वेलफअर सोसायटी अमरावती

**( अनीसोददीन सलाउददीन)**
मुख्याध्यापक तथा सचिव शाळा समिती फ्रेन्डस उर्दू प्रायमरी स्कूल अम.

## जाहीर नोटीस
### दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५ नियम २० अंतर्गत
### मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

**सौ.बेबी सुरेश धावडे**
**-वि-**
**सुभाष शंकर काळमेघ व ईतर**

**नि.दि.दा.क्र.९५/२०२५** **नेमलेली तारीख- २०/१०/२०२६**

**प्रतिवादी नामे -**

| | |
|---|---|
| १.(i) निर्मला सुभाष काळमेघ, | रा.मोरगाव, लोणी टाकळी, ता.नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती |
| १.(ii) प्रविण सुभाष काळमेघ, | रा.मोरगाव, लोणी टाकळी, ता.नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती |
| १.(iii) जगदीश सुभाष काळमेघ, | रा.मोरगाव, लोणी टाकळी, ता.नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती |
| १.(iv) विलास सुभाष काळमेघ, | मोरगाव, लोणी टाकळी, ता.नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती |
| ३.सौ.चंद्रकला रमेशराव ठाकरे, | रा.राहटी, पो.हिंगणवाडी, ता.कारंजा लाड, जि.वाशिम |
| ४.(i) राजकुमार नाना काळमेघ | रा.प्लॉट नं. ५३, धनराज नगर, गोपाल नगर, अमरावती, ता.जि.अमरावती |
| ४.(ii) विजय नाना काळमेघ | रा.मोरगाव, लोणी टाकळी, ता.नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती |

न्यायालयाच्या समाधानासाठी हे सिध्द झाले आहे की, वर उल्लेख केलेल्या प्रतिवादी नामे यांना नियमित नोटीस पाठविली असता त्या तामील होत नाही म्हणुन आदेश ५ नियम २० सीपीसी अंतर्गत ही घोषणा त्याच्या विरुध्द जारी करण्यात येत आहे आणि त्यांना २२/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वैयक्तिकरित्या किंवा त्यांच्या वकिलामार्फत दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती येथे हजर रहावे.

लक्षात ठेवा की, जर तो/ती आधी उल्लेख केलेल्या दिवशी हजर राहिली नाहीत तर, वरील प्रकरणाची सुनावणी त्यांच्या अनुपस्थित कायद्यानुसार केली जाईल आणि निर्णय त्यांच्या गैरहजेरीमध्ये दिला जाईल.

संबंधीताची स्वाक्षरी आणि शिक्क्यानिशी शेरा नोंदवावा.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

## दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
## वि. श्री. आर. आर. खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज : १८९८/२०२६ मिना ३ वि निरंक पुढील तारीख १२.१०.२०२६

## जाहिरनामा / सायटेशन

अर्जदार- **1-Meena Sahebrao Barde Age 57 Years, Occu: Household**
**2-Akash Sahebrao Barde Age 30 Years, Occu: Working**
**3- Nikita Sahebrao Barde Age 35 Years, Occu: Household All Applicant No. 1 to 4 R/o Moti Nagar, Old Town Badnera Amravati**

**विरुध्द- गैरअर्जदार- NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत्त **Sahebrao Vishwanath Barde** हे दि. १५.१०.२०२४ रोजी बडनेरा, ता.जि. अमरावती येथे मयत झाले अर्जदार शाह **Sahebrao Barde + 2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे

त्यापेक्षा शाहा **Sahebrao Barde+ 2** वरीलप्रमाणे सदहू मयताचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १६.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर अमरावती**

## नगर परिषद कार्यालय दर्यापूर जि अमरावती

ई-मेल- **medaryapur@gmail.com** दूरध्वनीः ०७२२४-२३४२०८
न.प.दर्यापूर / आरोग्य विभाग/जा.क्र / २४००/२०२६ दि १५/०९/२०२६

## ई-निविदा सूचना (दुसरी वेळ )

कामाचे नाव : १५ व्या वित्त आयोगाच्या निधी अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन वाहतूक व प्रक्रिया करणेबाबत.
**कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु ४,७२,९९,४९४ /-**

| अ. क्र. | विवरण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्धा करणे व निविदा फॉर्म उपलब्ध होणे | १६/०९/२०२६ | सकाळी १०.०० |
| २ | निविदा भरण्याची अंतिम तारीख | २४/०९/२०२६ | सायंकाळी ६.०० |
| ३ | निविदा उघडण्याची अंदाजित तारीख | २५/०९/२०२६ | दुपारी १२.०० |

या निविदेच्या विस्तृत अटी व शर्ती कार्यालयाच्या नोटीस बोर्ड वर व https://mahatenders.gov.in/ साईटवर पहावयास मिळेल.

**(डॉ. विकास खंडारे)**
**मुख्याधिकारी नगरपरिषद दर्यापूर**

### महाराष्ट्र शासन
### विशेष प्रकल्प विभाग, अमरावती
### ई-निविदा सूचना क्र. १० सन २०२६-२०२७ (जा.क्र.३७६८ / निलि/दि. १५.०९.२०२६)
### ई-निविदा सूचना (ई निविदा प्रणालीव्दारे)

कार्यकारी अभियंता, वि.प्र.विभाग, डॉ पंजाबराव देशमुख प्रबोधिनी जवळ, विद्यापीठ रोड, अमरावती, पिन-४४४६०२ (दुरध्वनी क्र.०७२१-२६६८००३) व्दारे खालील कामांचे ब-१ नमुन्यातील ऑनलाईन निविदा महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या वतीने https://mahatenders.gov.in ई-निविदा प्रणालीव्दारे पात्र निविदाकारांकडून मागविण्यात येत आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित किंमत (रु.) |
|---|---|---|
| १ | रो.ह.यो. (सा.बां.) उपविभाग तिवसा अंतर्गत तिवसा येथे शासकीय जुनी व नवीन विश्रामगृह इमारत, कार्यालय व विश्रामगृह परिसर, उप वि भाग कार्यालयाच्या साफ सफाई बाह्यस्त्रोत (OUTSOURCING) चे काम करणे (१२ महिने). | १५,६३,५४८/-(रु. पंधरा लक्ष त्रेसष्ट हजार पाचशे अड्ठेचाळीस फक्त) |
| २ | रो.ह.यो. (सा.बां.) उपविभाग बडनेरा कार्यालय व परिसराची व विश्रामगृहाची साफसफाई करणे (१२ महिने). | १२,३७,३८७/-(रु. बारा लक्ष सदोतिस हजार तिनशे सत्यांशी फक्त) |
| ३ | रो.ह.यो. (सा.बां.) उपविभाग तिवसा अंतर्गत मोझरी येथे शासकीय जुनी व नवीन विश्रामगृह इमारत, कार्यालय व विश्रामगृह परिसर, उप वि भाग कार्यालयाच्या साफ सफाई बाह्यस्त्रोत (ध्ळ्ऊएध्ळ्ीण्ध्ड्ढ) चे काम करणे (१२ महिने). | १२,१९,१७४/-(रु. बारा लक्ष एकोणविस हजार एकशे चौ-याहत्तर फक्त) |
| ४ | विशेष प्रकल्प विभाग, अमरावती कार्यालय व परिसराची साफसफाई करणे (१२ महिने). | ११,९८,४६६/- (रु. अकरा लक्ष अठ्याण्णऊ हजार चारशे सहासष्ट फक्त) |
| ५ | विश्रामगृह नांदगाव खं. इमारत व परिसराची साफसफाई करणे (१२ महिने). | ११,४१,९८८/-(रु. अकरा लक्ष एक्केचाळीस हजार नऊशे अठ्ठ्यांशी फक्त) |

| | | |
|---|---|---|
| निविदा डाऊनलोड व भरण्याचा कालावधी | :- | दि. १७.०९.२०२६ ते २४.०९.२०२६ @ १८.०० वाजेपर्यन्त |
| तांत्रिक निविदा उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | :- | कार्यकारी अभियंता, वि.प्र. विभाग, अमरावती दिनांक २८.०९.०२६ रोजी १०.३०वाजता |

**Note: Physical Submission:**

1. **The Bidder shall submit the Hard Copy in 'Sealed Envelope' of Technical & Financial Bids as specified in NIT after the online submission of Bid ('Bid Lock') within 72 hrs. i.e on Dt.25.09.2026 To 27.09.2026 during office hours.**
2. Please note the further changes regarding this work will not be published through corrigendum by press notice. The changes will be available only on electronic tendering system of Government of Maharashtra which is available on the Portal https://mahatenders.gov.in & www.mahapwd.com
3. All the relevant details, Specification of work, Tender & Conditions etc. are available on portal https://mahatenders.gov.in & www.mahapwd.com

4. Tender Document Fee and EMD will be paid via online (RTGS/NEFT) mode only. It should be ensured that the Bid Security is paid online through the bidders account only.

**५. कोणतेही कारण न दर्शविता एक अथवा सर्वच निविदा स्विकारण्याचा/नाकारण्याचा अथवा रदद करण्याचा अधिकार निमस्वाक्षरीकारानी राखून ठेवला आहे.**

**(कृणाल पिंजरकर)**
**कार्यकारी अभियंता**
**विशेष प्रकल्प विभाग, अमरावती.**

वि.मा.का./अम/जाहि./५०६/२०२६-२०२७

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
## वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.१९३२/२०२६**
**जोहरा बी + तिन वि.निरंक**
**पुढील ता.१४.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
1. **Zohra Bi w/o. Abdul Razique,** Aged 54 year, Occu.: Household
2. **Mohammad Sajeed s/o. Abdul Razique,** Aged 39 years. Occu.: Labour
3. **Mohammad Salik s/o. Abdul Razique ,** Aged 37 year, Occu.: Labour All R/o. Arora Layout, Aman Colony, Old Town Badnera Tq & Dist. Amravati
4. **Nurusubha w/o. Aftab Ahmad Sheikh,** Age 36 years. Occu.: Household R/o. Police Constable Quarter, Building No. 10, Co. 449, Police Line, Takli, Nagpur

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- Nil**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Abdul Razique s/o. Sheikh Ahmad** हया दिनांक **१०.०६.२०२२** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार Zohra Bi w/o Abdul Abdul Razique + 3** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Zohra Bi w/o Abdul Abdul Razique + 3** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१५.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती वि. श्री. आर. आर. सामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्जः-१८५०/२०२६ **मंगला दोन वि निरंक** पुढील तारीख ०५.१०.२०२६

## जाहिरनामा / सायटेशन

**अर्जदार 1- Mangala Anant Deo** Aged about 56 Years, Occu: Household R/o White House, Last Line New Colony Near Om Aapp, Dastur Nagar, Rukhmini Nagar, Tq. Distt. Amravati
**2. Aarti Anant Deo** Aged about 31 Years, Occu: Service
**3-Abhishek Anant Deo** Aged about 23 Years, Occu: Student Both R/o Vyanktesh Apartment New Colony, Dastur Nagar, Amravati

**गैरअर्जदार- Nil**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Anant Prabhakar Deo** हे दि ०८.१२.२०२३ रोजी अमरावती येथे मयत झाले अर्जदार **Mangala Anant Deo + 2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Mangala Anant Deo + 2** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काब?द्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
आज दि.११.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय**
**वरीष्ठ स्तर, अमरावती**

## दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती वि. श्री. एस.एस. भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांकः १९०९/२०२६ पुढील तारीख २२.१०.२०२६

**Vidya Damodhar Bhuskade+ 5 Versus NIL.**

## जाहिरनामा / सायटेशन

**Applicant-1) Vidya Damodhar Bhuskade,** Age 61 yrs, Oce- Household,
**2) Jitesh Damodhar Bhuskade,** Age 35 yrs, Occ-Pvt. Job Both R/o Yogiraj Tower, New Krushnarpan Colony, Amravati, Tq. And Dist. Amravati.
**3) Bhavana Ashutosh Deshmukh,** Age 42 yrs, Occ-Household R/o Navin Ashti, P.O. Ashti, Dist. Wardha.
**4) Anuradha Ashish Mandaogane** Age 41 yrs. Occ- Household R/o Near Hanuman Mandir Chowk, Arjuni Morgaon, Tq. Arjuni Morgaon, Dist. Gondiya.

**==Versus==**
**Non-Applicant NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Damodar Dyaneshwar Bhuskade** हे दि. २०. ०३.२०२६ रोजी पुणे येथे मयत झाले. **Vidya Damodhar Bhuskade+ 5 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सवहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा **Vidya Damodhar Bhuskade+ 5 Versus NIL** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १५.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशनुसार**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
## वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.१७५९/२०२६**
**इंदिराबाई + ५ विरुध्द निरंक**
**पुढील ता.२४.०९.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
1. **Smt. Indirabai Krushna Marve,** Age 70 years. Occu.: Household
2. **Tikamchand Krushna Marve,** Age 48 years. Occu.: Labour
3. **Vijay Krushna Marve,** Age 46 years. Occu.: Agriculturist
4. **Mahendra Krushna Marve,** Age 37 years. Occu.: Agriculturist
5. **Minakshi Krushna Marve,** Age 37 years. Occu.: Household
6. **Rakhi Anil Mahato,** Age 35 years. Occu.: Household All R/o. Tilak Colony, Juni Basti, Badnera, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- 1. **Sima Raju Baman,** Age 45 years. Occu.: Household R/o. Tilak Colony, Juni Basti, Badnera, Tq. & Dist. Amravati

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Krushna Chotelal Marve** हया दिनांक **१०.०६.२०२२** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार Smt. Indirabai Krushna Marve + 6--Vs-- Sima Raju Baman** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Smt. Indirabai Krushna Marve + 6--Vs-- Sima Raju Baman** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०३.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती वि. श्री. एस.एस. भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्रमांक १८९१/२०२६ Prabha Prabhakar Dhomne + 5 Versus NIL पुढील तारीख : २६.१०.२०२६**

**जाहिरनामा / सायटेशन**

Applicants 1) Prabha Prabhakar Dhomne, Aged 60 Yrs, Occ- Housewife, R/o Near Post office, Tahsl Ward, Hinganghat, Wardha
2) Vandana Vijayrao Kale, Age 51 Yrs, Occ - Housewife, R/o Near Gajanan Mandir, Mahavir Nagar, Amravati Tq & Dist. Amravati
3) Sanjay narayanrao Gurav(died) Through LR's
3-a) Kalpana Sanjay Gurav Aged 47 Yrs, Occ - Housewife
3-b) Gaurav Sanjayrao Gurav Aged 28 Yrs, Occ- Business,
3-c) Ashwini Sanjayrao Gurav Aged 26 Yrs, Occ- Education Applicant No. 3-a to 3-c R/o Near Police Station, Frejarpura, Rukhmini Nagar, Amravati, Tq & Dist. Amravati.

==Versus==
Non-Applicant NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **deceased Pramila Narayan Gurav** हे दि. २८.०८.२०२३ रोजी अमरावती येथे मयत झाले आहे. **Prabha Prabhakar Dhomne + 5 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्तु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा **Prabha Prabhakar Dhomne +5 Versus NIL** वरीलप्रमाणे सदहु मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जरसदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दासविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत माचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि १५.०९ २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशनुसार**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती**

## जाहीर नोटीस
### दिवाणी न्यायालय व. स्तर, दर्यापूर जि. अमरावती येथील
### एस. डी. कमलाकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क. ३५८/२०२६ ने.ता. ३०/०९/२०२६

**अर्जदारः- १.संगीता संजय चव्हाण (चौव्हाण)**, वय ५४ वर्ष, धंदा -शेती
**२. रूमीत संजय चव्हाण**, वय २८ वर्ष, धंदा मजुरी अ.क. १ व २ रा. राठीपूरा (पाटीलपूरा) बनोसा, ता. दर्यापूर, जि. अमरावती
**३.शेजल संजय चव्हाण उर्फ शेजल मंगेश चंदन,** वय ३० वर्ष, धंदा घरकाम रा. धोबी पूरा अकोट, ता. अकोट, जि. अकोला
**४. श्वेता संजय चव्हाण उर्फ श्वेता अक्षय माथुरकर,** वय रा. साउर, ह.मु. पाटीलपूरा बनोसा, ता. दर्यापूर, जि. अमरावती २६ वर्ष, धंदा घरकाम

**विरूध्द- गैरअर्जदारः- निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **संजय सुखदेवराव चव्हाण (चौव्हाण)** हे दिनांक ०४/०५/२०२१ रोजी मरण पावले आहेत. अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत** न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत्त आपला आक्षेप सादर करावा अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल

**मालमत्तेचे वर्णन :- मयत संजय सुखदेवराव चव्हाण (चौव्हाण)** यांचे नावे मौजे दर्यापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथे शेत सर्व्हे नं. १२१/२/क/२२ हा खुला प्लॉट क्षेत्र १५७.५० मिटर, १६९७.०० चौ फुट हा प्लॉट आहे. सदरचा शेत सर्व्हे नं. १२१/२ हा मौजा दर्यापूर मधील असला तरी तो सर्व भाग न.प. दर्यापूरचे हद्दी बाहेरील ग्रामपंचायत गायवाडी कक्षेतील होता व मयत **संजय सुखदेवराव चव्हाण (चौव्हाण)** यांचे मालकीच्या उपोक्त प्लॉट क. १२१/२/क/२२ चा ग्रा. प. मालमत्ता क. ९५३ होता. सदरची मिळकत ही न.प. दर्यापूरचे हद्दवाढ तथा सिमावाढ झाल्याने न.प. क्षेत्रात आला असून त्यांचा मालमत्ता क. ९५३ हाच आहे.

आज दि. ०९/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

शिक्का

**आदेशानुसार**
**सहा. अधिक्षक (प्रशासन) दिवाणी न्यायालय व स्तर दर्यापूर**

## खल्लार येथे गणपती दर्शन



नवयुवक गणेशोत्सव मंडळ, नालवाडा वर्ष ६ वे



शिवशक्ती गणेशोत्सव मंडळ, नालवाडा वर्ष १४ वे



मोरया गणेशोत्सव मंडळ, वर्ष ३८ वे

# अधिकाऱ्यांना आता पळवाट नाही!

## दुपारी ३ ते ५ जनता दरबारासाठी वेळ राखीव ठेवण्याचे सरकारचे आदेश

### अंतर्गत बैठकांवर बंदी!

**अमरावती/सुधीर केने**

सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वाचा आणि रोखठोक निर्णय घेतला आहे. यापुढे प्रत्येक महसूल अधिकाऱ्याला शासकीय कामकाजाच्या दिवशी दुपारी ३ ते ५ ही वेळ केवळ आणि केवळ नागरिकांच्या भेटीसाठी आणि त्यांच्या तक्रारी ऐकण्यासाठी राखीव ठेवावी लागणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने ९ सप्टेंबर रोजी या संदर्भातील अधिकृत शासन परिपत्रक जारी केले आहे.

अनेकदा सर्वसामान्य नागरिक आपली गारहाणी आणि तक्रारी घेऊन स्थानिक पातळीवरील शासकीय कार्यालयांमध्ये जातात. मात्र, त्या ठिकाणी संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी जागेवर उपस्थित नसतात. स्थानिक पातळीवर तक्रारींची दखल घेतली जात नसल्याने व नागरिकांचे समाधान न झाल्याने जनतेला थेट मुंबईतील मंत्रालयात चकरा माराव्या लागतात, अशी स्पष्ट कबुली आणि खंत सरकारने या परिपत्रकात व्यक्त केली आहे. यामुळे शासनाची प्रतिमा डागाळत असल्याचे लक्षात आल्यानंतर सरकारने हे कडक पाऊल उचलले आहे.

### सूचना फलक लावणे बंधनकारक

या राखीव वेळेची माहिती देणारा फलक कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर आणि अधिकाऱ्यांच्या दालनाबाहेर दर्शनी भागात ठळकपणे लावणे बंधनकारक करण्यात आले आहे.स्थानिक पातळीवरील अधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणामुळे जनतेला होणारा मनस्ताप थांबवण्यासाठी शासनाने हा निर्णय घेतला असून, आता स्थानिक पातळीवरच नागरिकांच्या प्रश्नांचा निकाल लावावा लागणार आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर सरकार काय कारवाई करणार, याकडे आता जनतेचे लक्ष लागले आहे.

जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि नायब तहसीलदार या सर्व महसूल अधिकाऱ्यांना दररोज नागरिकांसाठी उपलब्ध राहावे लागेल. नागरिकांसाठी राखीव ठेवलेल्या दुपारी ३ ते ५ या वेळेत अधिकाऱ्यांना कोणत्याही अंतर्गत बैठका किंवा व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (VC) चे आयोजन करता येणार नाही, जेणेकरून नागरिकांना पूर्ण वेळ देता येईल. कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची (अभ्यागतांची) रीतसर नोंद ठेवण्यासाठी एक मध्यवर्ती नोंदवही ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# ई-पिक पाहणीत लोकेशनचा घोळ

## शेतकरी-कृषीमित्रांची गैरसोय!

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

शेतकऱ्यांच्या पिकांची नोंद डिजिटल पद्धतीने करण्यासाठी सुरू असलेल्या ई-पिक पाहणी प्रक्रियेत अंजनगाव बारी परिसरात तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याचे चित्र आहे. प्रत्यक्ष शेतात जाऊन ई-पिक पाहणी करताना संबंधित शेताचे लोकेशन अचूकपणे दाखविण्याऐवजी दुसऱ्याच ठिकाणी लोकेशन दाखविले जात असल्याने शेतकरी तसेच कृषीमित्रांची मोठी गैरसोय होत आहे. ई-पिक पाहणी करताना शेताच्या प्रत्यक्ष ठिकाणी लोकेशन मिळणे आवश्यक असताना मोबाईलमध्ये वेगळ्याच ठिकाणचे लोकेशन दिसत असल्याने पाहणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात अडथळे येत आहेत. परिणामी एकाच शेतकऱ्याच्या पिकाची नोंद करण्यासाठी वारंवार प्रयत्न करावे लागत असून, वेळ आणि श्रम दोन्ही वाया जात आहेत. पेरणीविषयक आकडेवारीही प्रसिद्ध करण्यात येत असल्याने डिजिटल पीक नोंदींच्या अचूकतेला महत्त्व आहे.

**कृषीमित्रांची मागणी काय?**

लोकेशन अचूक नोंदविण्यासाठी ई-पिक पाहणी प्रणालीतील तांत्रिक त्रुटी तातडीने दूर करावी, लोकेशनची अचूकता तपासण्यासाठी पर्यायी सुविधा उपलब्ध करून द्यावी तसेच तांत्रिक अडचणींमुळे पाहणी रखडलेल्या शेतकऱ्यांना मुदतवाढ किंवा पर्यायी नोंदणीची सुविधा द्यावी, अशी मागणी होत आहे.

**कृषीमंत्र्यांनी लक्ष देण्याची गरज**

ई-पिक पाहणी ही शेतकऱ्यांच्या पिकांच्या नोंदीशी संबंधित महत्त्वाची प्रक्रिया असल्याने अंजनगाव बारी परिसरातील लोकेशनच्या समस्येची तातडीने दखल घेऊन संबंधित यंत्रणेला आवश्यक तांत्रिक उपाययोजना करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी शेतकरी व कृषीमित्रांकडून होत आहे.

**कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे लक्ष**

दररोज मोठ्या संख्येने शेतकऱ्यांची ई-पिक पाहणी करण्याचे उद्दिष्ट असताना लोकेशन चुकीच्या ठिकाणी दाखविण्याचा तांत्रिक अडथळा निर्माण होत असल्याने कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी या प्रश्नाकडे लक्ष देऊन प्रभावी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# ऋषीपंचमीनिमित्त संत गजानन महाराज मंदिरात महाप्रसाद

**अंजनगाव बारी-**येथील श्री संत गजानन महाराज मंदिरात ऋषीपंचमीनिमित्त महाराजांची आरती व महाप्रसादाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी भाविकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी किसनराव पोकळे, प्रकाश खंडारे, मारोती भुरे, मंजिल लोणारे, अंकुश कुंभलकर, प्रवीण मुळे, नंदू कुंभलकर, श्रीराम भुरे, ईश्वर माहेकर, चंदूभाऊ भोयर, रोहन सहारे, राहुल सुरजुसे,सतीश वक्कलकार, अभिजीत तुटे, अक्षय शेलोकार, आदर्श धावडे, जय तलवारे, सुरज न्यायखोरे, जितेंद्र खानापुरे, सचिन तिरपुडे, ऋषिकेश खंडारे, मंथन चांबट, तेजस कारमोरे, गौरव येरणे व विशाल नवखरे यांनी सहकार्य केले.



# बैलपोळ्याला ट्रॅक्टर पोळा

## नारीशक्ती हरितक्रांती महिला बचत गटाचा नाविन्यपूर्ण उपक्रम



**टाकरखेडा संभु/वार्ताहर**

बैलपोळ्याच्या पारंपरिक सणाला आधुनिक शेतीची जोड देत येथील नारीशक्ती हरितक्रांती महिला बचत गटाच्या वतीने 'फार्मर कप २०२६' अंतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. बैलांसोबतच शेतीच्या यांत्रिकीकरणात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या ट्रॅक्टरची पूजा करून 'ट्रॅक्टर पोळा' भरविण्यात आला. यावेळी ट्रॅक्टर मालक व चालकांचा सत्कार करण्यात आला. शेतीमध्ये दिवसेंदिवस यांत्रिकीकरणाचे महत्त्व वाढत असून, बैलजोडीला पूरक म्हणून ट्रॅक्टरचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. याची दखल घेत महिला बचत गटाने बैलपोळ्याच्या दिवशी ट्रॅक्टरची पूजा करून त्यावर 'फार्मर कप २०२६' अंतर्गत निर्धारित शेती पद्धतींच्या जनजागृतीचे फलक लावले.निंबोळी अर्काची फवारणी, शेतात पक्षी थांबे उभारणे, माती परीक्षण करणे, दशपर्णी अर्काची फवारणी, जीवामृताचा वापर तसेच फेरोमोन सापळे लावणे आदी बाबींची माहिती फलकांच्या माध्यमातून देण्यात आली. शेतकऱ्यांनी एकमेकांच्या शेतात आवश्यक कामांसाठी सहकार्य केल्यास मजुरीवरील खर्चही कमी होऊ शकतो, असा संदेश यावेळी देण्यात आला. ट्रॅक्टरवर जनजागृतीपर फलक लावून गावातून रॅली काढण्यात आली.गटाच्या निमंत्रक पौर्णिमा सवाई व मेंटर रुपाली ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. संगीत नाचणकर, जयश्री लांडे, पूजा शेंडे, अरुणा लांडे, कुसुम मेश्राम, छाया सवाई, वृंदा मानकर, कल्याणी सवाई, सुशीला मेश्राम, उज्वला पिंगळे, पुष्पा जामठे व स्वाती सवाई यांच्यासह महिला सदस्यांनी उपक्रमात सहभाग घेतला. महिलांनी पुढाकार घेत आधुनिक शेतीचा संदेश दिल्याने या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## 'नवीन पिढी वाचत नाही' म्हणणाऱ्यांसाठी आशेचा किरण!

# भारतीय महाविद्यालय ग्रंथालयात पुस्तक देवघेवीसाठी विद्यार्थ्यांची मोठी गर्दी

**मोर्शी/वार्ताहर**

'आजची नवीन पिढी वाचनापासून दूर जात आहे', अशी चर्चा सातत्याने होत असताना भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथील ग्रंथालयात विद्यार्थ्यांनी पुस्तके घेण्यासाठी व परत करण्यासाठी लावलेली मोठी रांग ही वाचन संस्कृतीच्या दृष्टीने आशेचा किरण ठरली आहे.विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासक्रमाशी संबंधित पुस्तके, संदर्भग्रंथ तसेच ज्ञानवर्धक साहित्याबद्दल उत्सुकता दिसून आली.

मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या वाढत्या वापराच्या काळात विद्यार्थी पुस्तकांकडे वळताना दिसणे ही निश्चितच सकारात्मक बाब आहे. भारतीय महाविद्यालय मोर्शीचे प्राचार्य डॉ. संतोषजी आगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी ग्रंथालयाच्या माध्यमातून विविध उपक्रम आणि नवनवीन कल्पना राबविण्यात येत आहेत.

विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेपुरते मर्यादित न ठेवता अभ्यासक्रमाबरोबरच अवांतर वाचन, संदर्भग्रंथांचा वापर, ज्ञानवर्धक साहित्याचे वाचन आणि स्वयंअध्ययनाची सवय लागावी, यासाठी महाविद्यालय प्रशासनाकडून सकारात्मक वातावरण निर्माण केले जात आहे.

ग्रंथालयाचे ग्रंथपाल डॉ. अरविंद विमल संभाजी पाझारे यांच्या सातत्यपूर्ण शिस्त आणि मेहनतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालयाचा वापर वाढताना दिसत आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक पुस्तके सहज उपलब्ध करून देणे, ग्रंथालयातील साहित्याचा प्रभावी वापर करून घेणे, विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रोत्साहित करणे तसेच ग्रंथालयीन सेवांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यावर ते नेहमी भर देत आहे.

विद्यार्थ्यांना 'पुस्तक हे केवळ परीक्षेतील गुण मिळविण्याचे साधन नसून, ते विचार करण्याची दृष्टी देणारे माध्यम आहे', हा संदेश विविध उपक्रमांच्या माध्यमातून देत आहेत.

ग्रंथालयातील प्रत्येक वाचक म्हणजे ज्ञानाच्या उज्ज्वल भविष्याची अ ाशा आहे.महाविद्यालय मोर्शीच्या ग्रंथालयात निर्माण झालेली ही वाचनाची चळवळ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार आहे. ग्रंथ देवघेव व ग्रंथालयीन कामकाज प्रभाकर श्रीराम व प्रतीक पहिले यांनी बघितले. सहकार्य अभिनव गेडाम आणि मोहोडजी यांनी केले. राबवित असलेल्या उपक्रमाबद्दल डॉ. रजनीश बांबोळे, डॉ. लाजवंती टेंभुर्णे, डॉ. संदीप राऊत, डॉ. सावन देशमुख,डॉ. भगवान



साबळे,डॉ. शिरीष टोपरे,प्रा. गोपाल भलावी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, ग्रंथालय समिती सदस्य यांनी अभिनंदन केले व आनंद व्यक्त केला.

# धारणीच्या गजानन महाराज मंदिरात ऋषीपंचमीला महाप्रसादाची मांदियाळी

**मेळघाट/वार्ताहर**

धारणी मध्ये आपले वेगळे अस्तित्व जपणारे गजानन महाराजांचे देऊळ हे एक प्रसिद्ध देवस्थान आहे. येथे दरवर्षी ऋषीपंचमीला मोठ्या भंडाऱ्याचे आयोजन केले जाते.यंदाही ऋषीपंचमीच्या दिवशी हजारो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. या कार्यक्रमात संत गजानन महाराजांचा सर्वात मोठा उपदेशच प्रत्यक्षात उतरतो.

महाराजांचा संदेश - 'अन्न हे पूर्णब्रह्म आहे, अन्नाचा कधीही अपमान करू नका'संत गजानन महाराजांनी नेहमी सांगितले आहे की,'अन्न हे पूर्णब्रह्म आहे. अन्नाची नासाडी करू नका आणि अन्नदान हेच सर्वश्रेष्ठ दान आहे.'देविदास




पातुरकरांच्या घरी उच्छिष्ट पत्रावळीवरील अन्न ग्रहण करून महाराजांनी हाच संदेश दिला होता की, अन्नाचा एक कणही वाया जाऊ देऊ नये. ह्याच शिकवणीतून प्रेरणा घेऊन धारणी येथे हा भंडारा गेली अनेक वर्षे अविरत सुरू आहे.या भंडाऱ्यात खिचडी, पुरी, भाजी आणि बुंदीचा प्रसाद सर्वांना वाटण्यात येतो. यावेळी मेळघाटचे आमदार केवलरामजी काळे यांनी आवर्जून उपस्थित राहून स्वतःच्या हाताने भाविकांना प्रसादाचे वितरण केले. पूर्ण परिसर त्या दिवशी गजाननमय झाला होता.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. रमेश नांदुरकर, विजयपाल कडू, युगंधर सोनोने, नयन मेश्राम, राहुल सोनोने, बंटी ठाकरे, हॉटेल माऊलीचे गावंडे बंधू, पंकज माकोडे, पंकज मोरे, प्रतीक मालवीय, शिवा काळमेघ यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# महिलांनी स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक राहावे-डॉ.शुभांगी मुंधडा

**अमरावती–**घरातील सर्व सदस्यांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या महिला अनेकदा स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे वयाच्या एका टप्प्यानंतर गंभीर दुष्परिणाम दिसू लागतात आणि काही प्रकरणांत ते जीवघेणेही ठरू शकतात, असे मत ज्येष्ठ स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. शुभांगी मुंधडा यांनी व्यक्त केले.

डॉ. मुंधडा जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती येथे महिलांच्या आरोग्याबाबत आयोजित जागरूकता कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या भाषणात विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शारीरिक स्वच्छता, मासिक पाळीशी संबंधित विविध आजारांची लक्षणे व निदान, स्तन कर्करोग, गर्भाशयाचा कर्करोग, पीसीओडी यांसारख्या गंभीर समस्या तसेच कामकाजी महिलांच्या बदलत्या दिनक्रमामुळे उद्भवणाऱ्या आरोग्य समस्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. निरोगी जीवनासाठी संतुलित आहार आणि योगाभ्यास दिनक्रमाचा अविभाज्य भाग बनवण्याचा सल्लाही त्यांनी दिला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे होते. विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. प्रशांत अवचट विशेष उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. देशपांडे म्हणाले, 'महिला ही घराची रीढास्थ आहे. ती शारीरिक व मानसिकदृष्ट्या सुदृढ राहिली तरच संपूर्ण कुटुंबाची योग्य प्रकारे काळजी घेऊ शकते. त्यामुळे प्रत्येक महिलेने आपल्या आरोग्याच्या समस्या गांभीर्याने घेतल्या पाहिजेत.विद्यापीठाच्या एचआर विभागाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाचे संचालन एचआर प्रमुख योगिता वंजारी यांनी केले.

# प्रकाशराव चौधरी यांचे निधन

**बोराळा-**येथील प्रतिष्ठित नागरिक प्रकाशराव विश्वनाथराव चौधरी



यांचे बुधवार,१६ सप्टेंबर रोजी सकाळी ७.३० वाजता निधन झाले. ते ७१ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच बोराळा परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन बहिणी, दोन मुली-जावई, दोन मुले-सुना,नातवंडे तसेच मोठा आप्तेष्ट परिवार आहे. त्यांच्या जाण्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.त्यांच्या पार्थिवावर गुरुवार,१७ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ ट्रस्टचे जनसंपर्क अधिकारी मुकेश चौधरी यांचे वडील आहेत.

# सत्यशोधीका सरीता डेहनकर यांचा श्रद्धांजली कार्यक्रम

**कुऱ्हा -** सत्यशोधक समाजाचे अमरावती विभागीय अध्यक्ष गुरुकुंज



मोझरी (जि.अमरावती) येथील डॉ. सुधाकर डेहनकर यांच्या पत्नी कडव्या सत्यशोधीका सरिता सुधाकर डेहनकर ह्यांचे अल्पशा आजाराने गुरुवार,१०सप्टेंबर रोजी निधन झाले आहे.त्यानिमित्ताने दिवंगत सरीता सुधाकर डेहनकर ह्यांच्या श्रद्धांजलीचा कार्यक्रम गुरुवर्य हरिभाऊ वेरुळकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच रवी मानव यांच्या उपस्थितीत रविवारी २०सप्टेंबर रोजी अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी येथील अध्यात्म गुरुकुल येथे नियोजित करण्यात आल्याची माहिती सत्यशोधक समाजाचे अमरावती विभागीय अध्यक्ष डॉ. सुधाकर डेहनकर, प्रशांत डेहनकर, वैभव डेहनकर, वैशाली मेहरे यांनी एका शोक पत्राद्वारे दिली आहे. सत्यशोधकी विचारांनी प्रेरित असलेल्या तसेच सत्यशोधक समाजाच्या प्रत्येक अधिवेशनाला उपस्थिती लावणाऱ्या, मोझरी येते सत्यशोधक समाजाच्या साहित्य व संस्कृती परिषदेच्या अधिवेशनाच्या आयोजनात सिंहाचा वाटा असलेल्या सरीता सुधाकर डेहनकर होत्या. अख्ख्या विदर्भातील सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांमध्ये शोककळा पसरली आहे.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी 'शिवसेना-प्रहार'ची पदयात्रा

## तहसील कार्यालयात महावितरण व कृषी विभागाला धरले धारेवर

**तिवसा/वार्ताहर**

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांना घेऊन आज प्रहार पक्ष व शिवसेना शिंदे गटाकडून फत्तेपूर शिवणगाव ते तिवसा तहसील कार्यालयापर्यंत जवळपास १५ किलोमीटर शेकडो शेतकऱ्यांनी पदयात्रा काढत शासनाचे लक्ष वेधले. फत्तेपूर येथील युवा शेतकरी मनोज पांडे यांनी काही दिवसापूर्वी गळफास घेऊन आत्महत्या केली होती तसेच आताप यंत तालुक्यात झालेल्या शेतकरी आत्महत्या यांना तातडीने आर्थिक मदत व इतर मागण्यासाठी पदयात्रा काढण्यात आली. यावेळी आपल्या मागण्याचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले. या



पदयात्रा मोर्च्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करावा, दुष्काळ काळात शेतकऱ्यांसाठी विविध उपाय योजना, गुरुकुंज उपसा सिंचनाचे पाणी या भागातील शेतकऱ्यांना देण्यात यावे, शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव, वन्य प्राण्यांपासून होणाऱ्या पिकाच्या नुकसानीचीं आर्थिक मदत शेतकऱ्यांना देऊन वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा,वीज वितरण कंपनीने नादुरुस्त असलेले शेती विजफिडर तातडीने दुरुस्ती करावे, अशा विविध मागण्याचे निवेदन तिवसा तहसीलदार डॉ. मयूर कळसे यांना देण्यात आले. यावेळी विविध समस्याना घेऊन तहसील कार्यालयाच्या सभागृहात दोन तास चर्चा झाली.त्यामध्ये महावितरण व कृषी विभागाच्या कामकाजाबाबत शेतकऱ्यांनी रोष व्यक्त करून संतप्त भावना मांडल्या. येत्या ८ दिवसात कामकाजात सुधारणा न केल्यास महावितरण कार्यालयावर यापेक्षाही प्रचंड मोर्चा काढणार असल्याचा ईशारा दिला. यावेळी संजय देशमुख, नगरसेवक अनिल थुल,योगेश लोखंडे, अंकुश गायकवाड, बाळा देशमुख, मनोज काळमेघ, सुरेंद्र भिवंगडे, प्रशांत राऊत, प्रवीण केणे, दया राठोड, मोहन घोरडे, रवी पाथरे,योगेश भुसारी, शाम भुतडा, रोशन खोब्रागडे, नितीन मयर यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

### दोन तास सभागृहात प्रश्नाचा मारा...

शेतकऱ्यांची तहसील कार्यालयाच्या परिसरात पदयात्रा पोहचताच जोरदार घोषणा व नारेबाजी करण्यात आली.तहसील कार्यालयाबाहेर ठाण मांडून बसलेल्या मोर्चेकरानी जोपर्यंत तहसीलदार साहेब निवेदन स्वीकारण्यासाठी व त्यातील मागण्यावर चर्चा करण्यासाठी बाहेर येणार नाही,तोपर्यंत आम्ही हटणार नसल्याचा पवित्रा घेतला होता. ज्यामुळे काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.दरम्यान तहसीलदार मयुर कळसे यांनी बाहेर येऊन निवेदन स्वीकारले. शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी व त्यावर चर्चा करण्यासाठी तहसील सभागृहात दोन तास प्रश्नचा मारा यावेळी शेतकऱ्यांकडून करण्यात आला.यावेळी कृषी विभाग, वीज वितरण, गुरुकुंज उपसा सिंचन व वनविभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# दंडवसुलीचा प्रस्ताव तहसीलच्या दारातच

## ४८ कोटींच्या वसुलीला 'विहित नमुन्या'चा ब्रेक? चांडकांची मालमत्ता जप्ती-लिलावाची कारवाई कागदावरच

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** ४८ कोटींचा दंड कायम झाला, अपील फेटाळले गेले आणि शासनाच्या महसुलाची वसुली करण्याचा मार्ग कायदेशीरदृष्ट्या खुला झाला; मात्र प्रत्यक्ष कारवाईच्या टप्प्यावर महसूल यंत्रणेची गाडी पुन्हा 'विहित नमुना' या एका शब्दावर येऊन थांबली आहे. चांडक यांच्या मालमत्ता जप्ती व लिलावाचा प्रस्ताव तहसील कार्यालयातून अद्याप उपजिल्हाधिकारी महसूल यांच्याकडे पाठविण्यात आलेला नसल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे आता प्रश्न केवळ विलंबाचा राहिलेला नाही, तर ४८ कोटींच्या शासनाच्या हक्काच्या महसुलाबाबत प्रशासनाची इच्छाशक्ती नेमकी कुठे आहे, हा झाला आहे.




विशेष म्हणजे प्रस्ताव का पाठविला नाही, असा सवाल तहसील स्तरावरील जबाबदार अधिकारी-कर्मचाऱ्यांना केला असता, 'विहित नमुना कोणता, हेच आम्हाला अद्याप प्राप्त झालेले नाही,' असे उत्तर दिले जात असल्याचे सांगण्यात येते. मग १८ ऑगस्ट रोजी नमुना क्रमांक १७ नुसार प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असताना तब्बल एक महिन्याचा कालावधी ओलांडल्यानंतरही संबंधित नमुना उपजिल्हाधिकारी महसूल कार्यालयाकडून तहसील कार्यालयापर्यंत पोहोचला नसेल, तर हा प्रशासनातील समन्वयाचा अभाव आहे की जाणीवपूर्वक चाललेली दिरंगाई? याचे उत्तर आता संबंधित अधिकाऱ्यांनीच द्यावे.

या प्रकरणाचा आतापर्यंतचा घटनाक्रम पाहिला तर आदेशावर आदेश, पत्रांवर पत्रे, प्रस्तावांवर प्रस्ताव आणि नमुन्यांवर नमुने; मात्र प्रत्यक्ष वसुलीच्या नावावर ठोस कारवाई कुठे? असा सवाल उपस्थित होत आहे. म्हणजेच ४८ कोटींच्या दंडवसुलीच्या नावाखाली आतापर्यंत केवळ 'कागदी घोडे' नाचविले जात आहेत का, अशी चर्चा आता अकोट तालुक्यात रंगू लागली आहे.

एकीकडे शासनाच्या महसुलाची वसुली करण्यासाठी प्रशासनाकडे कायदेशीर अधिकार आहेत. दुसरीकडे संबंधित मालमत्ता जप्ती-लिलावाचा प्रस्ताव पुढे सरकविण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रक्रियेलाच वारंवार विलंब होत आहे. त्यामुळे या दिरंगाईमागे नेमका प्रशासकीय अडथळा कोणता, याचा खुलासा होणे गरजेचे आहे.

### कोट्यवधींची कंत्राटी बिले व औद्योगिक साम्राज्य वसुलीच्या कक्षेबाहेर का?

#### 'शासनाचा महसूल' की कुणाच्या सोयीचा विषय?

४८ कोटी रुपयांचा दंड हा एखाद्या व्यक्तीचा किंवा विभागाचा खासगी विषय नाही. तो शासनाच्या तिजोरीशी संबंधित आहे. त्यामुळे दंडवसुलीत कोणतीही दिरंगाई होत असेल, तर त्याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. उलट, शासनाला मिळणाऱ्या महसुलाच्या वसुलीत विलंब होत असताना प्रशासनातील काही अधिकारी-कर्मचाऱ्यांची लगबग नेमकी कोणत्या कारणासाठी सुरू आहे, याबाबत विविध चर्चा रंगू लागल्या आहेत.या चर्चांमध्ये दंडवसुलीच्या प्रक्रियेत शासनाच्या महसुलापेक्षा इतर कोणाचे आर्थिक हित प्राधान्याने जपले जात आहे का, असा गंभीर प्रश्न उपस्थित केला जात आहे. अर्थात, या चर्चांमध्ये तथ्य आहे की नाही, हे प्रशासनाने स्पष्ट करणे आवश्यक आहे. कारण संशय दूर करण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे पारदर्शक कारवाई आणि त्याची अधिकृत नोंद.

#### जिल्हाधिकारी कार्यालयाची भूमिका गुलदस्त्यातच ?

या संपूर्ण प्रकरणात अकोट तहसीलपासून उपजिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत प्रक्रिया रेंगाळत असल्याच्या पार्श्वभूमीवर आता जिल्हाधिकारी स्तरावरून काय कारवाई होते, याकडे लक्ष लागले आहे. ४८ कोटींच्या शासन महसुलाच्या वसुलीचा प्रश्न असताना संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून प्रस्ताव वेळेत पाठविला जातो की नाही, त्यात विलंब का झाला, कोणत्या अधिकाऱ्याची जबाबदारी होती आणि वसुलीसाठी आतापर्यंत नेमकी कोणती ठोस कारवाई झाली; या सर्व बाबींची वरिष्ठ स्तरावरून तपासणी होणे गरजेचे आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले आहे किंवा अकोट महसूल विभागाला मोकळीक दिली आहे, अशी चर्चा आता सुरू झाली असली तरी त्यावर अंतिम उत्तर प्रशासनानेच द्यायचे आहे. ४८ कोटींच्या वसुलीच्या प्रकरणात 'कुणावर कारवाई होणार?' यापेक्षा 'कारवाई कधी होणार?' हा प्रश्न आता अधिक महत्त्वाचा ठरत आहे.शासनाच्या तिजोरीचा पैसा वसूल करण्यासाठी आदेशांची गरज किती वेळा लागणार? प्रत्येक टप्प्यावर नवा नमुना, नवी फाईल आणि नवा विलंबच होत राहणार असेल, तर ४८ कोटींची वसुली नेमकी कोण करणार? या प्रश्नाचे उत्तर आता कागदावर नव्हे, तर प्रत्यक्ष कारवाईतून अपेक्षित आहे.

#### वसुलीची तलवार फक्त कागदावरच?

या प्रकरणातील आणखी गंभीर मुद्दा म्हणजे दंडवसुली करताना चांडक यांच्या नावावर किंवा त्यांच्या व्यावसायिक व्यवहारांशी संबंधित असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या शासकीय कंत्राटी बिलांचा, सुरू असलेल्या उद्योगधंद्यांचा किंवा इतर संभाव्य वसुलीयोग्य मालमत्तेचा विचार झाला आहे का? शासनाचा ४८ कोटी रुपयांचा दावा असताना वसुलीची व्याप्ती नेमकी कोणत्या मालमत्तेपर्यंत मर्यादित ठेवण्यात आली आहे, याची माहिती प्रशासनाने सार्वजनिक करणे आवश्यक आहे. जर शासनाची थकबाकी वसूल करण्यासाठी कायदेशीरदृष्ट्या उपलब्ध असलेली मालमत्ता, देयके किंवा इतर आर्थिक स्रोत तपासले जात नसतील, तर त्यामागचे कारण काय? संबंधित बाबी जाणीवपूर्वक वगळल्या जात आहेत की प्रशासनाकडून त्याकडे 'अर्थ'पूर्ण दुर्लक्ष होत आहे? या प्रश्नांची उत्तरे मिळणे आता अपरिहार्य झाले आहे.

## सरकारी नोकरीचे आमिष दाखवून ५२.५० लाखांची फसवणूक

#### पाच जणांविरुद्ध गुन्हा

या प्रकरणात सागर सोमेश्वर जोगळेकर (वय २४, रा. काकडदरा, ता. आष्टी, जि. वर्धा), विपुल सुखदेवराव सूर्यवंशी, प्रवीण , अक्षय गजानन चव्हाण, अभिजित गजानन काळमेघ आणि अंकुश ठाकरे यांची नावे तक्रारीत नमूद करण्यात आली आहेत. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, पैसे नेमके कोणत्या माध्यमातून आणि कोणाच्या खात्यात देण्यात आले, तसेच कथित नियुक्ती आदेशाची सत्यता यासह अन्य बाबींची चौकशी केली जात आहे.




### -मंत्रालयात ओळख असल्याचे सांगून आरोग्य सेवक पदावर नियुक्तीचे आमिष

**अमरावती/प्रतिनिधीः-** सरकारी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची तब्बल ५२ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी राजापेठ पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आरोग्य सेवक पदावर वर्धा येथे नोकरी लावून देण्याचे आश्वासन देत आरोपींनी पैसे घेतले आणि नियुक्ती आदेश दिल्याचे भासविल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. याप्रकरणी राजापेठ पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(२), ३३६(३), ३४०(२), ३५१(२) व ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांकडे दाखल फिर्यादीनुसार, आरोपी आणि फिर्यादीची पूर्वीपासून ओळख होती. आरोपींनी मंत्रालयातील रामटेके नावाच्या अधिकाऱ्याशी आपली ओळख असल्याचे सांगून सरकारी नोकरी लावून देण्याचा विश्वास निर्माण केला. फिर्यादीच्या शिक्षणामुळे तो आरोग्य सेवक पदासाठी पात्र असल्याचे सांगत वर्धा येथे नोकरी लावून देतो, असे आमिष दाखविण्यात आले. ☞(पान २ वर)

## चिखलदरा येथे दोन अस्वलांच्या हल्ल्यात आदिवासी मजूर गंभीर जखमी

### कंत्राटदाराच्या प्रसंगावधानाने वाचले प्राण

**अमरावती/प्रतिनिधीः-** चिखलदरा शहरात बुधवारी दुपारी वन्यजीवांच्या दहशतीची धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील सिपना महाविद्यालयाच्या परिसरात बुधवार, १६ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास दोन अस्वलांनी अचानक केलेल्या हल्ल्यात एक आदिवासी मजूर गंभीर जखमी झाला. या थरारक घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

जयराम गन्नू कासदेकर (वय ४५) असे हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या मजुराचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जयराम हे सिपना महाविद्यालयाच्या परिसरातून जात असताना झुडपात दबा धरून बसलेल्या दोन अस्वलांनी त्यांच्यावर अचानक झडप घातली. या अनपेक्षित हल्ल्यात कासदेकर गंभीर जखमी झाले. त्यांनी जीवाच्या आकांताने मदतीसाठी आरडाओरड सुरू केली.त्याच वेळी रस्त्यावरून चारचाकी वाहनाने जाणारे स्थानिक कंत्राटदार इम्रान हुसेन यांनी प्रसंगावधान दाखवले. त्यांनी जराही वेळ न दवडता आपले वाहन थेट अस्वलांच्या दिशेने नेले. वाहनाचा मोठा आवाज आणि दिशा पाहून दोन्ही अस्वलांनी जंगलात पळ काढला. त्यानंतर☞(पान २ वर)

## चांदुर रेल्वे-नांदगाव खंडेश्वर मार्गे शेगाव बस सेवा सुरू



**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने १६ सप्टेंबर पासून चांदुर रेल्वे ते शेगाव नवीन बस सेवा नांदगाव खंडेश्वर मार्गे सुरु केली असून यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना शेगाव येथे जाण्याकरिता सुविधा उपलब्ध झाली. ही बस चांदूर रेल्वे येथून सकाळी ७ वाजता निघून राजुरा, टोंगलाबाद, येणस, नांदगाव खंडेश्वर, शिंगणापूर ,मंगरूळ चव्हाळा, दोनद खेरडा, कारंजा, मूर्तिजापूर, अकोला , शेगाव या मार्गाने जाऊन ११:३० वाजता शेगाव येथे पोहोचणार आहे. या बसमुळे नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील नागरिकांना शेगाव येथे जाण्यासाठी सुविधा ☞(पान २ वर)

## दोन कुख्यात गुन्हेगारांवर एमपीडीएची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ग्रामीण पोलिसांच्या वतीने प्रयत्न केले जात आहे. या अंतर्गत परतवाडा येथील दोन कुख्यात आरोपींविरुद्ध एमपीडीए कारवाई करण्यात आली आहे.रोहित उर्फ चोचू गजानन मरसकोल्हे (वय २९, रा. जुनी वस्ती, कांडली, परतवाडा) व सूरज उर्फ लल्ला कालीचरण ठाकूर (वय ३१, रा. रविनगर,परतवाडा) यांना ताब्यात घेऊन कारागृहामध्ये पाठवले आहे.जिल्हा दंडाधिकारी आशीष येरेकर यांनी दोघांना एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचा आदेश काढला होता. आदेशानंतर फरार असलेल्या दोन्ही आरोपींना☞(पान २ वर)





## पोस्टात नोकरीचे आमिष; २१.१० लाखांची फसवणूक

### बनावट नियुक्ती आदेश दिल्याचा आरोप

**अमरावती/प्रतिनिधीः-** मुलीला पोस्ट विभागात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून बनावट नियुक्ती आदेश देत फिर्यादीसह तिघांकडून तब्बल २१ लाख १० हजार रुपये उकळल्याची तक्रार धारणी पोलिस ठाण्यात दाखल झाली आहे. नोकरीचे आश्वासन देऊन पैसे घेतल्यानंतर प्रत्यक्ष नियुक्ती न झाल्याने हे प्रकरण उघडकीस आले. याप्रकरणी नानकराम बेड्या कास्देकर (वय ५६, रा. बारू, ता. धारणी) यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, बाबू बन्सी धुर्वे (वय ५१, रा. म्हाडा कॉलनी, रंगभवन, धारणी) याने कास्देकर यांच्या मुलीला पोस्ट विभागात नोकरी लावून देण्याचे आश्वासन दिले. सरकारी नोकरी मिळणार असल्याने फिर्यादीने धुर्वे ☞(पान २ वर)




## जमीन स्वस्त दरात भाड्याने दिल्याने आमसभेत विरोधकांचा संताप

### अमरावती महापालिकेत सीबीजी प्रकल्पाला हिरवा कंदील

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर आणि औद्योगिक क्षेत्रातून निघणाऱ्या ओल्या कचऱ्याचे वैज्ञानिक पद्धतीने सीबीजी तयार करण्याच्या १०० कोटी रुपयांच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाला आज बुधवार १६ सप्टेंबर रोजी झालेल्या महापालिकेच्या आमसभेत मंजुरी देण्यात आली. मात्र या प्रकल्पासाठी ३.०५ हेक्टर सरकारी जमीन अत्यंत स्वस्त दरात भाड्याने देण्याच्या निर्णयावरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले. तसेच आजच्या आमसभेमध्ये वाढिव संपत्ती करावर चर्चा झाली नाही.



महापालिकेने सीबीजी प्रकल्पासाठी मौजा रहाटगाव येथील सर्व्हे नंबर १५३/२ चा ३.१२ हेक्टरपैकी आणि सर्व्हे नंबर १५३/३ चा २.१५ हेक्टरपैकी जमीन उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव आमसभेत सादर केला होता. दोन्ही मिळून एकूण ३.०५ हेक्टर जमीन साडे सात एकर आहे. या जमिनीवर बीओटी तत्त्वावर गोवर्धन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून सीबीजी प्लांट उभारला जाणार असून या ☞(पान २ वर)

## भरती परीक्षा पद्धतीत सुधारणा

## आज उच्च स्तरीय टास्क फोर्स शहरात

**अमरावती/प्रतिनिधीः** अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय टास्क फोर्स गुरुवार, १७ सप्टेंबर रोजी भरती परीक्षा पद्धतीत आवश्यक सुधारणा करण्याच्या अनुषंगाने सूचना व अभिप्राय जाणून घेण्याकरिता अमरावती विभाग दौऱ्यावर येत आहे. या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत अमरावती विभागातील सर्व घटकांनी उत्स्फूर्त व सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी तसेच परीक्षांमधील गैरप्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे. ही समिती जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे १७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी ५.३० अमरावती विभागातील हितधारकांच्या सूचना व अभिप्राय ऐकूण घेत त्यांच्याशी चर्चा करणार☞(पान २ वर)

## शेतात काम करतांना महिलेला सर्पदंश

### शुभम खेरडे मित्र परिवाराची तत्परता ठरली मोलाची

**अचलपूर/प्रतिनिधीः-** शेतात काम करत असताना अचानक सर्पदंश झाल्याने घाबरलेल्या शांती सुरेंद्र धोके (वय ३५) यांच्या मदतीला शुभम खेरडे मित्र परिवार धावून आला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून क्षणाचाही विलंब न करता रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात आली. अचलपूरहून अमरावतीपर्यंतचा प्रवास अवघ्या ४० मिनिटांत पूर्ण करून त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. वेळेत वैद्यकीय उपचार मिळाल्याने त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली.

अचलपूर तालुक्यातील लामणी खुमाई गावाजवळ शेतात काम करत असताना शांती धोके यांना सापाने दंश केला. अचानक घडलेल्या या घटनेने कुटुंबीयांची घाबरगुंडी उडाली. सर्पदंशाच्या परिस्थितीत वेळेवर वैद्यकीय उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात हलविण्याची गरज होती.






ही बाब समजताच शुभम खेरडे मित्र परिवाराने तत्परतेने मदतीचा हात पुढे केला. रुग्णवाहिकेची व्यवस्था करून शांती धोके यांना अमरावतीकडे रवाना करण्यात आले. रुग्णवाहिकेतील☞(पान २ वर)

## पावसातील दीर्घ खंडामुळे खरीप पिके धोक्यात

### आमदार राजेश वानखडे यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यातील तसेच विशेषतः तिवसा विधानसभा मतदारसंघातील तिवसा, भातकुली, अमरावती व मोर्शी तालुक्यांमध्ये पेरणी पश्चात विविध भागांमध्ये २५ ते ३० दिवसांचा पावसाचा दीर्घ खंड पडल्यामुळे खरीप पिके मोठ्या प्रमाणावर धोक्यात आलेली असून प्रामुख्याने सोयाबीन शेतकऱ्यांच्या हातून गेल्याची चिन्हे आहे. या नुकसानीची तातडीने दखल ☞(पान २ वर)

**-कोरडा दुष्काळ सदृश्य परिस्थितीत शेतकऱ्यांना तातडीने मदतीची मागणी**

## 'सेवा संकल्प अभियान' अमरावती विभागात यशस्वी करा

### विभागीय आयुक्त नयना गुंडे



**अमरावती/प्रतिनिधीः-** सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहचविण्याच्या उद्देशाने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत अमरावती विभागातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगर पालिकांचे आयुक्त यांच्या बरोबरच सर्व विभागांच्या विभागीय, जिल्हा व तालुका स्तरीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभागी होऊन अमरावती विभागात 'सेवा संकल्प अभियान' यशस्वी करावे असे आवाहन अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले.

शासन निर्णयानुसार 'सेवा संकल्प अभियानाच्या' अंमलबजावणीसाठी अमरावती विभाग स्तरावर विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली अंमलबजावणी व सनियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे. या समितीच्या बैठकीत विभागीय आयुक्त गुंडे बोलत ☞(पान २ वर)

## पत्रकार अमोल खोडे यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-** पत्रकार अमोल सुभाषराव खोडे यांचे बुधवारी दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यसमयी ते ४२ वर्षाचे होते. आज गुरुवार ( दि.१७) रोजी दुपारी एक वाजता अंत्ययात्रा त्यांचे राहते घरून पंचशील चौक, योगीराज नगर तपोवन येथून निघणार आहे. हिंदू स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येईल. त्यांच्या दुःखद निधनाने पत्रकार क्षेत्रात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, आई असा बराच मोठा आप्त परिवार आहे. अमोल खोडे यांच्या अचानक जाण्याने हळहळ व्यक्त होत आहे.



## तीन गुन्ह्यांतील आरोपी उमठ्यात जेरबंद

### -दोन चोरीच्या गुन्ह्यांसह दरोड्याच्या प्रकरणातही सहभाग

**अमरावती/प्रतिनिधीः-** दोन चोरीच्या गुन्ह्यांत फरार असलेला आणि माहुली जहागीर पोलिस ठाण्यात दाखल दरोड्याच्या गुन्ह्यातही सहभाग असल्याचे समोर आलेला निलेश ढाई पवार (वय ४२, रा. वाघोली, अमरावती) याला तळेगाव दशासर पोलिसांनी नागपूर जिल्ह्यातील उमठा येथून अटक केली. मूळ गाव सोडल्यानंतर उमठा येथे राहत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याचा माग काढत ही कारवाई केली. निलेश पवार याच्याविरुद्ध तळेगाव दशासर पोलिस ठाण्यात अपराध क्रमांक १३/२०२५ आणि ०८/२०२५ असे दोन गुन्हे दाखल आहेत. दोन्ही प्रकरणांत भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) व ३(५) अन्वये चोरीचे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. या गुन्ह्यांनंतर पवार पोलिसांच्या हाती लागला नव्हता. दरम्यान, फरार आरोपींचा शोध घेत असताना पवार हा अमरावती जिल्ह्याबाहेर उमठा (ता. काटोल, जि. नागपूर) येथे राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खात्री केल्यानंतर तपास पथकाने उमठा गाठून ☞(पान २ वर)